# हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अहवाल : २०१८



ज्ञानदेव तळुले
महादेव देशमुख
विजय ककडे

**अर्थशास्त्र अधिविभाग**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४

**नोव्हेंबर २०१८**

**Disclaimer:**
The entire information and data base that the present report carries are strictly based on the field investigation, FGDs and the field observations of the study team. Neither the information in any form in the present report carries any personal impression nor does it carry any biased mention by any of the member of the study team.

# हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अहवाल : २०१८

ज्ञानदेव तळुले
महादेव देशमुख
विजय ककडे

**अर्थशास्त्र अधिविभाग**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४

**नोव्हेंबर २०१८**

# हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अहवाल-२०१८

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| कार्यकारी सारांश (Executive Summary) | |
| I) प्राक्कथन: | |
| II) औपचारिक वास्तव | |
| प्रकरण१: | जलसिंचन धोरण व भूसंपादनविषयक विवेचन |
| प्रास्ताविक | |
| | १.१: जलसंपदा व राज्य सरकार |
| | १.२: प्रकल्पपूर्तीस विलंब व व्ययवृध्दीची समस्या |
| | १.३: न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने |
| प्रकरण २: | माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती |
| प्रास्ताविक | |
| | २.१: अभ्यासाची उद्दिष्टे |
| | २.२: अभ्यास पद्धती |
| | २.३: अभ्यासाची पूर्वपिठीका |
| | २.४: सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती |
| | २.४.१: सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया |
| | २.५: सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे |
| | २.६: प्रकल्पप्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी |

| | |
|---|---|
| | २.६.१:बहुविधस्त्रोत माहिती संकलन |
| | २.६.२: प्रकल्पबाधित, प्रतिगामी-अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह संवाद |
| | २.६.३: प्रश्नावली, प्राथमिक माहिती संकलन व नमुना निवड |
| | २.६.४: नमुना निवड |
| | २.६.५: विशेष समूह चर्चा (Focussed Group Discussions) |
| **प्रकरण ३:** | **सर्फनाला प्रकल्पाची व्यवहार्यता** |
| | ३.१: परिचय (Introduction) |
| | ३.२: पारोपलीगाव |
| | ३.३: कार्य प्रोफाईल |
| | ३.४: जातीचा घटक |
| | ३.५: प्रकल्पाची सद्यस्थिती |
| | ३.६: सिंचन क्षमता |
| | ३.७: पाणीसाठा |
| **प्रकरण ४:** | **सद्य प्रकल्पबाधीत व संभाव्य प्रकल्प लाभार्थींवरील आर्थिक व सामाजिक परिणाम** |
| **प्रास्ताविक** | |
| | ४.१: प्रश्नावलीतील अंतर्भूत घटक |
| | ४.२: पृथक्करण व विश्लेषण |
| | ४.३: उत्पादन क्षमता |
| | ४.४: जलनियोजन |

| | |
|---|---|
| | ४.५: वित्तीय निर्देशांक: |
| | ४.६: प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनाविषयी |
| **प्रकरण ५:** | **आर्थिक व निवास विषयक पुनर्वसन संदर्भात शासनाची पूर्वतयारी** |
| | ५.१: जमिनीचे मूल्यांकन |
| | ५.२: पुनर्वसन |
| | ५.३: नागरी सुविधा कामे |
| | ५.४: प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप |
| | ५.५: पुनर्वसनाची स्थिती काय आहे? |
| | ५.६: पुनर्वसन नागरी सुविधा कामे: |
| | ५.७: पुनर्वसन आणि पुनरस्थापना अंतर्गत घटक: |
| | ५.८: अडचणी: |
| **प्रकरण ६:** | **निष्कर्ष व शिफारशी** |
| **प्रकरण ७:** | **ताजा कलम (Post Script)** |

# तक्त्यांची यादी



| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| ३.१ | पारपोली गावाची लोकसंख्याविषयक माहिती |
| ३.२ | धरणाची एकूण साठवण क्षमता व पाणीसाठा |
| ३.३ | हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाचे बिगर सिंचन परिस्थितीमध्ये निव्वळ फायदे |
| ३.४ | हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाचे सिंचित परिस्थितीमध्ये निव्वळ फायदे |
| ३.५ | हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाचे लाभ/खर्च प्रमाण (Benefit Cost Ratio) |
| ४.१ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे घरमालकी विषयक विवेचन |
| ४.१ अ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे घराच्या प्रकारानुसार विवेचन |
| ४.१ ब | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या घर आकारमानावरून विवेचन |
| ४.२ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे नोकरीवरून विवेचन |
| ४.२ अ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या सदस्य स्थलांतराचे विवेचन |
| ४.३ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या टिकावू उपभोग्य वस्तू व कृषी भांडवली आदानांच्या मालकीविषयक विवेचन |
| ४.४ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभ जिरायत तथा बागायत जमिन वापरासंबंधीचे विवेचन धारक सर्वेक्षित कुटुंबांच्या |
| ४.५ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित |

| | |
|---|---|
| | कुटुंबांच्या पिकपद्धतीचे विवेचन |
| ४.६ अ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या पिकपद्धतीचे विवेचन |
| ४.७ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या पिकवार एकरी उत्पादनक्षमतेचे विवेचन |
| ४.८ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाची फळ लागवडीचे विवेचन |
| ४.९ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाच्या खाजगी वनसंपदेचे विवेचन |
| ४.१० | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे कृषी जलस्त्रोत विवेचन |
| ४.११ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे स्वत:च्या मालकीचे बोअरवेल व विहीरींचे यांचे विवेचन |
| ४.१२ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभपट्ट्यातील सरासरी भूजलपातळी विषयक विवेचन |
| ४.१३ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे रोजगारविषयक विवेचन |
| ४.१४ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे बिगर कृषी रोजगारविषयक विवेचन (पशुपालन) |
| ४.१५ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे बँक, बचतगट, पोस्ट ऑफीस व पतसंस्था सुविधा विषयक विवेचन |
| ४.१६ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक उद्दिष्टनिहाय एकूण, सरासरी कौटुंबिक व सरासरी प्रती एकर कर्जाचे विवेचन |
| ४.१७ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे कर्ज, परतफेड, व्याज, थकबाकी विषयक विवेचन |

| | |
|---|---|
| ४.१८ | सर्फनाला सिंचन प्रकल्पबाधीत कुटुंबांचे बुडीत क्षेत्र आणि जमिन पुनर्वसन अनुशेष विषयक विवेचन |
| ४.१९ | प्रकल्पबाधीत पारपोली व पारपोली गावठाण येथील कुटुंबांच्या राहत्या घरांचे पुनर्वसन विषयक विवेचन |
| ४.२० | सर्फनाला सिंचन प्रकल्प विस्थापित पारपोली व पारपोली गावठाण आणि खेडगे येथील कुटुंबांना जमिन पुनर्वसन ाअंतर्गत मिळालेल्या पर्यायी जमिनींचे विवेचन |
| ५.१ | प्रकल्प निवासी पुनर्वसन पूर्वतयारी निर्देशक विवेचन |
| ५.२ | प्रकल्प कृषी पुनर्वसन पूर्वतयारी निर्देशक विवेचन |
| ५.३ | प्रकल्प पूर्तीकामी जमिन अधिग्रहण निर्देशक विवेचन |
| ५.४ | पर्यायी जमीन वाटप व स्वेच्छा पुनर्वसनाबाबत निर्देशक विवेचन |
| ५.५ | प्रकल्पबाधन व पुनर्वसनविषयक आवश्यकतांचे समग्र विवेचन |
| ५.६ | प्रकल्प पुनर्वसनविषयक समग्र विवेचन |

# आलेखांची यादी


| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| ४.१ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे घरमालकी विषयक विवेचन |
| ४.२ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे घराच्या प्रकारानुसार विवेचन |
| ४.३ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या घर आकारमानावरून विवेचन |
| ४.४ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे नोकरीवरून विवेचन |
| ४.५ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या सदस्य स्थलांतराचे विवेचन |
| ४.६ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या जिरायत तथा बागायत जमिन वापरासंबंधीचे विवेचन |
| ४.७ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या पिकपद्धतीचे विवेचन |
| ४.८ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे स्वत:च्या मालकीचे बोअरवेल व विहीरींचे यांचे विवेचन |
| ४.९ | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे रोजगारविषयक विवेचन |
| ४.१० | प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे बँक, बचतगट, पोस्ट ऑफीस व पतसंस्था सुविधा विषयक विवेचन |

## कार्यकारी सारांश (Executive Summary):

**I) प्राक्कथन:**

हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम सिंचन प्रकल्प हा आजरा तालुक्यातील हिरण्यकेशी नदीखोऱ्यातील सर्फनाल्यावर मौजे पारपोली या गावानजिक बांधणे प्रस्तावित असून ऑक्टोबर १९९८ पासून अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. प्रकल्पाच्या दीर्घकाळ प्रलंबनामुळे एकूण प्रकल्पव्ययात प्रचंड वृद्धी झाल्याने अंदाजीत प्रकल्पव्ययाची रक्कम रूपये २०० कोटी पेक्षाही अधिक झाली आहे. प्रस्तुत प्रकल्पाचे एकूण बुडीत क्षेत्र २८५.५६ हेक्टर तर सिंचन क्षमता २६४४ हेक्टर इतकी असून एकूण २० गावांचा प्रस्तावित लाभक्षेत्रात समावेश होणार आहे. प्रकल्प दीर्घकाळ प्रलंबित असण्याची प्रमुख कारणे प्रकल्पग्रस्तांचे उत्पादक व निवासी पुनर्वसन व पर्यायी शेतजमीनी आणि इतर बुडीत मालमत्तांच्या मोबदल्याशी निगडीत आहेत. अशा कारणांमुळे प्रकल्पग्रस्तांचे जीवनमान व उदरनिर्वाहाचे प्रश्न निर्माण झाल्यामुळे मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे येथील प्रकल्पबाधीतांचा प्रस्तुत प्रकल्पास विरोध आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पाच्या प्रलंबनाच्या कारणांचा मागोवा घेवून उभायपक्षी (प्रकल्पबाधीत व राज्य सरकार) मान्य होवू शकेल असा अभ्यासपूर्ण सापनि(Social Impact Analysis) अहवाल तयार करण्याचे काम शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

प्रस्तुत अहवाल प्रामुख्याने प्राथमिक माहितीवर निर्धारित असून याकामी जनगणना पद्धतीचा अवलंब करून प्रकल्पबाधीत मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे येथील शेतकरी कुटुंबांना प्रत्यक्ष भेटूनप्राथमिक माहितीचे संकलन केले असल्याने प्रस्तुत सापनि अहवाल सत्यतेच्या निकषांवर पात्र ठरू शकतो अशाप्रकारे तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत जलसिंचन प्रकल्पाचे संभाव्य लाभ पडताळून पाहण्यासाठी प्रकल्पबाधीतांच्या प्राथमिक पाहणीव्यतिरिक्त आजरा तालुक्यातील चित्री पाटबंधारे प्रकल्प लाभार्थींच्या प्राथमिक माहितीचाही समावेश नियंत्रण समूह (Control Group)स्वरूपात करण्यात आला आहे.

## II) औपचारिक वास्तव :

- प्रलंबित प्रकल्पाचे बुडीत व लाभक्षेत्र तसेच चित्री प्रकल्पाचे लाभक्षेत्र व प्रस्तुत अभ्यासाचे नियंत्रण क्षेत्र कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील आजरा तालुक्यात येत असून या दोन्हीही क्षेत्रातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान १३०० मिमी इतके प्रचंड आहे. त्यामुळे दोन्ही क्षेत्रातील हंगामी व वार्षिक पिकपद्धतीत फारशी किंबहुना जराही तफावत दिसून येत नाही. कारण या सर्व भागात वार्षिक प्रवाही नदीपात्रे आहेत. लाभक्षेत्र (नियंत्रण क्षेत्र) व बाधीत क्षेत्राच्या पिकपद्धतीत तफावत नसली तरी ऊसासारख्या व्यापारी पिकाच्या उत्पादकतेत मात्र तफावत असल्याचे दिसून येते.

- लाभक्षेत्र (नियंत्रण क्षेत्र) व प्रकल्प प्रभावीत क्षेत्राची पिकपद्धती व हंगामी पिक उत्पादनक्षमतेत तफावत नसल्यामुळे महत्त्वाचा निष्कर्ष असा मिळतो व तो म्हणजे जेथे जेथे साठवणक्षम पाणी व धरण बांधण्यायोग्य जागा असेल अशा सर्वच ठिकाणी धरणे बांधलीच पाहिजेत असा धोरणकर्ते अथवा संबंधित विभागाचा किंवा स्थायी सिंचनलाभाच्या अपेक्षेने जनतेचा आग्रह असण्याची आवश्यकता नसावी.

- अशा अधिक पर्जन्यमानाच्या भूभागाकडे जलनियोजनाच्यादृष्टिने वेगळा विचार होण्याची आवश्यकता आहे असे नमूद करणे आवश्यक आहे. किंबहूना अशा भूभागावर कोल्हापूर बंधाऱ्यांप्रमाणे जलनियोजन तंत्राचा वापर केला तर पाटबंधारे प्रकल्पांच्या तुलनेत निम्नतम भांडवलाच्या सहाय्याने जलसिंचन होवून पुनर्वसनाचा प्रश्न टाळला जावू शकतो व हिरण्यकेशी सर्फनाला प्रकलपाच्या बाबतीत प्रस्तुत पर्याय अधिक प्रभावी ठरला असता. परंतु आता तो भूतकाळ आहे. अशा प्रकारच्या पर्यायी जलनियोजनामुळे सार्वजनिक खर्चात बचत होवून वित्तीय संसाधन इतरत्र उपयोगी आणता येवू शकतात.

- अशा प्रकारच्या पर्यायी जलनियोजनामुळे सार्वजनिक खर्चाची कार्यक्षमता साध्य होवून भूमि अधिग्रहण व पुनर्वसनाच्या समस्या उपलब्ध होणार नाहीत.

- अशा प्रकारच्या पर्यायी जलनियोजनामुळे राष्ट्रीय जल लवादाने देवू केलेले राज्याच्या हिश्श्याचे पाणी शिल्लक राहून प्रवाह दिशेच्या राज्यात जावू शकते.

पर्यायाने अशा पाण्याचा मोबदला लाभधारक राज्याने वरच्या राज्यास देवू करणे अधिक सोयीस्कर पर्याय ठरू शकतो.

- प्रकल्पपूर्व बिगर सिंचन स्थितीअंतर्गतचे फायदे व प्रकल्पोरांत सिंचन सुविधानंतरचे फायदे यांचा तुलनात्मक विचार करून जलसिंचन विभागाने दाखविलेले प्रकल्पाचे व्यय : लाभ गुणोत्तर जास्त आहे. कारण प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित शेतकरी कुटुंबांच्या पिकरचना व पिकनिहाय उत्पादक क्षमतांचा विचार केल्यास प्रस्तुत गुणोत्तर निश्चितच अधिक आहे. (पहा तक्ता क्रमांक ३.५)

- नियंत्रण क्षेत्रातील ऊसपिकाची एकरी उत्पादनक्षमता (म्हणजेच प्रस्तावित लाभक्षेत्र असे गृहित धरल्यास) प्रकल्पबाधीत क्षेत्राच्या एकरी उत्पादनक्षमतेपेक्षा ३०७.७२ टक्के अधिक आहे. परंतु इतर हंगामी पिकांच्या उत्पादनक्षमतेत फारसा फरक नाही असेच दिसून येते. याचाच अर्थ असा निघतो की फक्त ऊस पिकाखालील क्षेत्र वाढविणे व उत्पादन घेणे अशा मर्यादित उद्दिष्टाकरिता धरणे बांधून अधिग्रहण व पुनर्वसनाच्या आणि पर्यावरणाच्या समस्या निर्माण करण्यापेक्षा पर्यायी जलनियोजन अधिक प्रभावी निष्पन्न होवू शकते.

- हिरण्यकेशी सर्फनाला पाटबंधारे प्रकल्पामुळे होणारे वनसंपदेचे नुकसान मोठ्या प्रमाणावर असल्याचे प्रस्तुत अभ्यासावरून निष्पन्न होते. परंतु प्रकल्पलाभक्षेत्रात अशा प्रकारची वनसंपदा लागवड होईलच याची खात्री देता येत नाही. कारण प्रकल्पबाधीत प्रती कुटुंब वनसंपदेची सरासरी ८२८.१३ वृक्ष इतकी तर नियंत्रण समूह प्रती कुटुंब सरासरी ६०.५५ वृक्ष इतकी असल्याचे दिसून आले.

- याचाच अर्थ प्रकल्पबाधीतांना त्यांच्या वनसंपदेची योग्य मोजदाद होवून पुनर्वसन मोबदला मिळणे आवश्यक आहे. अर्थात कितीही मोबदला दिला गेला तरी प्रकल्पामुळे वनसंपदेचे होणारे नुकसान कदापी भरून येणार नाही अशीच परिस्थिती असल्याचे दिसून येते.

- प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह (प्रस्तावित लाभधारक असे गृहित धरून) यांच्या उद्दिष्टनिहाय कर्जाच्या आकडेवारीची तुलना करता असा निष्कर्ष निघतो की प्रस्तावित प्रकल्प लाभधारक (की ज्यामध्ये प्रकल्पबाधीतांचाही भविष्यात

समावेश होणार आहे) बिगर लाभधारकांपेक्षा आर्थिकदृष्टया अधिक सक्षम व विविध कृषी भांडवली वस्तूंच्या खरेदीबाबत स्वयंनिर्भर असू शकणार आहेत.

- प्रकल्पबाधीत बिगर सिंचन लाभधारक शेतकऱ्यांची सरासरी कर्ज थकबाकी (१.९३ लक्ष) प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह शेतकऱ्यांच्या सरासरी कर्ज थकबाकीपेक्षा (८०.९४ हजार) अधिक असल्याचे निदर्शनास येते. यावरून असेच अनुमान निघते की प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ प्राप्त होवून (ज्यामध्ये प्रकल्पबाधीतांचाही समावेश असणार आहे)

- प्रकल्पबाधीतांचे उत्पादकपुनर्वसनकामी म्हणजेच जमिनीच्या मोबदल्यात प्रस्तावित प्रकल्पलाभक्षेत्रात प्रती कुटुंब कमाल ४ एकर पिकावू जमीन अथवा अधिग्रहित जमिनीच्या बाजारमूल्याच्या चारपट किंमत देणे प्रस्तावित आहे. तसेच पारपोली व पारपोली गावठाण येथील मानववस्ती बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे निवास पुनर्वसनाकरिता मौजे शेळप व मौजे देवर्डे, ता. आजरा येथे अनुक्रमे १२८ व १०५ अशा एकूण २३३ निवासी भूखंडांची व्यवस्था करण्यात आली आहे.

- सापनि अहवालाचे काम अंतिम टप्प्यात असताना प्रकल्पबाधीत क्षेत्रास पुनर्भेट दिल्यानंतर प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांकडून प्रापत झालेल्या सूचना व महाराष्ट्रातील इतर सार्वजनिक प्रकल्पांच्या (उदा. मुंबई–नागपूर समृद्धी महामार्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील अरबी समुद्रकिनाऱ्यावरील नाणार स्थित तेलशुद्धीकरण प्रकल्प) अधिग्रहित जमिन मूल्यांकन व स्वेच्छा पुनर्वसनाकरिता राज्य शासनाने अवलंबिलेल्या प्रती एकर जमिन मूल्य धोरणावर आधारित प्रस्तुत अहवालाच्या शेवटी ताजा कलम (Post Script)जोडले आहे;नव्हे पुनर्वसन अथवा प्रकल्पबाधीत साधनांच्या मूल्यसमानतेविषयीचा तो दस्तऐवज आहे. कारण न्याय्य व समानतेवर आधारित पुनर्वसन व प्रकल्पबाधीत साधनांच्या समन्याय्य मूल्यांकनाचे तत्त्व लोकशाही प्रणालीत आवश्यक असल्याने प्रस्तुत अभ्यासगटाने ताजा कलम[(Post Script) **(प्रकरण:७)**]जोडले आहे त्याचे अवलोकन केल्याशिवाय प्रस्तुत अहवालाचे वाचन अथवा विचारविमर्श अपूर्ण राहील.

- निवासी भूखंड नियोजनाव्यतिरिक्त उत्पादक व आर्थिक पुरर्वसनाकरिता कमाल जमिनधारणा कायद्यांतर्गत प्रकल्पलाभक्षेत्रातील जमिनींचे अधिग्रहण करून

प्रकल्पबाधीतांना अशा जमिनींचे वाटप करण्याची तयारी कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने केली असल्याचे कागदपत्रांवरून निदर्शनास येते.

- प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनाकरीता अधिग्रहित केलेल्या जमिनी कागदोपत्री लाभक्षेत्रात येतात. परंतु प्रत्यक्षात यापैकी अनेक जमिनी उंचवट्याच्या अथवा डोंगरउताराच्या दगडांच्या (खाणी खोदकाम संपलेल्या) परिसरात आहेत असे प्रकल्पबाधीतांशी संवाद साधल्यानंतर लक्षात आले.
- अशा डोंगराळ जमिनी तांत्रिकदृष्ट्या प्रस्तावित प्रकल्प लाभक्षेत्रात येतात. परंतु अशा जमिनींचा फायदा प्रकल्पबाधीतांना होत नाही असे दिसून येते. किंबहुना या जमिनींपर्यंत पाटपाणी पोहचणार नसल्याने प्रकल्पबाधीतांना स्वखर्चाने पाईपलाईन व पंपसेटचा खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे सिंचन प्रकल्प विभागाने हा खर्च करून प्रकल्पबाधीतांच्या नवीन पुर्नवसित जमिनींपर्यंत पाणी पोहचवणे आवश्यक आहे.
- प्रकल्पबाधीतांच्या लेखी म्हणण्याप्रमाणे पुनर्वसनार्थ देवू केलेल्या अनेक जमिनी डोंगरउताराच्या व अपिकावू आहेत. अशा जमिनींची प्रकल्प विभागामार्फत अथवा जिल्हा प्रशासनामार्फत मृदा तपासणी करून प्रस्तुत जमिनींची उत्पादकता व लागवडक्षमता या भागातील ''कृषी वातावरणानुरूप'' (Agro Climatic)मान्य पिकरचनेप्रमाणे आहे किंवा नाही यासंबंधीचा निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण या जमिनी संबंधित पिकरचनेकरीता योग्य आहेत अथवा नाही हे समजल्याशिवाय न्याय्य पुनर्वसन झाले असे संबोधता येणार नाही.
- पुनर्वसनाकरिता देवू केलेल्या जमिनी तपासणीअंती अल्प उत्पादनक्षम अथवा लागवडयोग्य नसतील तर पर्यायी जमिनींची तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच लागवडक्षम नसलेल्या जमिनी लागवडयोग्य करण्याचा खर्च शासनाने देणे आवश्यक आहे उदा. सपाटीकरण, मृदाभरण... इत्यादी).
- निवास पुनर्वसनाकरिता मौजे शेळप व मौजे देवर्डे येथे अनुक्रमे १२८ व १०५ अशा एकूण २३३ निवासी भूखंडांची व्यवस्था केली आहे. परंतु ऐतिहासिकदृष्ट्या गायरान जरी सार्वजनिक अथवा कायद्याने सरकारी मालकीची जमिन असली तरीही त्यावर संबंधित गावाचाच अधिकार मान्य केला जातो.

त्यामुळे निवासी पुनर्वसन करत असताना प्रकल्पबाधीतांचा गायरानावरील हक्क अबाधित असणे आवश्यक आहे म्हणून मौजे शेळप व देवर्डे येथे निवासी पुनर्वसन करताना सरकारने गायरान जमिनींची तरतूद करावी की ज्यामुळे आदर्श निवासी पुनर्वसनाची आवश्यकता पूर्ण होवू शकेल. तसेच गायरान जमिनीसह निवासी पुनर्वसन करताना मूळ प्रकल्पबुडीत गावच्या गायरान जमिनीपेक्षा पुनर्वसन ठिकाणची गायरान जमिन कमी असेल तर तेवढ्या फरकाचा मोबदला गावास मिळणे आवश्यक आहे.

- केंद्र सरकारच्या ''भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायदा २०१३'' अन्वये निवासी पुनर्वसनाच्या ठिकाणी २५ नागरी सेवांची आवश्यकता अधोरेखित केली आहे. इतर अनेक राज्यांनी (उदा. झारखंड) ही २५ नागरी सेवांची यादी कोणताही बदल न करता स्विकारली आहे. परंतु महाराष्ट्राने मात्र सन १९९९ च्या कायद्यान्वये एकूण १८ नागरी सेवा देवू केल्या आहेत. प्रस्तुत प्रकल्पनिवासी पुनर्वसनाकरिताही हाच नियम लागू असल्याचे दिसून येते. परंतु मौजे शेळप व मौजे देवर्डे स्थित निवासी पुनर्वसन तयारी करताना शासनाने प्रस्तुत सर्व १८ सुविधाही देवू केलेल्या नाहीत. सरकारी पुनर्वसन दस्तऐवजाचे अवलोकन करता खालीलप्रमाणे वास्तव समोर येते;

| अ. नं. | नागरी सुविधांचा तपशील | नागरी सुविधांची सद्यस्थिती | | |
|---|---|---|---|---|
| | | पूर्ण | प्रगती-पथावर | काम सुरू नाही |
| १ | लोकसंख्येच्या प्रमाणात खुल्या विहीरी, विंधन विहीरी, नलीका कूप, नळाद्वारे पाणी पुरवठा योजना किंवा अन्य पिण्याच्या पाण्याची कायमची तरतूद | ? | ? | ? |
| | अ) खुल्या विहीरी | पूर्ण | | |
| २ | नळाद्वारे पाणी पुरवठा योजना | | प्रगतीपथावर | |
| ३ | योग्य दर्जाचे अंतर्गत खडीचे मार्ग आणि डांबरी पोहोच मार्ग | ? | ? | ? |
| | अ) खडीकरण करणे | पूर्ण | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १. पुर्नवसित वसाहत देवर्डे अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणे | | | |
| | २. मौजे देवर्डे पुनर्वसनकडे जाणारा पोहोच रस्ता, मोऱ्यांची बांधकामे, खडीकरण करणे, प्लॉटचे दगड बसविणे. | | पूर्ण | |
| | ब) डांबरी पोहोच मार्ग<br>१. अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | | पूर्ण | |
| | २. पोहोच रस्त्याचे डांबरीकरण करणे. | | पूर्ण | |
| ४ | बांधलेली उघडी गटारे<br>१. ० मी. रूंदीच्या रस्त्यावरील उघड्या गटारीचे संधानकामध्ये बांधकाम | | प्रगतीपथावर | |
| | २. १२ मी. रूंदीच्या रस्त्यावरील उघड्या गटारीचे संधानकामध्ये बांधकाम | | प्रगतीपथावर | |
| ५ | रस्त्यावरील दिव्यासह विज पुरवठा आणि आवश्यक थ्री फेज कनेक्शन.... | | काम सुरू नाही | |
| **अ) आणि दवाखाना किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र, बँक, डाकघर, मुलांसाठी बगीचा इ. साठी जागा शाळा** | | ? | ? | ? |
| ६ | आर्थिक सहाय्य दिलेले व्यक्तीगत शौचकूप आणि अत्यंत गरजेचे | ? | ? | ? |
| ७ | प्रसाधन असलेली योग्य दर्जाची शाळा, खेळाचे मैदानासाठी जमीन | ? | ? | ? |
| ८ | चबुतरा, वीज पुरवठा, पाणी पुरवठा असलेली दहनभूमी आणि आवश्यकता असल्यास दफनभूमी पोचमार्गासह<br>१. दफनभूमी शेड | | प्रगतीपथावर | |
| ९ | ग्रामपंचायत कार्यालय चावडी किंवा समाज मंदीर | | प्रगतीपथावर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १. समाज मंदीर | | | |
| १० | बस सेवेकरीता बस थांब्यासह जमीन | काम सुरू नाही | | |
| ११ | बाजारासाठी विकसित जमीन | ? | ? | ? |
| १२ | गावठाणांच्या भावी विस्तारासाठी जमीन | ? | ? | ? |
| १३ | सार्वजनिक प्रयोजनासाठी नोंदणी झालेल्या संस्थांसाठी जुन्या गावठाणामध्ये जमीन | ? | ? | ? |
| १४ | पाण्याच्या हौदासहीत गुरांच्या तळासाठी जमीन | काम सुरू नाही | | |
| १५ | क्रिडांगणासाठी जमीन | ? | ? | ? |
| १६ | आवश्यक असेल तिथे मळणासाठी जमीन, खळवाडी | ? | ? | ? |
| १७ | गायरान जमिन सरकारी जमीन उपलब्ध असल्यास | ? | ? | ? |
| १८ | आवश्यकता असल्यास शेतजमिनीकडे जाणारा पोचरस्ता शेती पोहोच रस्त्याचे मातीकाम | काम सुरू नाही | | |

- मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे येथील प्रकल्पबाधीत जमिनींवर भरपूर प्रमाणात शेतकऱ्यांच्या मालकीची खाजगी वनसंपत्ती निदर्शनास आली. प्रस्तुत वनसंपत्तीच्या मोजदानात त्रुटी असल्याचे प्रकल्पबाधीतांचे म्हणणे आहे. अभ्यास समुहासाठी असेच निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा खाजगी वनसंपत्तीचे

- योग्य मोजदाद होवून प्रकल्पबाधितांना त्याबद्दलचा मोबदला मिळणे आवश्यक आहे.

- प्रकल्पबाधितांच्या खाजगी वनसंपदेचे मूल्य निश्चित करताना बाजारमूल्याचा विचार करण्यात आला नाही असे अभ्यासांती निष्पन्न होते. वनसंपदेचे मूल्यांकन बाजारमूल्यापेक्षा कमी असल्याने प्रकल्पबाधितांचे नुकसान होत असल्याचा निष्कर्ष निघतो. त्यामुळे अशा वनसंपदेचे वर्तमान बाजारमूल्य विचारात घेवून

प्रकल्पबाधितांना मोबदला देवू करणे आवश्यक आहे. किंबहुना बाजारमूल्यापेक्षा काही पट अधिक मोबदला मिळणे आवश्यक आहे.

- प्रकल्पबाधितांना त्यांच्या बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यात प्रकल्प लाभक्षेत्रात अधिग्रहण करून प्रस्तावित लाभक्षेत्रातील ओलीताखालील जमिन देण्याचे धोरण आहे. परंतु अशा भूमिलाभाची मर्यादा प्रती कुटुंब ४ एकर एवढी मर्यादित आहे. त्यामुळे ४ एकरपेक्षा जास्त जमिन जर प्रकल्पबाधीत होत असेल तरीही अशा कुटुंबास लाभक्षेत्रात फक्त ४ एकर एवढीच पर्यायी जमिन प्राप्त होत असल्याने पुनर्वसन होत असताना प्रकल्पबाधितांचे नुकसानच होत आहे असे दिसून येते. अशा कुटुंबांना अधिक विशेष सानुग्रह अनुदान देणे न्यायाचे असेल.

## प्रकरण: १

# जलसिंचन धोरण व भूसंपादनविषयक विवेचन

**प्रास्ताविक:**

महाराष्ट्रातील लघु, मध्यम आणि मोठ्या धरणांची संख्या, पाटबंधारे खात्यातील गुंतवणूक आणि पाटबंधारे खात्यातील कार्यस्त मानवी श्रमाचा विचार केला तर राज्याचा जलसिंचन विभाग देशात सर्वात मोठा असल्याचे निष्पन्न होते. देशातील एकूण मोठ्या प्रकल्पांपैकी ३५ टक्के सिंचन प्रकल्प महाराष्ट्रात आहेत. परंतु राज्यातील स्थूल पिकक्षेत्राच्या (GCA) फक्त १८ टक्के एवढेच क्षेत्र सिंचनाखाली असणे हे एक विदारक वास्तव आहे. म्हणजेच देशातील सर्वाधिक गुंतवणुक आणि धरणांची महत्तम संख्या असलेल्या राज्याचे सिंचन क्षेत्र इतर राज्यांच्या व राष्ट्रीय सरसरीच्या तुलनेत देशात कमी असल्याचे दिसून येते (नारायणमुर्ती,२०१३)[१].राष्ट्रीय जल आयोगाच्या अहवालानुसार राज्यातील मध्यम आणि मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या जल उपयोग क्षमतेची राष्ट्रीय जल उपयोग क्षमतेशी तुलना केली तर अत्यंत असमाधानकारक किंवा किमान पातळीवर असल्याचे दिसून येते. याकरिता बेभरोशी पर्जन्यमानालाच फक्त दोष देता येणे शक्य नाही. तर वर्षानुवर्षे कारक ठरलेल्या इतर कारणांचाही यासंबधी उहापोह करावा लागेल. याचे महत्वाचे कारण राज्यातील अनावश्यक पिक पध्दती होय.राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष असूनही ऊस लागवडीखालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत असल्याचा अनुभव आहे. सन १९७१-७२ ते सन २०११-१२ च्या दरम्यान महाराष्ट्रातील ऊस लागवडीखालील क्षेत्र सहा पटींनी वाढले आहे (कित्ता,२०१३)[२]. याच काळात देशपातळीवर मात्र ऊस पिकाखालील क्षेत्रात झालेली वाढ१.७८ पट एवढी सिमित असल्याचे दिसून आले. परिणामे ३.५ टक्के ऊसाखालील क्षेत्र राज्यातील ६० टक्के पाणी वापरते अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशी परिस्थिती असल्याने महाराष्ट्रातील जल उत्पादकता अत्यंत किमान पातळीवर राहिली. उत्तरप्रदेशाची जल उत्पादकता महाराष्ट्रापेक्षा १०६ टक्के अधिक आहे(CAG, 2012)[3]. प्रति किलो साखर उत्पादनाकरिता उत्तरप्रदेशपेक्षा महाराष्ट्रात १००० लिटर अधिक पाण्याचा वापर केला जातो. याची प्रमुख कारणे राज्यातील सिंचन पध्दती आणि अनियंत्रित पाणी वापरात सापडतात.

[1] *A Narayanmoorthy (2013), Diagnosing Maharashtra'a Water Crisis, Economic and Political Weekly, Oct. 12, 2013, Vol. VLVIII, No. XXXXI, PP. 23.*
[2] *A Narayanmoorthy (2013), Diagnosing Maharashtra'a Water Crisis, Economic and Political Weekly, Oct. 12, 2013, Vol. VLVIII, No. XXXXI, PP. 23.*

[3] *Govt of India (2012), Comptrol and Accountant General of India*

महाराष्ट्र जल व. सिंचन आयोगाच्या (सन १९९९)[४] अहवालानुसार सन १९३० पर्यंत राज्यातील गोदावरी, तापी व कृष्णा खोऱ्यात पाण्याचा तुटवडा अधिक प्रमाणात भासू शकतो. एकंदरीत काय तर महाराष्ट्राची कृषी व जल अर्थव्यवस्था एकंदरीतच अकार्यक्षम राहिल्याचे सिध्द होते. अशा प्रकारची सरकार निर्मित सिंचन व्यवस्थेची अकार्यक्षमता एका बाजूला असताना विदर्भात एकूण १.२८ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता धारित जवळपास ७००० मालगुजारी तळी दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत. त्याकडे मात्र सर्वदुर दुर्लक्ष झाल्याने विदर्भाच्या सिंचनक्षमतेवर गंभीर मर्यादा आल्या आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे निधीचा, एकूण वित्तिय तुट४७.६०टक्क्यांपर्यंत पोहचली आहे. (केळकर अहवाल, २०१३)[५]. पर्यायाने विदर्भाच्या एकूण जलसिंचन तुटीचे प्रमाण सुद्धा ३५.२६ टक्क्यांपर्यंत पोहोचले (केळकर अहवाल, २०१३)[६].

## १.१: जलसंपदा व राज्य सरकार:

संघराज्य प्रशासाकिय तरतूदीअंतर्गत राज्य यादी २(१७) अन्वये जलसिंचन हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारित येतो. त्यामुळे राज्यातील जलस्त्रोतांचे विकास,नियोजन,जपणूक व सवंर्धनाची जबाबदारी संबधित राज्य सरकारची असते.वास्तविक पाहता जलस्त्रोत हा नैसर्गिकदृष्टया स्वयंनुतनिकृत सार्वजनिक वस्तू असून ती राज्यातील लोकांच्या उपयोगीतेयोग्य बनविण्याची राजकोषीय जबाबदारी संबधित राज्य सरकारची मानली जाते. याकामी राज्य सरकारने जलस्त्रोत व्यवस्थापनाकरिता आवश्यक त्या सर्व बाबींवर पर्याप्त खर्चाचे वेळेवर नियोजन करणे अपेक्षित आहे.

हे सर्व करत असताना राज्य सरकारने पुरेसा निधी वेळेवर उपल्ब्ध करुन त्याचा योग्य विनियोग करणे व प्रस्तावित वेळेत प्रकल्पाची कामे पूर्ण करुन सिंचन सुविधांचे जाळे निर्माण करुन राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देणे अपेक्षित आहे. अलिकडच्या काळात वेगाने होणारे शहरीकरण व ग्रामीण आणि नागरी औद्योगिकरणामुळे पाण्याची गरज अनेक पटींनी वाढली आहे. पर्यायाने पाणी वापराचा अग्रक्रम बदलला गेला. उदाहरणार्थ दोन दशकांपूर्वी पुणे शहराकरीता खडकवासला धरणातून प्रतिवर्षी चार दशलक्ष घनमिटर इतके पाणी वापरण्याची आवश्यकता भासत असे. त्यात आता किमान चार पट वाढ झाली आहे. अशा प्रकारच्या जलमागणी वृ.द्धीमुळे एकूणच राज्याच्या निर्मित जलस्त्रोतांवर ताण निर्माण झाला आहे.

---

[4] *Govt of Maharashtra (1999), Maharashtra Irrigation Commission.*
[5] *Govt of Maharashtra/ Vijay Kelkar (2013), Report of the High Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra, GoM, Plannind Department, Oct. 2013.*
[6] *Govt of Maharashtra / Vijay Kelkar (2013), Report of the High Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra, GoM, Plannind Department, Oct. 2013.*

पर्यायाने उर्वरित जलक्षमतेचा पूर्णपणे वापर करण्याकरिता राज्यसरकारने पर्याप्त अर्थिक तरतूद करुन राज्यातून वाहुन जाणारे पाणी अडवीने आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय जल लवादाच्या निवाड्याप्रामाणे आंतरराज्य नदीखोऱ्यातील आपल्या वाट्याचे पाणी अपेक्षित वेळेत अडविणे आवश्यक असल्याने प्रत्येक नदी खोऱ्यातील धरणे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे आव्हानही राज्यासमोर आहेच.

## १.२: प्रकल्पपूर्तीस विलंब व व्ययवृध्दीची समस्या:

ज्याप्रमाणे महाराष्ट्रराज्य जलसिंचन प्रकल्पसंरचनेबाबत देशात अग्रेसर आहे त्याच प्रमाणात जलसिंचन प्रकल्पपूर्ती दिरंगाईतही राज्य संपूर्ण देशात वरच्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रकल्प पूर्तीचा कालावधी वाढून त्याचे लाभ मिळण्यास विलंब तर होतोच परंतु प्रकल्पाचा व्यय अनेक पटींनी वाढतो. महाराष्ट्रात जवळजवळ ३०२ प्रकल्पांची कामे गेली १५ वर्षे सुरु अथवा अर्धवट अवस्थेत अपूर्ण आहेत. या सर्व प्रकल्पांच्या प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनात अक्षम्य दिरंगाई झाल्यामुळे प्रकल्प व्ययात ४२८ टक्के इतकी वृध्दी झाल्याचे दिसून येते (CAG, 2012)[7].

अशा प्रकारच्या व्यय वृध्दीमुळे इतर विकासकामांवरील खर्च कमी करुन तो निधी अशा अपूर्ण प्रकल्पांवर खर्च करावा लागतो. पर्यायाने तात्कालीक गरजेचे प्रकल्प मागे पडून विकास तूट निर्माण होते. प्रकल्पपूर्तीच्या विलंबास अनेक कारणे दिली जातात. एकतर सिंचन प्रकल्पांना मोठा निधी आवश्यक असतो.परंतु सरकारकडून सुरुवातीस उपलब्धतेनुसार शक्य तितक्या निधीची तरतुद केली जाते. परिणामे प्रकल्पाचे काम पूर्ण क्षमतेने सुरु होवू शकत नाही. त्यामुळे वेळेचा अपव्यय होवून मूळ व्ययात वृद्धी होणे अपरिहार्य बनते. तसेच जलसिंचन प्रकल्पांना लागणारी जमिन व त्या अनुशंगाने करावे लागणारे भूमी अधिग्रहण हा तर प्रकल्पपूर्तीच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा मानला जातो. कारण पूर्वीच्या प्रकल्पबाधीतांचा अनुभव चांगला नसल्याने संभाव्य प्रकल्पबाधीत शेतकरी सहजा सहजी जमीन देण्यास तयार होत नाहीत. जमिन अधिग्रहण,मूल्यांकन व पुनर्वसनकामी सरकारचा महसूलविभाग जबाबदार असतो. परंतु जलसिंचन आणि महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे अनेक बाबींवर एकमत होत नसल्यामुळे याकामी अधिकच विलंब झाल्याची उदाहरणे सर्वश्रुतआहेत. लोकशाही व्यवस्थेत प्रकल्पातील राजकीय हस्तक्षेप शक्यतो टाळला जात नाही. नव्हे तशी अपेक्षाही करणे योग्य नाही. अनेकदा राजकीय अनुनयापोटी मूळ प्रकल्पाची क्षमता नंतरच्या टप्प्यावर वाढवून अधिक पिकक्षेत्र लाभक्षेत्रात सामाविष्ट करण्याकरिता राजकीय हस्तक्षेप होतो. परिणामे प्रकल्प खर्च आणि पुरनवसनाची समस्या गंभीर स्वरुप धारण

[7] *Govt of India (2012), Comptrol and Accountant General of India*

करुन प्रकल्पपूर्तीस अक्षम्य विलंब लागतो. अशी अनेक उदाहरणे देता येतील. तत्सम समस्येपासून सरदार सरोवर प्रकल्पही अलिप्त राहू शकला नाही.

त्यामुळे प्रकल्पपूर्तीत अनेक दशकांचा विलंब झाला. प्रकल्प आकारमान, लाभक्षेत्रात तद्नंतर केलेला बदल व पाणी वाहून नेण्यासाठी पाट व चाऱ्यांची लांबी नंतरच्या टप्प्यात वाढविल्यामुळे प्रकल्प व्यय, भूमिअधिग्रहण व पुनर्वसनाच्या समस्या अधिकच गंभीर स्वरुप धारण करतात. परिणामे प्रकल्पबाधीतांची आंदोलने ऊभी राहून प्रकल्पपूर्तीत काही वर्षेच नव्हे तर दशकांचाही विलंब लागतो. अशा दिर्घकालीन विलंबामुळे प्रकल्पपूर्तीचा व्यय अनेक पटींनी वाढतो. काही बहुउद्देशीय मोठे प्रकल्प राज्य व केंद्र सरकाच्या सामायिक खर्चातून साकारत असतात. अशा प्रकल्पामधील केंद्राच्या हिस्याचा निधी येण्यास काही वेळा विलंब लागतो. अशा वेळी प्रकल्प वेळेत मार्गी लावण्यासाठी जर राज्याने स्वत:च्या वित्तीय तरतुदीतून हा खर्च पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर प्रस्तूत प्रकल्प मार्गी लागण्यास मदत होते. परंतु त्या बरोबरचे राज्यातील इतर प्रकल्प मागे पडतात. राजकीय हस्तक्षेपाचे हे एक नमुनेदार उदाहरण मानले जाते. अनेकदा तर प्रशासकीय बाब म्हणून एका प्रकल्पावरील अधिकारी तथा अभियंते बदलून इतरत्र प्रकल्पावर रवानगी केले जातात. किंवा अशा कर्मचाऱ्यांच्या जागीनवीन कर्मचारी तात्काळ दिला जात नाही. त्यामुळे प्रकल्पपूर्तीत अक्षम्य विलंब झाल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. पर्यायाने व्ययवृध्दी तर होतेच परंतुपुनर्वसनाची समस्याही उग्र स्वरुप धारण करते. प्रशासकीय सहकार्य आणि सरकारच्या विविध विभागांतील बेबनाव प्रकल्प दिरंगाईस अनेक ठिकाणी व अनेकवेळा कारणीभूत ठरल्याचाही अनुभव नवीन नाही. अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्रातील वहुउद्देशीय सिंचन प्रकल्प प्रदिर्घ काळ रखडले असून अशा प्रकल्पांच्या मूळ व्ययात हजारो कोटींची वृध्दी झाली आहे. त्यामुळेच राज्यातील कार्यपूर्तीत दिरंगाई झालेल्या प्रकल्पांचा समस्यानिहाय आढावा घेवून संबधित प्रकल्प शक्य तितक्या वेगाने पूर्ण होणे सरकारच्या अंदाजपत्रकीय खर्च, पुनर्वसन व कृषी, औद्योगिक व नागरीविकासाच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. प्रस्तूत सर्फनाला सिंचन प्रकल्प गेली वीस (२०)वर्षे प्रलंबीत आहेच. त्यामुळे प्रकल्प खर्चात झालेली वृध्दी हे एक निर्विवाद सत्य आहे. परंतु वीस (२०)वर्षापासून प्रस्तावित अधिग्रहण शेतजमीनीवर प्रकल्पबाधीत शेतकरी काहीही गुंतवणूक अथवा सुधारणा करु न शकल्यामुळे संपूर्ण एका पिढीचे अक्षम्य आर्थिक नुकसान तर झाले आहेच परंतु प्रस्तावित लाभक्षेत्रापर्यंत पाणी न पोहचल्यामुळे लाभक्षेत्रात येऊ शकणाऱ्या शेतीचाही विकास होवू शकला नाही. नाही प्रस्तावित लाभक्षेत्रात रोजगाराच्या कृषीव्यतिरिक्त इतर संधी निमार्ण होवू शकल्या. अशा सर्व समस्यांचा उहापोह करुन प्रस्तुत सर्फनाला प्रकल्प पूर्णत्वास जावून विस्थापितांचे आदर्श पुनर्वसन कसे होवू शकेल इत्यादी सर्व घटकांचा विचार करुन प्रस्तुत प्रकल्पाचा सामाजिक परिणाम मूल्यांकन अभ्यास

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण केला असून सदरचा अहवाल यानंतरच्या विविध प्रकल्पांच्यादृष्टीने समस्यांचा लेखजोखा करुन उपाय सुचीविन्याचा प्रयत्न करु इच्छित आहे.

### १.३: न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने:

बहुउद्देशिय नदी प्रकल्पपूर्तीकामी धरणांचे बांधकाम,जलाशय नियोजन, पाट व चारी खुदाई इत्यादी करीता मोठ्या प्रमाणात जमिनीची व पर्यायाने अधिग्रहणाची आवश्यकता भासते. त्यामुळे विस्थापन व पुनर्वसनाचे नियोजन ही एक मोठी समस्या मानली जाते. भूमि अधिग्रहणात फक्त शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनींचाच समावेश नसतो तर केंद्र व राज्य सरकाच्या विविध विभागांच्याही जमिंनीचे कित्येकदा अधिग्रहण करावे लागते. त्याकरीता प्रत्येक विभागाची उद्दिष्टे व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे एक विभाग दुसऱ्या विभागास प्रकल्पपूर्तीकामी आवश्यक भूमिअधिग्रहणाकरिता सहकार्य करेलच असे नाही. वन विभागाचे उदाहरण या बाबतीत विशेष महत्वाचे ठरते. इतर सरकारी विभागाच्या प्रकल्पपूर्तीकरिता जर वन विभागाची जमीन अधिअग्रहीत करावी लागणार असेल तर त्याबदल्यात इतर ठिकाणची वन जमीनीच वन विभागाला पर्याय म्हणून देवू कराव्या लागतात. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटीश व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने जलसिंचन, औद्योगिकीकरण, शहरीकरण, संरक्षण विभाग, रेल्वे इत्यादीकरीता अनेकदा भूमिअधिग्रहण केले.परंतु मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बहुतांश प्रकल्पांच्या बाबतीत अनुत्तरितच राहीला असे दिसून येते. अशा अनुभवामुळे आणि कृषी क्षेत्रासमोरील इतर समस्यांमूळे भारतात विविध शेतकरी चळवळी उभ्या राहून त्यांनी सरकारसमोर आपले म्हणणे मांडण्यास व प्रसंगी आंदोलनाची तयारी करण्यास प्रारंभ केला. यातूनच नंतरच्या काळात आदर्श पुनर्वसन व अधिग्रहण आणि अधिग्रहीत जमिनीच्या मोबदल्याची समस्या अधिक तिव्र स्वरुप धारण करु लागली. प्रकल्पबाधींतांच्या रोजगार समस्येची जाणीव पूर्वी सरकारला नव्हती असेच काहीसे झाले.त्यामुळे नंतरच्या प्रकल्पबाधीतांनी रोजगार समस्येकडे अंगुलीनिर्देश करुन सरकारला विचार करण्यास भाग पाडले. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकीकरणाकरिता भूमि अधिग्रहण केलेल्या प्रकल्प बाधितांना मुलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने त्यांना स्थलांतर करुन शहरी झोपडपट्टी व दारिद्रयाचे जीवन जगावे लागले.पर्यायने सरकाराला न्याय्य विस्थापन व पुनर्वसन धोरणाचा मसुदा तयार करण्याची निकड भासली. साधारपणे सन १९८० च्या दशकात भारत सरकारने सर्व प्रकल्पबाधीतांच्या न्याय्य पुनर्वसनाकरिता विचार करणे सुरु केले. या विषयावर अनेक वेळा मंत्रीमंडळ व सार्वजनिक पातळीवर चर्चा झाल्या (Ramaswami Iyer, 2007)[8]. तसेच याकरिता मंत्रीगटाची स्थापना करुन विचारविनिमय घडवून आणला (Ramaswami Iyer,

[8] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic ajnd Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.*

2007)[9].तब्बल दोन दशके चर्चा व मसुदा आणि पुनर्मसुदा तयार करण्यात गेली. परंतु योग्य मार्ग निघू शकला नाही. पर्यायाने मसुदा तयार होण्यात अक्षम्य दिरंगाई झाली. शेवटी ऑक्टोबर२००६ मध्ये ''राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००६'' चा मसुदा चर्चेकरीता समोर आला. त्यानंतर आलेल्या सूचनांची दखल घेवून भारत सरकाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने शेवटी राष्ट्रीय पुनर्वसन कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम हाती घेतले. यातूनच नंतर ''नॅशनल रिहॅबिलिटेशन अँड रेसेटलमेंट पॉलिसी २००७'' चा अंतीम मसूदा तयार झाला (Walter Fernandez, 2104)[10].

तद्नंतर पुढे ७ सप्टेंबर २०११ रोजी नवीन भूमि अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायद्याचा मसुदा लोकसभेत मांडला गेला. एकूण २३५ सदस्यांपैकी २१६ सदस्यांनी मसुद्याच्या बाजूने तर १९ सदस्यांनी विरोधात मतदानकेल्याने मसुदा मंजूर झाला. दिनांक २९ ऑगस्ट२०१३ रोजी मसुदा लोकसभेत तर दिनांक ४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यसभेत पारित झाल्याने दिनांक २७ सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही केली. आणि दिनांक १ जानेवारी २०१४ रोजी कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. प्रस्तुत कायदा पारित होऊन प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत देशात सार्वजनिक अथवा सरकारला सामाजिक व आर्थिकदृष्टीने लोककल्याणकारी वाटणाऱ्या खाजगी व सार्वजनिक प्रकल्पांकरीता ब्रिटीश पारित सन १८९४ च्या कायद्याअंतर्गतच जमिनीचे अधिग्रहण करण्याची तरदूत अंमलात आणली जात असे. परंतु सन १८९४ च्या कायद्यांतर्गत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी सरकारवर असत नव्हती. कारण सन १८९४ च्या ब्रिटीश कायद्यात भूमि अधिग्रहण, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व पुनरस्थैर्याच्या बाबतीत जबाबदारीचे उत्तरदायीत्व सरकारवर नव्हते. परंतु अशा उत्तरदायीत्वाची जबाबदारी सन २०१३ च्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणामुळे सरकारवर व पर्यायाने प्रकल्प विभागावर आली. इतकेच नव्हे तर या धोरणाअंतर्गत प्रकल्पबाधितांना पुनर्वसनाबरोबरच योग्य मोबदला देण्याचीही जबाबदारी संबधित राज्य अथवा केंद्र सरकारच्या प्रकल्प विभागावर देण्यात आली. तसेच या कायाद्यामुळे भूमि अधिग्रहण आणि मोबदल्याच्या बाबतीत पारदर्शकतेचा आग्रह धरण्यात आला हे विशेष.

प्रस्तुत कायद्यात विस्थापितांच्या पुनर्वसनाकरीता संबधित प्रकल्प विभागाने मध्यस्ताची (Ambudsman) नेमणूक करणे बंधनकारक करण्यात आले. परंतु या कायद्याअंतर्गत प्रकल्पग्रतांना न्यायालयीन प्रक्रियेत जाण्याकरिता फारशी संधी उपलब्ध नसल्याने त्यांचे सरकारवरचे अवलंबित्व अधिक राहते. तथापि प्रस्तुत कायद्याच्या आधिन राहून महाराष्ट्र शासनाने भूमि अधिग्रहण व

---

[9] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic ajnd Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.*

[10] *Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Economic and Political Weekly, March 20, 2004, PP. 1191.*

पुनर्वसनकामी सकारात्मक भूमिका घेवून प्रकल्प विस्थापितांना मोबदला व पुनर्वसन आणि पुर्ननिवासाकरिता विशेष प्रयत्न करण्याचे आरंभिले आहे हे नक्कीच.प्रकल्पग्रस्तांना मोबदला देताना जमिनीच्या वर्तमान बाजारमूल्याच्या चारपट किंमत व पुर्ननिवासाकरिता भूखंड तसेच शक्य असेल तेथे प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमिन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो हे विशेष.

प्रस्तुत सर्फनाला मध्यम पाटबंधारे प्रकल्पात पारपोली व पारपोली गावठाण अशा दोन रहिवासी वस्ती बुडीत क्षेत्रात येतात. तर मौजे खेडगे गाव बुडीत क्षेत्रात येत नाही. परंतु गावातील शेतकऱ्यांची शेती मात्र प्रकल्प बुडीत क्षेत्रात येते. या सर्व ग्रामस्थांना त्यांच्या बुडीत जमिनींच्या मोबदल्यात प्रकल्प लाभक्षेत्रात जमिनी देण्याची तरतूद कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने केल्याचे कागदपत्र पडताळणी व प्रत्यक्ष स्थान भेटींवरून आमच्या लक्षात आले. तसेच प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या पुनर्निवासाकरिता मौजे शेळप व देवर्डे अशा दोन ठिकाणी वसाहतीकरिता भूखंड विकसित केले आहेत. प्रस्तुत वसाहतींमध्ये शाळा, दवाखाना, समाजमंदिर इत्यादी सामाजिक सुविधा उभारण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. परंतु तरीही प्रकल्पबाधितांना आपली शेतजमीन आणि गाव सोडताना सामाजिक व आर्थिक समूळोच्चाटनाची (Cultural Genocide) जाणीव भेडसावत असल्याने त्यांच्या अद्यापही काही तक्रारी किंवा अडचणी असल्याने प्रस्तुत सर्फनाला पाटबंधारे प्रकल्प गेली दोन दशके प्रलंबित राहीला आहे. उपरोल्लेख केल्याप्रमाणे अशा दीर्घकाळ प्रकल्प प्रलंबनामुळे एकतर प्रकल्प व्यय वृद्धी होते. तसेच प्रकल्प लाभक्षेत्रात सर्वांगीण संक्रमण होऊन अपेक्षित विकासाच्या संधी दीर्घकाळ पुढे ढकलल्या जातात. किंवा कायमस्वरूपी गमवाव्या लागतात.प्रकल्प दिरंगाईच्या समस्या व्ययवृद्धी अथवा विकास दिरंगाई इतक्याच सीमित नसतात तर अशा दिरंगाईमुळे प्रकल्पबाधितांच्याही जीवन विकासात अडथळे निर्माण होतात. कारण अधिग्रहणाची घोषणा झाल्यानंतर संबधित प्रकल्पबाधितांची गुंतवणूक व कृषी सुधारणा क्षमता आपोआप कुठींत होवून संपुष्टात आल्याचे दिसून येते. सरकारवरही व्ययवृद्धीचा ताण येतो. इतकेच नव्हे तर यामुळे इतर प्रकल्पांवरील गुंतवणुकीवरही त्याचा दूरगामी परिणाम होतच असतो. या व इतर बाबी लक्षात घेवून प्रस्तुत प्रलंबित सर्फनाला मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागामार्फत आरंभीला असून अहवालात भविष्यातील अशा सर्व घटकांचा साकल्याने विचार व अभ्यास करून प्रस्तुत प्रकल्प अहवाल तयार करण्याचा प्रयत्न आमच्यामार्फत केला आहे.

## प्रकरण: २

# माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती

**प्रास्ताविक:**

प्रस्तुत अहवालाच्या प्रकरण एकमध्ये नमूद केल्याप्रमाणे हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम प्रकल्प ऑक्टोबर १९९८ पासून म्हणजे गेली दोन दशके प्रलंबित आहे. त्यामुळे प्रकल्पव्ययात वृद्धी होवून सातशे कोटी रूपयांपेक्षा जास्त झाला आहे. प्रस्तुत प्रकल्प विलंबाचे महत्वाचे कारण म्हणजे भूमि अधिग्रहण व पुनर्वसन आणि पुनर्वसनासंबंधी निर्माण झालेली तेढ होय. याच प्रमुख समस्येचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास हाती घेतला असून प्रस्तुत अभ्यास मुख्यत्वे खाली नमूद केलेल्या उद्दिष्टपूर्तीवर निर्भर आहे.













### २.१: अभ्यासाची उद्दिष्टे :

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल खाली नमूद केलेल्या उद्दिष्टांवर आधारित आहे.

- प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यास करणे.
- प्रकल्प बाधित व लाभ धारकांवरील संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणामांची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य संधी, व्यय व त्याग या घटकांची चिकित्सा करणे.
- डिसेंबर २०१३ च्या भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुर्ननिवास कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसन प्रगतीची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीतांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक पुनर्वसनाची चिकित्सा करणे.
- भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुर्ननिवासविषयक प्रगतीचा आढावा घेणे.
- पर्यायी जमिनी व पर्यायी निवासी पुनर्वसनाची प्रगती आणि सद्यस्थिती तपासणे.

### २.२: अभ्यास पद्धती:

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांद्वारे माहितीचे संकलन, पृथक्करण व विश्लेषण करून अहवाल तयार करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील पारपोली, गावठाण व खेडगे गावांमधील सर्व प्रकल्पबाधीत कुटुंबे आणि प्रस्तावित अधिग्रहण जमिनींवर मालकी हक्क असलेल्या कुटुंबासाठी योग्य रचना केलेली मुलाखत अनुसूचीद्वारे अभ्यास केला. जनगणना पद्धतीद्वारे जमीन किंवा घरांची, खाजगी जमीन, सार्वजनिक जमीन आणि इतर हानी झाल्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रकल्पबाधीत झालेल्या कुटुंबांवर त्याचा परिणाम शोधण्यासाठी संबंधित कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.

### २.३: अभ्यासाची पूर्वपिठीका:

प्रस्तुत अभ्यासाकरीता सर्व प्रकल्पबाधीत कुटुंबांची जनगणना (Census) पद्धतीनुसार भूमी अभिलेख व क्षेत्रीय तपासणीवर आधारित अचूकपणे सत्याधारीतप्राथमिक माहिती संकलित केली. प्रकल्पबाधीत क्षेत्राचा सामाजिक–आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ ओळखण्यासाठी अभ्यास गटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीवर आधारीत ग्रामसभा सदृश्य वातावरणात समूहचर्चाघडवून आणल्या. क्षेत्र भेटीद्वारा संकलित माहितीवर आणि प्रकल्पग्रस्तांबरोबर अधिकाची सल्लामसलत करून, प्रकल्पाच्या

सकारात्मक व नकारात्मक सामाजिक व आर्थिक परिणामांची व्याप्ती आणि तीव्रतेचे मूल्यांकन केले. तसेच भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवासविषयक तथ्ये जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पर्यायी जमिनी व पर्यायी रहिवासी जागेविषयक वास्तव आकलन व जाणकारी करून घेतली. तसेच सामाजिक प्रभाव व्यवस्थापन योजनेत समाविष्ट करण्यासाठी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक व्यय आणि लाभ तसेच जमीन गमावणाऱ्या आणि विस्थापित होणाऱ्या कुटुंबांच्या उत्पन्न घटीचा धोका आणि अशा प्रस्तावित विस्थापित तसेच प्रकल्पबाधीत कुटुंबांचे आदर्श पुनर्वसन व पुनर्स्थापनाविषयी उभयपक्षी स्वीकारार्ह योजना तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. पारपोली, पारपोली गावठाण व खेडगे या तीन प्रकल्पबाधीत वस्तींतील लोकांसोबत ग्राम पंचायत व ग्रामदेवालायात सार्वजनिक सुनवाई दिनांक २७ नोंव्हेंबर २०१७ पासून आयोजित केली होती. या बैठकीत प्रकल्पबाधीत क्षेत्रातील सापनिचे (यानंतर सामाजिक परिणाम निर्धारण असे वाचावे) मुख्य निष्कर्ष तसेच अंतिम निष्कर्ष, अतिरिक्त माहिती आणि अंतिम सापनि अहवालात इत्यादी विषयांवर विचार करण्याबाबत विचारविमर्श केला गेला. सार्वजनिक सुनावणी, समूह चर्चा (व्हिडिओ रेकॉर्डिंग) आणि छायाचित्रे इत्यादी बाबी सदर अहवालात आवश्यक तेथे विश्लेषणासह सादर केले आहे.

## २.४: सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती:

### २.४.१:सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया:

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवालात प्रलंबित हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाबाबत अपेक्षित असलेले सकारात्मक व नकारात्मक बदल तसेच प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम समजणे, मोजणे आणि त्याकरिता संवाद साधने अत्यंत आवश्यक होते. सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरांचे मोजमाप करण्यासाठी खालील पद्धतीचा वापर करण्यात आला. अपेक्षित, सुयोग्य, सत्याधारित व पृथक्करणक्षम माहिती संकलनाकरिता अभ्यास गटासमोर खाली नमूद केलेले प्रमुख प्रश्न होते;

१. कुणाकडून कोणत्या घटकांविषयी माहिती संकलित करावी?

२. अपेक्षित माहिती संकलन कसे साध्य करावे?

३. नेमकी कोणत्या प्रकारची माहिती संकलन करणे आवश्यक आहे?

४. संबंधित माहिती संकलन सुयोग्य व अचूकपणे कसे करता येईल?

५. संकलित माहितीच्या सहाय्याने अचूक प्रकल्प परिणाम कसे निश्चित केले जावू शकतात?

६. प्रलंबित प्रकलपाचे अचूक परिणाम दर्शविणारी माहिती म्हणजे नेमकी कोणती माहिती व आकडेवारी असू शकेल?

७. संकलित माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करण्याचा अचूक व सुयोग्य मार्ग अथवा पद्धती कोणत्या असू शकतात?

८. प्रकल्पबाधीतांबरोबरील संवादातून नेमके काय साध्य होणार?

९. संकलित माहिती व आकडेवारीतून निष्पन्न होणारे निष्कर्ष नेमके कोणत्या उद्दिष्टांची पूर्तता करू शकणारे असतील?.......इत्यादी

**२.५: सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे:**

अभ्यास गटाने, हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम मूल्यांकनाची योजना आखत असताना सर्वेक्षण मुनष्यबळ निवड आणि प्रशिक्षणामध्ये गुणवत्ता वेळ खर्च केला आहे. सुरुवातीस सर्वेक्षणाचा हेतू, मूल्यांकन एकक, उपलब्ध वेळ, पुढील कामाचे नियोजन आणि इतर संबंधित समस्यांबद्दल जाणून घेणे आवश्यक होते.तद्नुषंगाने सापनि अभ्यासगटाने हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम प्रकल्प पारपोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर येथील सिंचन व महसूल अधिकारी यांच्या सोबत चर्चा केली. अशी चर्चा केल्यानंतर असे लक्षात आले की संबंधित कायदे व नियमांनुसार सापनिप्रक्रियेत मूलभूतपणे तीन घटकांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे.

ते तीन घटक पुढीलप्रमाणे आहेत;

१. प्रकल्पबाधीतांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात अशा सामाजिक-आर्थिक परिस्थितीचे सविस्तर मूल्यांकन करण्याची आवश्यकता.

२. दुर्बल घटक जसेकी महिला, मुले व वयस्क यांचेवर होणारा परिणाम आणि प्रकल्पबाधीत व स्थावरविस्थापन जसेकी; घरे, वृक्षसंपदा, पशुनिवारा, जैवनैसर्गिक घटक, पशुपक्षी आणि वनसंपदेचे स्खलन व नाश इत्यादी परिणामांचा सविस्तर अभ्यास. आणि...

३. तदनुषंगिक किमान अनिष्ट परिणामांसाठी सुयोग्य आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक आणि उत्पादनक्षम पुनर्वसन व पुनर्निवासनासंबंधी उपाययोजना व एक विस्तृत योजना सुचविणे.

### २.६. प्रकल्पप्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी:

हिरण्यकेशी सर्फनाला हा महाराष्ट्र शासन पाठबंधारे खात्याचा मध्यम सिंचन प्रकल्प असून प्रलंबित मृदाधरणाच्या भिंतीची एकूण लांबी १४४० मीटर व उंची ३३.३३ मीटर (धरणमाथापातळी ७०३.५८५ मी.) इतकी असून धरणाची एकूण क्षमता ०.६ द.ल.घ.मीटर एवढी आहे. यामुळे मौजे पारपोली व पारपोली गावठाण हे शेतजमिनीसह संपूर्णपणे बुडीत क्षेत्रात येतात तर खेडगे गावातील शेतजमिन बुडीत क्षेत्रात येते. परंतु लोकवस्ती मात्र अबाधित राहते. या सर्व क्षेत्रांसाठी प्रारंभिक क्षेत्रभेट आयोजित केली आणि क्षेत्र सर्वेक्षण अभ्यास गटाने क्षेत्रे, झाडे, सामाजिक व आर्थिक आणि सांस्कृतिक मूलभूत संरचना आणि लोकवस्तीच्या भौगोलिक मर्यादांची चांगल्या प्रकारे माहिती घेतली.

### २.६.१: बहुविधस्त्रोत माहिती संकलन:

यानंतरच्या टप्प्यात सापनि अभ्यास गटाने कोल्हापूर जिल्हा सिंचन व महसूल विभागाकडून सर्फनाला मध्यम सिंचन प्रकल्पासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनींची माहिती संकलीत केली. एकत्रित केलेल्या आकडेवारीची पडताळणी करून प्रकल्पाशी निगडीत आवश्यक त्या सर्व माहितीचा आढावा घेतला. प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार करण्यासाठी उपरोल्लेखीत तीनहीप्रकल्पबाधीत लोकवस्तींची किती जमिन प्रकल्पबाधीत होते व पुनर्वाटपासाठी प्रस्तावित लाभ क्षेत्रातील कमाल धारण मर्यादोत्तर किती जमिन उपलब्ध होऊ शकते याचा प्रकल्प लाभक्षेत्र गावनिहाय सांख्यिकीय आढावा घेतला. तसेच दारिद्र्यरेषेखालील, अनुसूचित जाति, जनजाती आणि इतर मागासवर्गीय प्रकल्पबाधीत घरांचे, जाती, धर्म, लिंग आणि अन्य माहिती संकलन कामी दुय्यम स्रोत माहितीचा वापर करण्यात आला. तसेच गाववस्तीकरीता मौजे शेळप व मौजे देवर्डे येथील प्रस्तावित रहिवासी ठिकाणी क्षेत्रभेटी देवून आकलन करून घेतले. तसेच पुनर्वसनार्थ कागदपत्रांचे अवलोकनही केले.

### २.६.२: प्रकल्पबाधित, प्रतिगामी-अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह संवाद:

सापनि अभ्यास गटाने उपरोल्लेखीत सर्व प्रकल्पबाधित, प्रतिगामी-अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह इत्यादी घटकांकडून माहिती संकलित करण्यासाठी संरचित प्रश्नावली व मुक्तसंवाद, समूहसंवाद इत्यादी तंत्रांचा अवलंब केला. प्रकल्प प्रभावीत सर्व घटकांच्या सहभागाचा एक भाग म्हणून केंद्रित समूहचर्चेच्या (एफजीडी) माध्यमातून उपरोल्लेखित घटकांचा समावेश करण्यात आला.

### २.६.३: प्रश्नावली, प्राथमिक माहिती संकलन व नमुना निवड:

सर्फनाला मध्यम सिंचन प्रकल्प गेली वीस (२०)वर्षे प्रलंबित आहे. प्रलंबनाची मुख्य कारणे प्रकल्पबाधीतांकडून करावयाचे भूसंपादन, पुनर्वसन व प्रकल्पबाधीत लोकवस्तीचे स्थलांतर आणि

संपादित जमिनींचा मोबदला व पर्यायी जमिनींची तरतूद.....इत्यादी असल्याची आमच्या लक्षात आले. त्यामुळे प्रस्तुत प्रलंबित सिंचन प्रकल्पाचा सापनि निर्धारण अहवाल तयार करताना प्रकल्पबाधीतांचे सर्वांगिण न्याय्य पुनर्वसन व पुनर्निवासाची व्यवस्था होण्याच्या दृष्टिने प्रश्नावली तयार करताना प्रश्नांची विचारपूर्वक योजना केली गेली. प्रकल्प गेली वीस वर्षे रखडला असल्याने प्रकल्पबाधीत व संभाव्य प्रकल्प लाभधारक अशा दोन्हीही समूहांचे आर्थिक व सामाजिक नुकसान झाले असल्यामुळे प्रकल्पबाधीतांच्या सर्वेक्षणासोबतच प्रलंबित प्रकल्प लाभक्षेत्रापासून जवळच असणाऱ्या दुसऱ्या एखाद्या प्रकल्प लाभधारक शेतकरी कुटुंबांचे नियंत्रण समूह म्हणून सर्वेक्षण करणे गरजेचे होते. याचे मुख्य कारण प्रस्तुत प्रकल्पाचे संभाव्य लाभ तपासणे असे होते. तसेच डिसेंबर २०१३ च्या अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्यान्वये प्रकल्प लाभधेत्रातील जमिनींचे कमाल जमिन धारणा कायद्याचा वापर व अधिग्रहण करून प्रकल्पबाधीतांना वितरीत करण्याची तरतूद असल्याने अशा प्रकारच्या जलसिंचन प्रकल्पबाधीतांना प्रकल्प लाभधारक होण्याची संधी आपोआपच उपलब्ध होते. त्यामुळे नियंत्रण समूह सर्वेक्षणाद्वारा प्रकल्प प्रलंबनामुळे प्रकल्पबाधीतांचे गेल्या वीस (२०) वर्षात झालेले नुकसान मापन्याचाही विचार होता. त्यामुळे प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहाची एकंदरीत पिक पद्धती, उत्पादकता, उत्पादन, उत्पन्न, रोजगार.....इत्यादीविषयक तुलनात्मक आकडेवारी क्षेत्र सर्वेक्षणातून प्राप्त होईल अशाच प्रश्नांची योजना करण्यात आली होती.



### २.६.४: नमुना निवड:

संकलित करावयाची प्राथमिक माहिती अचूक, विश्वासार्ह, पृथक्करणक्षम व पर्याप्त असणे अत्यंत आवश्यक होते. तसेच प्राथमिक माहितीद्वारा प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहाचे एकूणच तुलनात्मक कृषी संबंधाचे (Agrarian Relations)आकलन होणेही आवश्यक होते. त्यामुळे नमुना निवड करताना समान सामाजिक, आर्थिक, भौगोलिक व कृषी वातावरणीय परिस्थिती असलेले व सिंचन प्रकल्पाचे लाभधारक असलेली शेतकरी कुटुंबे नियंत्रण समूहाच्या स्वरूपात आवश्यक असतात/होती. त्यामुळे आजरा तालुक्यातील चित्री पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील हाजगोळी (खु) हे गाव निवडून तेथील २१ लाभधारक कुटुंबांची निवड करून सर्वेक्षण करण्यात आले. परंतु प्रकल्पबाधीत पारपोली, पारपोली गावठाण व खेडगे स्थित सर्व कुटुंबांचे जनगणना पद्धतीने सर्वेक्षण करण्याची योजना आखली. तथापि प्रत्यक्ष क्षेत्रपाहणी करताना असे निदर्शनास आले की, एकूण प्रकल्पबाधीतांपैकी काही कुटुंबे उदरनिर्वाह अथवा नोकरीच्या निमित्ताने इतरत्र व मुख्यत्वेकरून मुंबईला स्थलांतरीत झाली होती. पर्यायाने सापनि अभ्यासगटाने कुटुंबांचे ‘‘उंबरा सर्वेक्षण’’ (House Survey)करण्याचे निश्चित केले. म्हणजे जी कुटुंबे स्थलांतरीत झाली नाहीत अथवा सर्वेक्षणादरम्यान गावात उपलब्ध असतील अशा सर्व शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. असे करताना आम्हास उपरोल्लेखित रहिवासी गावांतील एकूण प्रकल्पबाधीतांपैकी १८० कुटुंबातील व्यक्ती अथवा कुटुंबप्रमुखांना प्रत्यक्ष भेटणे शक्य झाले. अशा प्रकारे प्रकल्पबाधीतांपैकी जास्तीत जास्त कुटुंबाचे सर्वेक्षण पूर्ण होवू शकल्याने आम्ही त्यास जनगणना सर्वेक्षण असे संबोधले आहे. अशा प्रकारे १८० प्रकल्पबाघीत व २१ प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह कुटुंबे मिळून प्रस्तुत अभ्यास अहवालाकरीता एकूण २०१ कुटुंबांची नमुना निवड करून प्रत्यक्षपाणे घरोघरी जावून सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आहे. प्रस्तुत सर्वेक्षणातून प्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करून अहवालात आवश्यक त्या ठिकाणी सविस्तरपणे निष्कर्ष मांडले आहेत. अशा प्रकारे प्राथमिक माहिती संकलन सर्वेक्षणात अधिकाधिक प्रकल्पबाधीत कुटुंबांचा समावेश करू शकल्याने प्रस्तुत अहवाल सत्यतेच्या महत्तम निकषांवर उतरणारा आहे असा युक्तिवाद सापनि अभ्यासगटामार्फत केला जावू शकतो.

### २.६.५: विशेष समूह चर्चा (Focussed Group Discussions):

प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित प्राथमिक माहितीव्यतिरिक्त दिनांक २७ ते ३० डिसेंबर २०१७ दरम्यान सापनि अभ्यासगटाने प्रकल्पबाधीत गावांची प्रत्यक्ष भेट घेवून प्रकल्पबाधीतांबरोबर विशेष समूहचर्चा (FGDs)घडवून आणल्या. यामुळे सर्वेक्षणातून प्राप्त प्राथमिक माहितीचे अधिक आकलन होण्यास मदत झाली. तसेच प्राथमिक माहिती अधोरेखीतही होवू शकली.





तसेच सर्वेक्षणप्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण अधिक अचूक पद्धतीने होवू शकले. कारण या तीन दिवसांच्या काळात सापनि अभ्यासगटाने मौजे शेळप व मौजे देवर्डे येथील पर्यायी वसाहतींकरीता विकसित केलेल्या जागांची व इतर ठिकाणच्या प्रकल्प लाभक्षेत्रातील पर्यायी शेतजमिनींचीही पाहणी पूर्ण केली.





कारण डिसेंबर २०१३ च्या ‘‘अधिग्रहण,पुनर्वसन व पुनर्निवास’’कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांना त्यांच्या प्रकल्पबाधीत शेतजमिनींच्या मोबदल्यात प्रकल्प लाभक्षेत्रात जमिनी अधिग्रहित करून उपलब्ध केल्या आहेत असे प्रशासनाचे म्हणणे तपासून पाहणे आवश्यक होते.



## प्रकरण: ३

# सर्फनाला प्रकल्पाची व्यवहार्यता

### ३.१: परिचय:

हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास करणे:

महाराष्ट्र शासनाने २२ जुलै २०१६ च्या शासन निर्णय क्र.मुसगसअ १०१६/प्र.क्र.७८/का-१४१७ नुसार अर्थशात्रविभागशिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यास बहिस्थ संस्था नामिका सुचित (Empaneled Institute)समाविष्ट केलेले आहे. या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हाधिकारी भूसंपादण विभागाद्वारे आपला निर्णय पत्र क्रमांक ७८६/एनसीडीएस दिनांक १४/०८/२०१५ रोजी कळविला. ज्यामुळे अर्थशात्रविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरमार्फत हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम प्रकल्पा संबंधित भू-अधिग्रहणाच्या प्रस्तावाचा सामाजिक परिणाम अभ्यास सादर केला.सर्फनाला मध्यम प्रकल्प ता.आजरा, जिल्हाकोल्हापूर हा हिरण्यकेशी नदीखोऱ्यातील सर्फनाल्यावर पारपोली या गावानजिक बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्प कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत ''उर्वरीतमहाराष्ट्र'' या प्रदेशात आहे.सदर प्रकल्पांतर्गत आजरा तालुक्यातील २० गावांतील २६४४ हे. क्षेत्राससिंचनाचा लाभ मिळणारआहे.शिवाय पिण्यासाठी १.८१३ दलघमी. आणि औद्योगिक वापरासाठी ०.६०४ दलघमीपाणी वापर प्रस्तावित आहे. या प्रकल्पास प्रदेश कार्यालयाने आर नं. १२७/१९९९-२००० जा.क्र. सी.ई.एस.पी./डी.ई.-६/१०६६ दि. २१/१२/१९९९ नुसार रू. ३२६९.८० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. या प्रकल्पामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील मौजे पारपोली, पारपोली गावठाण ही गावे पूर्णपणे बाधित होत असून मौजे खेडगे मधील शेतजमीन बाधितहोत आहे. यासाठी मौजे देवर्डे व मौजे शेळप याठिकाणी पुर्नवसित गावठाणे विकसीत करण्यात येत आहेत.

### आजरा तालुक्याचा आढावा:

आजरा हा कोल्हापूर जिल्ह्यातील एक जनगणना टाऊन शहर आहे. आजरा जनगणना टाऊनची लोकसंख्या १७,२५७ आहे, ज्यामध्ये ८,८३८ पुरुष आहेत तर जनगणना २०११ मध्ये जाहीर केलेल्या अहवालात ८,४९१ महिला आहेत. ०-६ वर्षाखालील मुलांची लोकसंख्या १९६७ आहे जी आजरा सीटीच्या एकूण लोकसंख्येच्या ११.४० टक्के आहे. आजरा जनगणना टाऊनमध्ये, ९७९ च्या राज्य सरासरीच्या तुलनेत स्त्री-पुरुष प्रमाण ९५३ आहे. आजरामधील बाल लिंग गुणोत्तर ९३४ च्या आसपास आहे तर महाराष्ट्र राज्यामध्ये ८९४आहे. आजरा शहराचे साक्षरतेचे प्रमाण ८२.३४ टक्के राज्याच्या सरासरीपेक्षा ८६.९८टक्केअधिक आहे. आजरामध्ये पुरुष साक्षरतेची टक्केवारी ९०.७७टक्केतरस्त्री साक्षरता दर ८३.०१टक्के आहे. आजरा जनगणना टाऊनमध्ये एकूण ३,६५१ घरे

आहेत ज्यामध्ये ते पाणी व सीवरेज सारख्या मुलभूत सुविधा पुरवतात. हे जनगणना टाउन मर्यादेत रस्ते तयार करण्याची आणि त्याच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या मालमत्तांवर कर लादण्याची अधिकृत आहे.

### ३.२: पारोपलीगाव:

बाधित होणाऱ्या गावापैकी पारोपली हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा येथे एक मध्यम आकाराचे गाव आहे. एकूण २११ कुटुंबे राहतात. पारपोली गावात ८२८ लोकसंख्या असून त्यापैकी ३९१ पुरुष आहेत तर लोकसंख्या २०११ च्या आकडेवारीनुसार ४३७ महिला आहेत. पारपोलीमध्ये ०-६ वर्षाखालील मुलांची लोकसंख्या ८५आहे जी एकूण लोकसंख्येच्या १०.२७ टक्के इतकी आहे. पारपोली गावातील सरासरी लिंगगुणोत्तर १११८ आहे जे महाराष्ट्राच्या सरासरी ९२.९ टक्के पेक्षा जास्त आहे. जनगणनेनुसार पारपोलीसाठी बाललिंगगुणोत्तर ८४८ आहे. तर महाराष्ट्र सरासरी ८९४ पेक्षा कमी आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत पारपोली गावामध्ये कमी साक्षरता दर आहे. २०११ मध्ये, महाराष्ट्रातील ८२.३४ टक्केच्या तुलनेत पारपोली गावातील साक्षरतेचे प्रमाण ६२.८५ टक्के होते. पारपोलीमध्ये पुरुषसाक्षरता ७६.८१ तरमहिला साक्षरता ५०.७५ टक्के आहे. भारत आणि पंचायतीराज कायदा घटनेनुसार, पारपोली गावसरपंच (ग्रामप्रमुख) यांनी प्रशासित केले आहे जे गावचे प्रतिनिधी म्हणून निवडले जातात.

**तक्ता ३.१: पारपोली गावाची लोकसंख्याविषयक माहिती**

| २०११ | | | |
|---|---|---|---|
| तपशील | एकूण | स्त्री | पुरुष |
| एकूण घराची संख्या | २११ | - | - |
| लोकसंख्या | ८२८ | ३९१ | ४३७ |
| मुले (०-६) | ८५ | ४६ | ३९ |
| अनुसूचित जाती | ४५ | २४ | २१ |
| अनुसूचित जमाती | ० | ० | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| साक्षरता % | ६२.८५ | ७६.८१ | ०.५१ |
| एकूण कामगार | ४७४ | २२७ | २४७ |
| मुख्य कार्यकर्ता | ४६६ | ० | ० |
| किरकोळ कामगार | ८ | ३ | ५ |

संदर्भ : कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

### ३.३: कार्य प्रोफाईल:

एकूण लोकसंख्येपैकी पारपोली गावात ४७४ कामकाजामध्ये व्यस्त होते. ९८.३१ टक्के कामगाराचे मुख्य काम (६ महिन्यांपेक्षा जास्त कमाई) किंवा १.६९ टक्के जण ६ महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी उपजीविकेसाठी उपलब्ध असलेल्या किरकोळ कार्यात गुंतलेले होते. मुख्य कामांमध्ये काम करणार्या ४७४ कामगारांपैकी २९० शेतकरी (मालक किंवा सह–मालक) तर १५५ शेतमजूर कामगार होते.

### ३.४: जातीचा घटक:

अनुसूचित जातीचा (एससी) मौजे पारपोली गावात एकूण लोकसंख्येच्या ५.४३ टक्के आहे. सध्याच्या परपोली गावात कोणतीही अनुसूचित जमाती (एसटी) लोकसंख्या नाही.

### ३.५: प्रकल्पाची सद्यस्थिती:

मातीधरण–लांबी १४४० मी. (सा.क्र.१८०मी.ते१४४०मी.) उंची ३३.३३ मी. (धरण माथा पातळी ७०३.५८५ मी.) जलरोधीचराचे सर्व काम पूर्ण झाले आहे. १.२ सा.क्र. १८० मी. ते ८०० मी. व ९८५मी. ते १४४० मी. मधील भरावाचे काम तलांक – ७०३.५८५ मी. पूर्ण झाले असून सा.क्र. ८०० मी. ते ९८५ मी. मध्ये घळभरणीचे काम प्रस्तावित आहे. तळातील (सा.क्र.८९० मी.ते ९५०मी.) ओगी प्रकारचाव्दार विरहीत सांडवा – लांबी ८७ मी. (सा.क्र.९३ मी. ते १८० मी.) सुधारित संकल्पना नुसार सांडव्याची लांबी ८७ मी. इतकी असून विसर्गक्षमता ३३९.६७ घमी./सेकंद इतकी आहे. सांडव्याचा उर्जा व्ययव्यवस्था (EDA) व पुच्छकालव्याची (Tail Channel)एकूण लांबी ५७० मी. आहे. पुच्छकालव्याचा (Tail Channel)विसर्ग ३३९.६७५घ. मी./सेकंद इतका आहे.

सांडवा उर्जा व्ययव्यवस्था (EDA)व पुच्छकालवा (Tail Channel) व गुंतावा भिंत(Key Wall)यांची एकूण १४ संकल्प चित्रे असून त्यापैकी ७ संकल्प चित्रांना मु.अ. यांची मान्यता मिळाली असून

५ संकल्प चित्रे मान्यतेसाठी प्रदेश कार्यालयास सादर केलेली होती. सदर संकल्पचित्रे द्वितीय प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये अंतर्भूत करून प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केली आहेत. म.स.स.नाशिककडून गुतांवाभिंतीची २ सुधारित संकल्पचित्रे प्राप्त झाली आहेत.याबाबत अभिप्रायाबाबत अभ्यास सुरू आहे. सांडवा बांधकाम खुदाई प्रगतीपथावरआहे.

### ३.६: सिंचन क्षमता:

प्रकल्पाची सिंचनक्षमता २६४४ हेक्टर आहे. प्रकल्पात कालवे नसून हिरण्यकेशी नदीवरील अस्तित्वातील एकूण ५ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांतून खाजगी उपसासिंचन पध्दतीने २० गांवातील एकूण २६४४ हे. सिंचन क्षेत्राससिंचन लाभ देणे नियोजित आहे. प्रकल्पाचे एकूण लाभक्षेत्र (GCA)३३५० हे. लागवडीलायक क्षेत्र(CCA)–३१७५ हे. सिंचन क्षेत्र (ICA):–२६४४ हे. व पीकक्षेत्र(IP):–३७८४ हे. आहे.

### ३.७: पाणीसाठा:

सर्फनाला मध्यम प्रकल्पाअंतर्गत हिरण्यकेशी नदीखोऱ्यातील सर्फनाल्यावर मौजे पारपोली ता. आजरा जि.कोल्हापूर येथे मातीचे धरण बांधण्यात येत आहे. धरणाची एकूण साठवण क्षमता १८.९८ दलघमी असून उपयुक्त पाणीसाठा १८.१८ दलघमी इतका आहे. पाण्याचेDead Storage ०.७८५ द.ल.घ.मी. आहे. धरणाचा उपयुक्त पाणीसाठा १८.१८ दलघमी इतका आहे. प्रकल्पाच्या एकूण पाणीवापर १९.५८ दलघमी. इतका असून त्याची फोड खालील प्रमाणे आहे.

**तक्ता ३.२: धरणाची एकूण साठवण क्षमता व पाणीसाठा**

| अ. क्र. | पाणीवापर | पाणीवापर दलघमी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सिंचनासाठीचा पाणीवापर | १५.८५६ | ८०.९८% |
| २ | पिण्यासाठीचा पाणीवापर | १.८१३ | ९.२६% |
| ३ | औद्योगिक पाणीवापर | ०.६०४ | ३.०८% |
| ४ | बाष्पीभवन व्यय | १.३०७ | ६.६८% |
| | एकूण | १९.५८ | १००% |

संदर्भ : कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

सर्फनाला मध्यम प्रकल्पा अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या धरणाची एकूण साठवण क्षमता व पाणी वापर १९.५८ दलघमी इतका असून त्यापैकी सिंचनासाठीचा पाणी वापर हा सर्वात जास्त १५.८५६ दलघमी म्हणजेच ८०.९८ टक्के केला जाईल तसेच पिण्यासाठीचा पाणी वापर हा१.८१३ दलघमी म्हणजेच ९.२६ टक्के इतका वापर केला जाईल.आणि सर्वात कमी पाण्याचा वापर सर्वसाधार पणे ०.६०४ दलघमी म्हणजेच ३.०८ टक्के हा औद्योगिक कामासाठी केला जाईल आणि उर्वरित पाण्याचे १.३०७ दलघमी म्हणजेच ६.६८ टक्के पाण्याचे  बाष्पीभवन होईल.

**तक्ता ३.३: हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाचेबिगर सिंचन परिस्थितीमध्ये निव्वळ फायदे**

| अ. क्र. | पिकाचे नाव | क्षेत्र % | क्षेत्र (हेक्टरमध्ये) | लाभ प्रति हेक्टर | निव्वळ लाभ | निव्वळ लाभ % |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | ३१ | ८२० | ६४५२.०० | ५२८८३१७.२८ | १२.३६ |
| २ | वरील, नाचणी, सावा, बाजरी | २३ | ६०८ | १४९६५.०० | ९१००५१५.८० | २१.२७ |
| ३ | डाळी – तूर | ३ | ७९ | ३८८५८.०० | ३०८२२१६.५६ | ७.२० |
| ४ | भुईमूग, तेलबिया – सोयाबीन | ८ | २१२ | १२५५७.०० | २६५६०५६.६४ | ६.२१ |
| ५ | ज्वारी | २ | ५३ | ३४१७६.०० | १८०७२२६.८८ | ४.२२ |
| ६ | गवत | २४ | ६३५ | ५००.०० | ३१७२८०.०० | ०.७४ |
| ७ | मिरच्या | १.५ | ४० | १२८९८.०० | ५११५३४.६८ | १.२० |
| ८ | ऊस ऊस | ७.५ | १९८ | १००९५४.०० | २००१९१७८.२० | ४६.७९ |
| | एकूण | १०० | २६४४ | – | ४२७८२३२६.०४ | १००.०० |
| | निव्वळ लाभ | | | रूपये ४२७.८२ लाख | | |

संदर्भ: कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय कागदपत्रे

हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाचे बिगर सिंचन परिस्थितीमध्ये एकूण लागवडी खालील क्षेत्र २६४४ हेक्टर इतके असून त्यापैकी अन्यधान्य लागवडी खालील एकूण क्षेत्र (भात,वरी, नाचणी, सावा, बाजरी, ज्वारी) ५६ टक्के आहे. त्यासाठी वापरले जाणारे एकूण क्षेत्र १४८१ हेक्टर इतके आहे. अन्नधान्यासाठी प्रति हेक्टर पासून मिळणार लाभ हा १८५३१ इतका आहे तसेच निव्वळ लाभ हा रु. १६१९६०५९.९६ म्हणजेच अन्नधान्यापासून एकूण ३७.८५ टक्के निव्वळ लाभ प्राप्त होतो.

कडधान्य लागवडी खालील एकूण क्षेत्र (डाळी-तूर, भुईमूग, तेलबिया-सोयाबीन) ११ टक्के आहे. त्यासाठी वापरले जाणारे एकूण क्षेत्र २९१ हेक्टर इतके आहे. कडधान्यासाठी प्रति हेक्टर पासून मिळणार लाभ हा २०७०७.५ इतका आहे. तसेच निव्वळ लाभ हा रु. ५७३८२७३.२ म्हणजेच कडधान्या पासून एकूण १३.७१ टक्के निव्वळ लाभ प्राप्त होतो.

भाजीपाला लागवडी खालील एकूण क्षेत्र (मिरच्या) १.५ टक्के आहे. त्यासाठी वापरले जाणारे एकूण क्षेत्र ४० हेक्टर इतके आहे. भाजीपाल्यासाठी प्रति हेक्टर पासून मिळणार लाभ हा १२८९८ इतका आहे तसेच निव्वळ लाभ हा रु. ५११५३४.६८ म्हणजेच भाजीपाल्यापासून एकूण १.२० टक्के निव्वळ लाभ प्राप्त होतो.

व्यापारी पीक लागवडी खालील एकूण क्षेत्र (ऊस) ७.५ टक्के आहे. त्यासाठी वापरले जाणारे एकूण क्षेत्र १९८ हेक्टर इतके आहे. व्यापारीपीकासाठी प्रति हेक्टर पासून मिळणार लाभ हा १००९५४ इतका आहे तसेच निव्वळ लाभ हा रु. २००१९१७८.२० म्हणजेच व्यापारी पिकापासून एकूण सर्वात जास्त ४६.७९ टक्के निव्वळ लाभ प्राप्त होतो.

इतर उत्पन्नाचे एकूण क्षेत्र (गवत) २४ टक्के आहे. त्यासाठी वापरले जाणारे एकूण क्षेत्र ६३५ हेक्टर इतके आहे. इतर उत्पन्नासाठी प्रति हेक्टर पासून मिळणार लाभ हा रु.५०० इतका आहे तसेच निव्वळ लाभ हा रु. ३१७२८० म्हणजेच इतर उत्पन्नापासून एकूण सर्वात कमी ०.७४ टक्के निव्वळ लाभ प्राप्त होतो. हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाचे बिगर सिंचन परिस्थितीमध्ये एकूण लागवडीखालील निव्वळ लाभ हा रु. ४२७.८२ लाख इतका प्राप्त होतो.

**तक्ता ३.४: हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाचे सिंचित परिस्थिती मध्ये निव्वळ फायदे**

| अ. क्र. | पिकाचे नाव | क्षेत्र(%) | क्षेत्र हेक्टर मध्ये | प्रति हेक्टर लाभ | लाभ (%) | निव्वळ लाभ | निव्वळ लाभ (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ) | बहुवार्षिक | | | | | | |
| १ | ऊस | १० | २६४ | १००,९५४.०० | ३.६२ | २६६९२२३७.६० | ३.९३ |
| २ | ऊस खोडवा | ३ | ७९ | १००९५४.०० | ३.६२ | ८००७६७१.२८ | १.१८ |
| ३ | फळ पिके | ४ | १०६ | ८९९७१०.०० | ३२.२६ | ९५१५३३२९.६० | १४.०२ |
| इ) | खरीप हंगाम | | | | - | | - |
| ४ | खरीप भाजीपाला | २० | ५२९ | ४३७३१८.३ | १५.६८ | २३१२५३९१७.०४ | ३४.०६ |
| ५ | कमाल पीक घेणारे भात | २० | ५२९ | ३३९२३.५ | १.२२ | १७९३८७४६.८० | २.६४ |
| ६ | खरीप पीक ज्वारी | १५ | ३९७ | ७२४५७ | २.६० | २८७३६४४६.२० | ४.२३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | खरीप शेंगदाणा | ५ | १३२ | ३०१३७.०० | १.०८ | ३९८४१११.४० | ०.५९ |
| उ) | **खरीप हंगाम (अनियंत्रित पिके)** | | | | | | |
| ८ | इतर तेलबिया | १० | २६४ | १२५५७.०० | ०.४५ | ३३२००७०.८० | ०.४९ |
| ९ | डाळ | ५ | १३२ | ३८८५८.०० | १.३९ | ५१३७०२७.६० | ०.७६ |
| १० | इतर धान्ये | ८ | २१२ | १४९६५.०० | ०.५४ | ३१६५३९६.८० | ०.४७ |
| ऊ) | **रब्बी सत्रांमध्ये (अस्वच्छ)** | | | | | | |
| ११ | गहू | ३.१ | ८२ | ५१४५५ | १.८४ | ४२१७४५७.६२ | ०.६२ |
| १२ | बटाटा | ५ | १३२ | ३०१३७.०० | १.०८ | ३९८४१११.४० | ०.५९ |
| १३ | भाज्या | १५ | ३९७ | ४३७३१८ | १५.६८ | १७३४४०३१८.८० | २५.५५ |
| १४ | ग्रॅम | ५ | १३२ | ६११०९.५० | २.१९ | ८०७८६७५.९० | १.१९ |
| ए) | H. W.पिके | | | | – | | – |
| १५ | H. W. शेंगदाणा | १० | २६४ | ३०१३७ | १.०८ | ७९६८२२२.८० | १.१७ |
| १६ | भाज्या | ५ | १३२ | ४३७३१८ | १५.६८ | ५७८१३४३९.६० | ८.५२ |
| १७ | एकूण | १४३.१ | ३७८४ | | १००.०० | ६७८८९११८१.२४ | १००.०० |
| | **निव्वळ लाभ** | | | **रू.६७८८.९१ लाख** | | | |

संदर्भ : कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाचे सिंचन परिस्थितीमध्ये एकूण निव्वळ लाभ रू. ६७८८.९१ लाख इतका प्राप्त होतो. बहुवार्षिक पिक एकूण क्षेत्र १७ टक्के आहे. त्यामध्ये उसाचेक्षेत्र २६४ हेक्टर म्हणजेच १० टक्के आहे. त्यामध्ये प्रति हेक्टर लाभ हा सर्वसाधारण १००,९५४.०० म्हणजेच ३.६२ टक्के इतका असून निव्वळ लाभ हा २६६९२२३७.६० म्हणजेच ३.९३ टक्के इतका आहे. ऊस खोडवा तसेच फळांच्या पिकाचे क्षेत्र १०६ हेक्टर म्हणजेच ४ टक्के आहे. त्यामध्ये प्रति हेक्टर लाभ हा सर्वसाधारण ८९९७१०.०० म्हणजेच ३२.२६ टक्के इतका असून निव्वळ लाभ हा ९५१५३३२९.६० म्हणजेच १४.०२ टक्के इतका आहे.

खरीप हंगाम एकूण क्षेत्र ६० टक्के आहे. त्यामध्ये खरीप भाजीपाला क्षेत्र ५२९ हेक्टर म्हणजेच २० टक्के आहे. त्यामध्ये प्रति हेक्टर लाभ हा सर्वसाधारण ४३७३१८.३ म्हणजेच १५.६८ टक्के इतका असून निव्वळ लाभ हा २३१२५३९१७.०४ म्हणजेच ३४.०६ टक्के इतका आहे. तसेच कमाल पीक घेणारे भात क्षेत्र ५२९ हेक्टर म्हणजेच २० टक्के आहे. त्यामध्ये प्रतिहेक्टर लाभ हा सर्वसाधारण ८९९७१०.०० म्हणजेच ३२.२६ टक्के इतका असून निव्वळ लाभ हा ३३९२३.५ म्हणजेच १.२२ टक्के इतका आहे. तसेच खरीप पीक ज्वारी क्षेत्र ३९७ हेक्टर म्हणजेच १५ टक्के

आहे. त्यामध्ये प्रति हेक्टर लाभ हा सर्वसाधारण ७२४५७ म्हणजेच २.६० टक्के इतका असून निव्वळ लाभ हा २८७३६४४६.२० म्हणजेच ४.२३ टक्के इतका आहे. तसेच खरीप शेंगदाणा क्षेत्र १३२ हेक्टर म्हणजेच ५ टक्के आहे. त्यामध्ये प्रतिहेक्टर लाभ हा सर्वसाधारण ३०१३७.०० म्हणजेच १.०८टक्के इतका असून निव्वळ लाभ हा ३९८४१११.४० म्हणजेच ०.५९ टक्के इतका आहे.

खरीप हंगामातील पिकांचे (अनियंत्रितपिके) एकूण क्षेत्र २३ टक्के आहे. त्यामध्ये इतर तेलबिया क्षेत्र २६४ हेक्टर म्हणजेच १० टक्के आहे. त्यामध्ये प्रतिहेक्टर लाभ हा सर्वसाधारण ५१४५५ म्हणजेच ०.४५ टक्के इतका असून निव्वळ लाभ हा ३३२००७०.८० म्हणजेच ०.४९ टक्के इतका आहे. तसेच डाळीचे क्षेत्र १३२ हेक्टर म्हणजेच ५ टक्के आहे. त्यामध्ये प्रतिहेक्टर लाभ हा सर्वसाधारण ३८८५८.०० म्हणजेच १.३९टक्के इतका असून निव्वळ लाभ हा ५१३७०२७.६० म्हणजेच ०.७६ टक्के इतका आहे. तसेच इतर धान्याचे क्षेत्र २१२ हेक्टरम्हणजेच ८ टक्के आहे. त्यामध्ये प्रतिहेक्टर लाभ हा सर्वसाधारण १४९६५.०० म्हणजेच ०.५४ टक्के इतका असून निव्वळ लाभ हा ३१६५३९६.८० म्हणजेच ०.५९ टक्के इतका आहे.

**तक्ता ३.५: हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाचे लाभ/खर्चप्रमाण**

**(Benefit-Cost Ratio)**

| अ. क्र. | तपशील | | एकूण खर्च (लाख) |
|---|---|---|---|
| अ) | प्रकल्पाची किंमत | | |
| | अ)प्रकल्पाची अंदाजित किंमत | | २२१३७.८९ |
| | ब)अंदाजित खर्च5 K. T. Weirs (As per Statement - 1) | | २९१.२८ |
| | | एकूण | २२४२९.१७ |
| ब) | वार्षिक लाभ | | |
| | अ)सिंचन स्थितीत फायदे (As per Statement - 2) | | ६७८८.९१ |
| | ब) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा रू. ३.१६८ लाख/मेक्युम १.८१३ मेक्युम म्हणजेच ३.१६८/१.८१३ X साठी (MWRRA दि. ३०/०५/२०११ अनुसार दर) | | ५.७४ |
| | ब) औद्योगिक पाण्याचा पुरवठा रू. ३.८४.०० लाख/मेक्युमसाठी ०.६०४ एमयूएम (कच्चा माल म्हणून पाण्याचा वापर करून इंडस्ट्रियलसाठी सर्व | | २३१.९४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | पुरवठा लक्षात घेता((MWRRA दि. ३०/०५/२०११ अनुसार दर) | | |
| | | एकूण वार्षिक फायदे (अ) | ७०२६.५९ |
| | कपात | | |
| | बिगर सिंचन स्थिती अंतर्गत फायदे | | ४२७.८२ |
| | | एकूण कपात | ४२७.८२३ |
| | | निव्वळ फायदे (ब) | ६५९८.७७ |
| क) | वार्षिक खर्च | | |
| | अ) प्रकल्पाच्या भांडवली मूल्यावर १०% व्याजाने व्याज | | २२४२.९२ |
| | अ) प्रकल्पाच्या खर्चाच्या १.६७% प्रकल्पावरील घसारा | | ३७४.५७ |
| | अ) ओ एंडएम खर्च @रू. २३८ प्रति हेक्टर आयपी (३७८४ X २३८ रू.) (जीआर-२००७/(१३/०७) दि. २७/०८/२०१३ अनुसार | | ९.०१ |
| | | एकूण वार्षिक खर्च (क) | २६२६.४९ |
| ड) | लाभ दर प्रमाण (BCR) | | |
| | लाभ/खर्च (B/C) | =६५९८.७७/२६२६.४९ | २.५१ |

संदर्भ: कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय कागदपत्रे

## प्रकरण: ४

# सद्यप्रकल्पबाधीत व संभाव्य प्रकल्प लाभार्थींवरील आर्थिक व सामाजिक परिणाम

**प्रास्ताविक:**

तंत्रज्ञान व संरचनात्मक पाया भक्कम करून भारतीय कृषीची उत्पादनक्षमता वृद्धिंगत करणे आणि प्रथमत: अन्नधान्याकरिताचे परावलंबित्व संपुष्टात आणणे हे सन १९६० व १९७० च्या दशकातील पहिल्या भारतीय हरितक्रांतीचे प्रमुख उद्दिष्ट होते. तद्नंतर भारतीय कृषी क्षेत्राचा व्यापारीय विस्तार करण्यासाठी उत्पादनानुरूप कृषी क्रांती अवलंबिल्या गेल्या. उदाहरणार्थ तद्नंतर धवलक्रांती व गुलाबी क्रांती (White and Pink Revolution) ही या उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने टाकलेली महत्त्वाची पाऊले होती. अशा सर्व प्रकारच्या कृषी विकासक्रियेत जलस्त्रोतांचे नियोजन करून विविध आकाराची धरणे बांधण्याची कामे सन १९५० व १९६० च्या दशकात सुरू झाली. अर्थात अशा विविध क्षमतेच्या धरण बांधणीमागील प्रमुख उद्दिष्ट जरी कृषी पाणीपुरवठा असले तरीही या एकाच उद्दिष्टाशी अशा प्रकल्पांचे नियोजन सिमित नव्हते. यातूनच ''बहुउददेशीय जलप्रकल्प'' या संकल्पनेचा उदय झाला. देशपातळीवर याची अनेक उदाहरणे देता येतील. नव्हे अशा प्रकारची विविध क्षमतेची अनेक धरणे स्वातंत्र्यानंतर भारतात बांधून पूर्ण झाली व अद्यापही अनेक योजना अपूर्ण आहेत. तर अनेक जल योजना हाती घेणे बाकी आहे. ब्रिटिशकालीन भारतातही अशा अनेक जलयोजना हाती घेवून पूर्ण करण्यात आल्या. तर अनेक योजना ब्रिटिशकालीन संस्थानिकांनीही पूर्ण केल्याची उदाहरणे आहेत. अशा प्रकारच्या योजना पूर्तीकरिता प्रचंड प्रमाणात भूमिअधिग्रहण व विस्थापितांच्या निवासांचे व उदरनिर्वाहाचे प्रश्न उभे ठाकतात. याकडे मात्र सर्वांगिण दुर्लक्ष झाले. असे दुर्लक्ष फक्त ब्रिटिशकाळातच झाले नाही तर स्वतंत्र भारतीय पुनर्वसन व नियोजन त्याला अपवाद नाही असाच इतिहास आहे. बहुउद्देशीय जलप्रकल्प फक्त सरकारी अथवा सार्वजनिक मालकीचेच होते असे नव्हे. तर अनेक खाजगी उद्योगपतींच्या मालकीचेही होते व अद्यापही आहेत. अशा खाजगी जलप्रकल्पांकरिताही अनेक ठिकाणी भूमिअधिग्रहण करण्यात आले. परंतु विस्थापितांच्या पुनर्वसनाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. तद्नंतर अशा भूमिअधिग्रहणास जनतेचा विरोध होवू लागला. उदाहरणार्थ सन १९२०-२१ साली पुण्याजवळ मुठा नदीवर जेंव्हा टाटांचा मुळशी हा मोठा जलप्रकल्प बांधण्याचे ठरले व त्याकरिता ब्रिटिश सरकारने भूमिअधिग्रहणाची प्रक्रिया सुरू केली तेंव्हा शेतकऱ्यांचा प्रखर विरोध सुरू झाला होता. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन यावेळी उभे राहिले होते. असे खाजगी व सार्वजनिक प्रकल्प की जे सरकारला जनहिताचे वाटतील त्याकरिता सन १८९४ साली

भूमिअधिग्रहण कायदा पारित केला होताच. प्रस्तुत अधिग्रहण कायद्यात जमिनीचा मोबदला, पुनर्वसन व पुनर्निवासाची कोणतीही जबाबदारी सरकारने स्वत:वर ठेवली नव्हती. इतकेच नव्हे तर सन १९११ साली देशाच्या राजधानीसाठी रायसीना गावची जमिन अधिग्रहित केली गेली. ज्या ठिकाणी आज लोकसभा, राज्यसभा व राष्ट्रपती भवन यासारख्या सर्वोच्च लोकशाही संस्था उभ्या आहेत. परंतु शेतकऱ्यांचा जमिन मोबदला अद्यापही बाकी आहे असे कागदपत्रांवरून लक्षात येते. सन २०१४ पर्यंतची अशी सर्व भूमिअधिग्रहणे सन १८९४ च्या कायद्यातंर्गत झाली असल्याने पुनर्वसनाची समस्या अत्यंत बिकट व दुर्लक्षित राहिली. परंतु सन २०१३ च्या ''भूमिअधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास'' कायद्याने या परिस्थितीत आमूलाग्र बदल होईल अशी अपेक्षा केली जाते.

अर्थात हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम पाटबंधारे प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता ऑक्टोबर १९९८ मधील आहे. परंतु पुनर्वसन, जमिन मोबदला व पुनर्निवासाशी निगडित प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनामुळे हा प्रकल्प तब्बल वीस (२०) वर्षानंतर अद्यापही प्रलंबित आहे. त्यामुळे प्रकल्प व्ययवृद्धी होवून एकूण अंदाजित प्रकल्प व्यय सुमारे ७०० कोटी रूपयांपेक्षा अधिक झाला. एकंदरीतच भूमिअधिग्रहण व पुनर्वसन आणि पुनर्निवासातील समस्यांमुळे भूमिअधिग्रहण होवून प्रकल्प पूर्णत्वास जावू न शकल्यामुळे प्रस्तुत प्रकल्पाच्या भूमिअधिग्रहण व पुनर्वसनकामी डिसेंबर २०१३ चा भूमिअधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायदा लागू झाला असल्याने व प्रस्तुत कायद्यातील तरतुदीप्रमाणे सामाजिक परिणाम निर्धारण(SIA)करणे क्रमप्राप्त झाले आहे.

अहवालाचे प्रस्तुत प्रकरण प्रामुख्याने प्रकल्पग्रस्त शेतकरी कुटुंबे व नियंत्रित समूह स्वरूपात नजिकच्या चित्री पाटबंधारे प्रकल्पाची लाभधारक शेतकरी कुटुंबांच्या प्राथमिक माहितीच्या पृथक्करण व विश्लेषणावर बेतले आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रकल्पबाधीत शेतकरी कुटुंबे व संभाव्य प्रकल्प लाभार्थींवरील प्रलंबित प्रकल्पपूर्ततेचे संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणाम तपासण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात सन २०१३ च्या ''अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास'' कायद्यान्वये सर्फनाला प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या शेतजमिनीच्या मोबदल्यात प्रकल्प लाभक्षेत्रात शेतजमिनी देण्याची तयारी कोल्हापूर महसूल विभाग/जिल्हा प्रशासनाने केली असल्याने प्रकल्पग्रस्तांचे रूपांतर प्रकल्प लाभधारकांत होण्याचा मार्ग खुला झाला आहे. तथापी पुनरवसीत जमिनीबाबत प्रकल्पग्रस्तांच्या अनेक तक्रारी आहेत हा भाग वेगळा. त्यामुळे प्रकल्पग्रस्त व नियंत्रण समूह चित्री प्रकल्प लाभधारक कुटुंबाच्या प्राथमिक माहितीच्या सहाय्याने विनाप्रकल्प व प्रकल्प पूर्णत्वोपरांत प्रामुख्याने आर्थिक व सामाजिक तफावत मापनाचा प्रयत्न केला आहे.

हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे एकूण बुडीत क्षेत्र २८५.५६ हेक्टर इतके असून यास मौजे फरपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे अशी दोन गावे व एक गावठाण वस्तीचा समावेश होतो. मौजे खेडगे येथील जमिन बुडीत क्षेत्रात जाते परंतु गावची लोकवस्ती मात्र अबाधित

राहते. उपरोल्लेखित प्रकलपपूर्व व प्रकल्पोपरांत सामाजिक व आर्थिक तफावत तपासण्याकरिता प्रकल्पबाधीत तीनही लोकवस्ती व प्रकल्पोपरांत कृषी, आर्थिक व सामाजिक बदलांकरिता मौजे हाजगोळी (खु),तालुका आजरा येथील चित्री प्रकल्प लाभधारकांची नियंत्रित समूहाच्या स्वरूपात प्राथमिक क्षेत्र पाहणी पूर्ण केली आहे. मौजे पारपोली, पारपोली गावठाण व खेडगे येथील क्षेत्र पाहणीकामी नमुना निवडीकरिता जनगणना पद्धतीचा अवलंब करून एकूण प्रकल्पबाधीत कुटुंबापैकी १८० कुटुंबप्रमुखांना प्रत्यक्ष भेटून प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती संकलन केले आहे. तर नियंत्रण समूह म्हणून आजरा तालुक्यातील मौजे हाजगोळी (खु) येथील एकूण २१ चित्री प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेवून प्राथमिक माहिती संकलन केले आहे. (संदर्भ प्रकरण ०२) अर्थात उपरोल्लेखीत तीन प्रकल्पबाधीत लोकवस्ती असलेल्या शेतकरी कुटुंबाची संख्या १८० पेक्षा अधिक आहे. परंतु यापैकी अनेक कुटुंबे उदरनिर्वाहासाठी अथवा नोकरीच्या निमित्ताने इतरत्र व मुख्यत्वे मुंबई आदी ठिकाणी स्थलांतरीत झाली असल्याने गाववस्तीवर असलेल्या सर्व म्हणजे १८० कुटुंबांचे सर्वेक्षण केले आहे. म्हणून प्रस्तुत सर्वेक्षणास जनगणना असे संबोधले आहे (संदर्भ प्रकरण ०२).

### ४.१: प्रश्नावलीतील अंतर्भूत घटक:

एकंदरीतच प्रश्नावली तयार करताना प्रकल्पबाधीतांची व प्रकल्प लाभधारकांच्या सद्य: सामाजिक व आर्थिक स्थितीचे आकलन होवू शकेल अशा प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. प्रश्नावलीत प्रामुख्याने कुटुंबाची आर्थिक व सामाजिक स्थिती, जमिन धारणक्षेत्र, पिकपद्धती, उत्पादनक्षमता, पाणीपुरवठ्याच्या सुविधा, स्थलांतर, प्रकल्पबाधीत कुटुंबाची जमिन व इतर साधनांचे नुकसान, प्रकल्प संपादित जमिन, पुनर्वसनात मिळालेली जमिन व घरासाठी निवासी जागा..... इत्यादी घटकांचा समावेश करण्याचे कारण म्हणजे प्रस्तुत प्रकल्पाचा संपूर्ण लेखाजोखा घेण्याचा प्रयत्न आहे. या प्रयत्नाचा प्रमुख उद्देश असा आहे की, पाटबंधारे प्रकल्पाची सुविधा उपलब्ध नसताना एकंदरीतच कृषी संबंध कशा प्रकारचे असू शकतात आणि असे प्रकल्प पूर्ण होवून कृषी संबंधात काय फरक पडतो. अशी अभ्यास पद्धती अंगिकारण्याचे मुख्य कारण म्हणजे उपरोल्लेख केल्याप्रमाणे सन २०१३ च्या ‘‘भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास’’ कायद्यान्वये प्रकल्प लाभक्षेत्रातील संभाव्य वीस गावांप्रमाणेच प्रकल्पबाधीतांनाही भविष्यात प्रकलपाचे लाभ संभवतात असे प्रकल्प विभाग म्हणजे महाराष्ट्राच्या जलसिंचन विभागाचे म्हणणे आहे. कारण या सर्व प्रकल्पाबाधीतांना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात जमिनी अधिग्रहित करून त्यांचे वाटप करण्याची प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. असे असले तरी प्रस्तुत पुनर्वितरणाकरिता अधिग्रहित जमिनींपैकी अनेक जमिनी लागवडयोग्य नाहीत अथवा इतक्या उंच डोंगरी भागात आहेत की तेथपर्यंत पाटपाणी पोहचू शकत नाही अशीही स्थिती आहे. सन १९९८ पासून गेली वीस वर्षे

सर्फनाला प्रकल्प प्रलंबित असल्याने प्रस्तुत प्रकल्पाचा एकूण व्यय अनेक पटींनी वाढला तर आहेच. परंतु प्रस्तावित लाभक्षेत्रातील (वीस) गावांचे कृषी संबंधही बदलू शकले नाहीत. किंबहुना प्रकल्पबाधीतांचे प्रकल्प लाभधारकांत रूपांतर होवून त्यांचेही कृषी संबंध बदलणे प्रलंबले गेले. तसेच सन १९९८ साली प्रकल्पाची अधिसूचना निर्गमित झाल्यापासून प्रकल्पबाधीतांच्या जमीन/मिळकत ७/१२ उताऱ्यावर सरकारचे नाव नोंदले गेल्यामुळे संबंधित जमिनींचे खरेदी विक्री व्यवहार गेली वीस वर्षे बंद झाले. त्याचप्रमाणे प्रकल्पबाधीत क्षेत्रातील खाजगी व सार्वजनिक कृषी व ग्रामीण गुंतवणूकीला खीळ बसली. परिणामी प्रकल्पबाधीतांच्या उत्पन्नात सकारात्मक बदल होणे एकदम थांबले. या सर्व घटकांचा विचार विमर्श करून प्रश्नावलीची योजना करताना प्रकलपबाधीत अर्थात संभाव्य प्रकल्प लाभधारकांनी गमावलेले लाभ व उत्पादनक्षमतेच्या तोटयाचे मोजदादही प्राथमिक माहितीच्या आधारे प्रस्तुत प्रकरणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ४.२: पृथक्करण व विश्लेषण:


जलसिंचन प्रकल्पपूर्व व प्रकल्पोपरांत ग्रामीण भागाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीतील साम्ये व बदलांच्या आकलनाकरिता प्राथमिक माहिती संकलन करण्याकामी तयार केलेल्या प्रश्नावलीत विविध व विशिष्ट प्रश्नांचा समावेश केला होता. की जेणेकरून दोन्ही गटांच्या एकूण आर्थिक परिस्थितीचे आकलन करणे शक्य झाले. शक्यतो पर्जन्यमानावर अवलंबून असणाऱ्या कृषी व्यवस्थेत एकंदरीतच उत्पादनक्षमता कमी व व्यापारी पिकांच्या अशक्यतेमुळे कुटुंबाचे उत्पन्नमान कमी राहत असल्याने कुटुंबातील सदस्यांना उत्पन्न व रोजगारासाठी इतरत्र स्थलांतर करून कुटुंबाच्या उत्पन्नाला सहयोग देणे आवश्यक असते. किंबहुना तसे सक्तीचेही असते. त्यामुळे ज्या ठिकाणी शाश्वत कृषीक्षेत्रासाठी आवश्यक असणारा पाणीपुरवठा नसेल तर अशा भागातील कुटुंबातील सदस्यांचे स्थलांतर अपरिहार्य असते. तसेच प्रकल्प लाभधारक कुटुंबाचे उत्पन्न वाढल्यामुळे मुलांना शिक्षण देण्याची क्षमता वाढून त्यांचे नोकरीतील प्रमाण वाढते व शेतीवरील अवलंबित्व कमी होते. असाच अनुभव हरितक्रांतीच्या पहिल्या टप्प्यानंतर ग्रामीण भागाचे स्थित्यंतर होताना आल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणाच्या या उपभागात आम्ही प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूहाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अवलोकन करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याअंतर्गत राहणीमान, घराची स्थिती, नोकरी व स्थलांतर इत्यादी घटकांचा त्यात समावेश केला आहे.


### तक्ता ४.१: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे घरमालकी विषयक विवेचन

| घराची मालकी | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | प्रमाण (%) | एकूण | प्रमाण (%) |
| होय | १७४ | ९६.६७ | २१ | १०० |
| नाही | ६ | ३.३३ | ० | ०० |
| एकूण | १८० | १०० | २१ | १०० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

### आलेख ४.१: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे घरमालकी विषयक विवेचन









### तक्ता४.१(अ): प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे घराच्या प्रकारानुसार विवेचन

| घराची मालकी | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | प्रमाण (%) | एकूण | प्रमाण (%) |
| पक्के | २१ | ११.६७ | १९ | ९०.४८ |
| कच्चे | ११४ | ६३.३३ | ० | ०० |
| छपराचे | ३९ | २१.६७ | २ | ९.५२ |
| घर नाही | ६ | ३.३३ | ० | ०० |
| एकूण | १८० | १०० | २१ | १०० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

## आलेख ४.२: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे घराच्या प्रकारानुसार विवेचन





तक्ता क्रमांक ४.१, ४.१ (अ) यांतील प्राथमिक माहितीच्या पृथक्करणावर दृष्टिक्षेप टाकला तर असे निदर्शनास येते की एकूण प्रकल्पबाधीत कुटुंबापैकी ९६.६७ टक्के कुटुंबाकडे स्वत:चे राहते घर आहे तर नियंत्रण समूहातील सर्वच (१०० टक्के) कुटुंबाना स्वत:चे मालकीचे राहते घर आहे. घर प्रकारानुसार विवेचन केले. तक्ता क्रमांक १ (अ)मधून असे निदर्शनास येते की, एकूण ९६.६७ टक्के घर असणाऱ्या कुटुंबापैकी ६३.३३ टक्के प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांची घरे कच्ची आहेत. परंतु नियंत्रण समूहापैकी अत्यल्प शेतकऱ्यांची घरेछपराची अथवा कच्ची आहेत असे दिसून येते. एकूण ९०.४८ टक्के सर्वेक्षित नियंत्रण समूह कुटुंबाची घरे पक्की आहेत.तर या गटातील फक्त ९.५२ टक्के शेतकरी असे आहेत की त्यांची घरे छपराची आहेत. तर प्रकल्पबाधीत कुटुंबात हेच प्रमाण २१.६७ टक्के आहे. यावरून असे निदर्शनास येते की प्रकल्प लाभार्थी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती प्रकल्पबाधीतांपेक्षा निश्चितच सुधारलेली असणे अपेक्षित होते व आहेसुद्धा. असेच विवेचन घरातील एकूण खोल्यांच्या संख्येवरून मिळते. म्हणजेच घरातील खोल्यांच्या संख्येवरून प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह कुटुंबाचा विचार केला तर असा निष्कर्ष मिळतो की प्रकल्पबाधीतांपेक्षा प्रकल्प लाभधारक कुटुंबांच्या घरखोल्यांची सरासरी संख्या जास्त आहे (तक्ता क्रमांक ४.२).


तक्ता ४.२: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या घर आकारमानावरून विवेचन

| घर खोल्या संख्या | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | प्रमाण (%) | एकूण | प्रमाण (%) |
| घर नाही | ६ | ३.३३ | ३ | १४.२९ |
| १ | ७ | ३.८५९ | ० | ०० |
| २ | ३६ | २०.०० | ० | ०० |
| ३ | ७३ | ४०.५६ | ९ | ४२.८६ |
| ४ | ३३ | १८.३३ | ६ | २८.५७ |
| ५ | १२ | ६.६७ | १ | ४.७६ |
| ६ | ६ | ३.३३ | २ | ९.५२ |
| ७ | ५ | २.७८ | ० | ०० |
| ८ | १ | ०.५६ | ० | ०० |
| १० | १ | ०.५६ | ० | ०० |
| एकूण | १८० | १०० | २१ | १०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

## आलेख ४.३: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या घर आकारमानावरून विवेचन









## तक्ता ४.३: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे नोकरीवरून विवेचन

| नोकरी आहे/नाही | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | प्रमाण (%) | एकूण | प्रमाण (%) |
| होय | ७९ | ४५.५६ | १२ | ५७.१४ |
| नाही | १०१ | ५४.४४ | ९ | ४२.८६ |
| एकूण | १८० | १०० | २१ | १०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

### आलेख ४.४ : प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांचे नोकरीवरून विवेचन




सुरूवातीस उल्लेख केल्याप्रमाणेच मधील प्राथमिक माहिती समोर येते. पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभांमुळे कुटुंबाचे कृषी उत्पादन व उत्पन्न वाढल्याने मुलांच्या शिक्षणाचा खर्च भरणा करू शकतात. शिक्षणामुळे नोकरीच्या संधी वाढतात व त्यामुळेच कुटुंब सदस्य नोकरीत असणाऱ्या नियंत्रण समूह कुटुंबाचे प्रमाण (५७.१४ टक्के) प्रकल्पबाधीत कुटुंबापेक्षा (४५.५६ टक्के) जास्त आहे. आणि कुटुंब सदस्य नोकरीत नसणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अगदी याविरूद्ध म्हणजे अनुक्रमे ४२.६८ टक्के व ५४.४४ टक्के इतके असल्याचे दिसून येते. यानंतरची तक्ता २ (अ) मधील आकडेवारी नोकरीच्या निमित्ताने स्थलांतराचे ठिकाण दर्शविणारी आहे.


### तक्ता ४.३ (अ): प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या सदस्य स्थलांतराचे विवेचन

| स्थलांतराचे ठिकाण | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | प्रमाण (%) | एकूण | प्रमाण (%) |
| मुंबई | ५६ | ६८.९२ | ६ | २८.५७ |
| पुणे | ७ | ९.४६ | २ | ९.५२ |
| आजरा | ६ | ८.११ | १ | ४.७६ |
| कोल्हापूर | ३ | ४.०५ | ० | ०० |
| देवगड | २ | २.७० | ० | ०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रत्नागिरी | १ | १.३५ | १ | ४.७६ |
| आर्मी | १ | १.३५ | ० | ०० |
| गडहिंग्लज | १ | १.३५ | ० | ०० |
| मा. शा. | १ | १.३५ | ० | ०० |
| गाव | १ | १.३५ | ० | ०० |
| प्रतिसाद नाही | १०१ | ० | ११ | ५२.३८ |
| एकूण | १८० | १०० | २१ | १०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

### आलेख ४.५: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या सदस्य स्थलांतराचे विवेचन




उपरोक्त तक्ता क्रमांक ४.३ (अ)मधील माहितीवरून असे निदर्शनास येते की प्रकल्पबाधीत कुटुंबातील नोकरीनिमित्त स्थलांतरीत झालेल्या सदस्यांपैकी ६८.९२ टक्के (दोन तृतीयांश पेक्षा जास्त) सदस्य मुंबईत स्थलांतरीत झाले आहेत. म्हणजेच प्रकल्पबाधीत कुटुंबातील सदस्यांपैकी जे कोणी नोकरीनिमित्त स्थलांतरीत झाले आहेत ते असंघटित अथवा अकुशल क्षेत्रातच जास्त प्रमाणात सामावले आहेत असे दिसून येते. कारण महाराष्ट्राच्या ग्रामीण व दुष्काळी भागातून परंपरेने मुंबईत

स्थलांतरीत होणाऱ्यांपैकी बहुतांश नोकर अकुशल अथवा अल्प कुशल असल्याचेच दिसून येते व तसा अनुभवही आहे (तक्ता क्रमांक ४.३ (अ)).

**तक्ता ४.४ : प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या टिकावू उपभोग्य वस्तू व कृषी भांडवली आदानांच्या मालकीविषयक विवेचन**

| टिकावू उपभोग्य वस्तू व कृषी भांडवली आदाने | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | | नियंत्रण समूह कुटुंबे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रमाण (%) | प्रमाण (%) | संख्या | प्रमाण (%) | प्रमाण (%) |
| टीव्ही | ११३ | ६२.७८ | १७.१२ | २१ | १०० | १३.९ |
| फ्रीज | १७ | ९.४४ | २.५७ | १० | ४७.६२ | ६.६२ |
| चारचाकी | ७ | ३.८९ | १.०६ | ६ | २८.५७ | ३.९७ |
| मोबाईल | २४९ | १०० | ३७.७२ | ४५ | १०० | २९.८ |
| मोटारसायकल | ४९ | २७.२२ | ७.४२ | २९ | १०० | १९.२ |
| गॅस जोडणी | ३५ | १९.४४ | ५.३ | २० | ९५.२४ | १३.२४ |
| ट्रॅक्टर | ५ | २.७८ | ०.७५ | ५ | १४.२९ | १.९८ |
| डिझेल इंजिन | १८ | १०.०० | २.७२ | ३ | १४.२९ | १.९८ |
| पंप | ३४ | १८.८९ | ५.१५ | १० | ४७.६२ | ६.६२ |
| पॉवरटिलर | ५ | २.७८ | ०.७५ | २ | ९.५२ | १.३२ |
| सायकल | १७ | ९.४४ | २.५७ | NA | NA | NA |
| बैलगाडी | १८ | ८.८९ | २.४२ | NA | NA | NA |
| नांगर | ३४ | १८.८९ | ५.१५ | NA | NA | NA |
| वॉशिंग मशिन | ३ | १.६७ | ०.४५ | NA | NA | NA |
| पंखे | ५५ | ३०.५६ | ८.३३ | NA | NA | NA |
| रेडिओ | ३ | १.६७ | ०.४५ | NA | NA | NA |
| एकूण | ६६० | | | १५१ | | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

कृषी मत्ता तथा भांडवली आदाने व घरगुती वापराच्या टिकावू उपभोग्य वस्तूंची मालकी, वापर व उपभोगाच्या आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला तर असा निष्कर्ष निघतो की प्रकल्बाधीत मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे आणि प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह कुटुंबात पुष्कळ तफावत आहे. यावरून दोन्ही प्रकारच्या कुटुंब समूहातील जीवनमान दर्जात असलेली तफावत अधोरेखित होते. दूरदर्शन किंवा फ्रिजसारख्या जवळजवळ सहजी व आवश्यक असलेल्या टिकावू उपभोग्य वस्तूंचा विचार केला तर असे निदर्शनास येते की प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहाच्या सर्व कुटुंबाकडे दूरदर्शन संच आहेत. मात्र प्रकल्पबाधीत कुटुंबापैकी फक्त ६२.७८ टक्के कुटुंबाकडेच दूरदर्शन संच आहेत. फ्रिजच्याबाबत मात्र दोन्ही प्रकारच्या कुटुंब समूहात फारशी तफावत दिसून येत नाही. कारण फ्रिज असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अनुक्रमे ९.४४ टक्के व ६.६२ टक्के इतके आहे असे दिसून आले. कृषी उत्पादकता, उत्पादन व पिक पद्धती ठरविणारे एक महत्त्वाचे आदान म्हणून डिझेल इंजिन/विद्युत पंपाचा विचार केला जातो. कारण ज्या ठिकाणी जलसिंचनाची अथवा पाटपाणी चारी पोहचत नाही किंवा ज्या शेतकऱ्यांना सिंचन प्रकल्पाचा लाभ मिळत नाही अशा कुटुंबाना पाणीपुरवठ्याकरीता डिझेल इंजिन किंवा विद्युत पंप अतिशय महत्त्वाचे साधन मानले जाते. अनुक्रमे एकूण १०.०० व १८.८९ टक्के प्रकल्पग्रस्त कुटुंबाकडे डिझेल इंजिन व विद्युत संच आहेत तर १.९८ टक्के व ६.६२ टक्के प्रकल्प लाभधारकांकडेच या दोन साधनांची उपलब्धता आहे. कदाचित पाटपाण्याचा शेतापर्यंत पुरवठा असल्यामुळे या समूहातील शेतकरी कुटुंबाना (नियंत्रण समूह) या दोन साधनांची फारशी आवश्यकता नसावी. पर्यायाने अशा शेतकरी कुटुंबांना सार्वजनिक गुंतवणूकीतून पाणीपुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे स्वगुंतवणूकीची आवश्यता नाही असे अधोरेखित होते.

तक्त्यात नमूद केलेल्या गृहोपयोगी टिकावू उपभोग्य व कृषीभांडवली आदानस्वरूप वस्तूंच्या मालकी व वापरात एकदंरीतच प्रकल्प लाभधारक कुटुंबे प्रकल्पबाधीत कुटुंबापेक्षा अग्रेसर असल्याचे दिसून आले. याला अपवाद फक्त डिझेल इंजिन व विद्युत पंप या दोन आदान साधनांचा असल्याचे प्रकर्षाने जाणवते. याचे प्रमुख कारण प्रकल्प लाभधारक कुटुंबाचे वाढलेले उत्पन होय. कारण वार्षिक पिक पद्धती, उत्पन्नाची शाश्वतता व व्यापारी पिकांची लागवड करण्यासाठी शाश्वत पाणीपुरवठा असणे आवश्यक असते. आणि असा शाश्वत पाणीपुरवठा लाभक्षेत्रात शक्य असल्याने त्यांचे एकूण उत्पादन व उत्पन्न प्रकल्पबाधीतांपेक्षा जास्त असण्याची शक्यता असल्याने टिकावू वस्तू उपभोग क्षमतेतही तफावत दिसून येते.


### तक्ता ४.५: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या जिरायत तथा बागायत जमिन वापरासंबंधीचे विवेचन

| जमिनीचे प्रकार | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | | निव्वळ तफावत |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण (एकर) | प्रमाण (%) | एकूण (एकर) | प्रमाण (%) | |
| जिरायत | ५०४.३७ (५०.१६) | २.८० | २०.३६ (२१.२०) | ०.९७ | १.८३ |
| बागायत | २७२.४९ (२७.११) | १.५१ | ३२.९९ (४७.३१) | १.५७ | - ०.०६ |
| पडीक | २३०.६४ (२२.९४) | १.२८ | १६.३७ (३४.४७) | ०.७८ | ०.५० |
| एकूण | १००५ | ५.५८ | ६९.७२ | ३.३२ | २.२६ |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

टिप: कंसातील आकडे एकूणाशी प्रमाण/टक्केवारी दर्शवितात.

### आलेख ४.६: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या जिरायत तथा बागायत जमिन वापरासंबंधीचे विवेचन




कोणत्याही जलसंधारण प्रकल्पाचा पहिला व महत्त्वाचा परिणाम म्हणजे लाभक्षेत्रातील पिक पद्धती आणि जिरायत व बागायत जमिनीच्या प्रमाणात घडून येणारा बदल होय. असा बदल तपासताना प्रकल्पबाधीत व चित्री प्रकल्प लाभक्षेत्रातील जमिनधारणेचे वर्गीकरण केले असता वरील तक्ता क्रमांक ४.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्थिती समोर येते. प्रकल्प विस्थापित शेतकरी, की ज्यांची शेती पूर्णपणे पर्जन्यमानावर अथवा स्वयंनिर्मित सिंचन साधनांवर अवलंबून आहे त्यांच्या एकूण धारणक्षेत्रापैकी अर्ध्यापेक्षा अधिक (५०.१६ टक्के) धारणक्षेत्र जिरायत तर साधारणपणे एक चतुर्थांश

(२७.११ टक्के) एवढे धारणक्षेत्र स्वयंनिर्मित बागायत क्षेत्र असल्याचे दिसून येते. याउलट प्रकल्प लाभधारक मौजे हाजगोळी (खु)स्थित नियंत्रण समूह शेतकऱ्यांच्या धारणक्षेत्राचा विचार केला तर प्रकल्प लाभामुळे एकूण धारणक्षेत्रापैकी जवळजवळ अर्धे (४७.३२ टक्के) धारणक्षेत्र बारमाही बागायत झाले आहे. तर याउलट एक तृतियांश (३२.२० टक्के) इतके धारणक्षेत्र अद्यापही जिरायत अवस्थेत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आजरा तालुक्यातील जमिनीचा उंचसखलपणा. कारण डोंगराळ प्रदेश असल्यामुळे उंच/टेकडीवरील शेतांपर्यंत पाटपाणी पोहोचू शकत नाही. आणि बहुतांश शेतकऱ्यांनी ठिबक अथवा तुषार सिंचनाचा अवलंब केलेला नाही. याच कारणामुळे प्रकल्पबाधीत २२.९५ टक्के व चित्री लाभक्षेत्रामधील नियंत्रण समूह शेतकऱ्यांच्या २३.४८ टक्के एकूण धारणक्षेत्रापैकी पड जमिनीचा विचार केला तर त्यात फारशी तफावत दिसून येत नाही. तसेच पर्जन्यमान समाधानकारक असल्याने हंगामी धाणपीके मुबलक प्रमाणात येतात. त्यामुळे उंच शेतांपर्यंत पाटपाणी नेण्याची आवश्यकता भासत नाही. त्यामुळे जिरायतीचे प्रमाण जास्त आहे.

कारण आजरा तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान साधारणपणे १३०० मी.मी. इतके असल्याने हंगामी पाण्याची भरघोस उपलब्धता असते. त्यामुळे पावसावर येणारी पिकेही चांगली येतात. उत्तम उत्पादकता देतात. त्यामुळे अशा उंचीवरील शेतात पाईपलाइनचा खर्च करून पाणी पोहोचविण्याची गरज या शेतकऱ्यांना भासत नसावी.

जिरायत आणि बागायत परिक्षेत्रातील सरासरी धारणक्षेत्राचा विचार केला तर जिरायतपेक्षा बागायत परिक्षेत्रातील सरासरी कृषी धारणक्षेत्राचे आकारमान नेहमी कमी असते. तक्ता क्रमांक ४.४ मधील प्राथमिक नोंदीवरून हे सिद्ध होते व याची अनेक कारणे असू शकतात. यापैकी महत्त्वाचे कारण म्हणजे बागायत परिक्षित्रातील जमिनीचे खरेदी विक्रीच्या माध्यमातून हस्तांतरण होण्याचे प्रमाण नेहमीच कमी अथवा अत्यल्प असल्याने कुटुंबाच्या वारसाहक्काने सातत्याने त्याच जमिनीचे विभाजन व तुकडीकरण होत राहते. त्याचप्रमाणे बागायत परिक्षेत्रातील लोकांच्या स्थलांतरणाचे प्रमाणही कमी असते. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांना स्वत:च्या शेतावर उपजिविकेची साधने निर्माण झालेली असल्याने रोजंदारीकरिता स्थलांतर होत नसल्याने धारणक्षेत्राचे आकारमान सतत कमी होताना दिसून येते. तसेच बागायत परिक्षेत्रामधील पिक पद्धती आपोआपच व्यापारी स्वरूपाची होत जाते व त्यातून अधिकचे उत्पादन व उत्पन्न मिळण्याची शक्यता वाढते. त्यामुळे पड जमिन लागवडीयोग्य करून पिकाखाली आणल्यामुळे अशा पड जमिनीचे प्रमाण जिरायत परिक्षेत्रापेक्षा आपोआपच कमी होते. तक्ता क्रमांक ४ मधील प्राथमिक माहितीचा विचार केला तर नियंत्रण समूहाचे एकूण सरासरी धारणक्षेत्र (३.३२ एकर) विस्थापितांच्या एकूण सरासरी (५.५८ एकर) धारणक्षेत्रापेक्षा २.२६ एकर ने कमी असल्याचे दिसून येते. अशीच माहिती सरासरी जिरायत (२.८० एकर व ०.९७ एकर) धारणक्षेत्राबाबतही दिसून येते. (तक्ता क्रमांक ४.४) परंतु सरासरी बागायत

धारणक्षेत्राचा विचार केला तर नियंत्रण समूहाचे धारणक्षेत्र (१.५७ एकर) हे प्रकल्पबाधीतांच्या सरासरी बागायत धारणक्षेत्रापेक्षा (१.५१ एकर) जास्त असल्याचे निदर्शनास येते (कित्ता).

**तक्ता ४.६ : प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या पिकपद्धतीचे विवेचन**

| प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | | नियंत्रण समूह कुटुंबे | | |
|---|---|---|---|---|---|
| **वार्षिक** | **खरीप** | **रब्बी** | **वार्षिक** | **खरीप** | **रब्बी** |
| **ऊस** | भात | भात | ऊस | भात | भात |
| **आंबा** | नाचणी | नाचणी | भाजीपाला | नाचणी | नाचणी |
| **काजू** | भुईमूग | भुईमूग | फणस | भुईमूग | भुईमूग |
| **पेरू** | | | नारळ | | |
| **फणस** | | | चिक्कू | | |
| **जांभूळ** | | | आंबा | | |
| **रातंबा** | | | चारा पिके | | |
| **करवंद** | | | जांभूळ | | |
| | | | उंबर | | |
| | | | जांभूळ | | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

कोल्हापूर जिल्ह्याचा पश्चिमेचा भाग कोकणाशी प्रत्यक्षपणे जोडला गेलेला आहे. कोकण घाटमाथ्यापासूनच कोल्हापूर जिल्ह्याचा भूभाग सुरू होत असल्याने या प्रदेशाची भूरचना, वनसंपदा, पिकरचना, पर्जन्यमान व एकंदरीतच जीवनमान कोकणसदृश्य असल्याचे दिसून येते. हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम पाटबंधारे जलप्रकल्पाचे पाणलोट व लाभधारक ही दोन्ही क्षेत्रे आजरा तालुक्यात येतात. या तालुकयाचा भूप्रदेश कोकणसंलग्न घाटमाथ्यावरच असल्याने व पर्जन्यमान भरपूर असून (१३०० मिमी) येथील नदीनालेही वार्षिक प्रवाही असल्याचे दिसून येते. त्यामुळे एकंदरीतच पिकपद्धती बागायत प्रदेश सदृश्य आहे. तसेच चित्री प्रकल्पलाभ नियंत्रण क्षेत्रही आजरा तालुक्यातच येते. त्यामुळे पाण्याचा वर्षभर तुटवडा नसल्याने नियंत्रण समूह व प्रकल्पबाधीत क्षेत्राच्या पिकरचनेत

बदल नसल्याचे दिसून येते. दोन्ही विभागातील पिकरचनेचा विचार केला तर खरीप व रब्बी पिकांत भात, नाचणी व भूईमूग आणि वार्षिक पिकांच्या यादीत ऊस, आंबा, चिक्कू, नारळ, फणस, काजू, जांभूळ, पेरू, रातंबा इत्यादी फळपिके व जनावरांसाठी चाऱ्याच्या पिकांचा समावेश असल्याचे दिसून येते. त्यामुळे धरणापूर्वी व धरणानंतरच्या पिक पद्धतीत कोणताही बदल असल्याचे ठळक निरीक्षण नोंदविता येणे शक्य नाही.


याचाच अर्थ अथवा महत्त्वाचे अनुमान असे की जेथे-जेथे पाणी व धरणायोग्य जागा आहे अशा सर्वच ठिकाणी धरणे झालीच पाहिजेत असा धोरणकर्त्यांचा व पाटबंधारे विभागातील तज्ञांचा किंवा जललाभाच्या अपेक्षेने जनतेचा आग्रह असण्याची आवश्यकता नाही. किंबहुना अशा भूभागाकडे वेगळे लक्ष देवून कोल्हापूर बंधाऱ्यासारख्या पायाभूत सुविधा निर्माण करून उन्हाळी पिकांसाठी पाणीपुरवठा निर्माण करण्यास हरकत नसावी. यामुळे सार्वजनिक खर्चात प्रचंड बचत होवून झालेली बचत इतर विकास कामांवर तसेच तुटीच्या प्रदेशाकडे वळविता येवू शकेल. यातून सार्वजनिक खर्चाची कार्यक्षमता साधता येवू शकेल. इतकेच नव्हे तर जलप्रकल्पांकरीता करावे लागणारे भूमि अधिग्रहण टाळता येवू शकेल. तसेच प्रकल्प विस्थापितांचा व पुनर्वसनाचा तिढा निर्माण होणार नाही. येथे असेही नमूद करणे आवश्यक आहे की राष्ट्रीय जल लवादाने देवू केलेले राज्याच्या हिश्श्याचे काही पाणी धरणे न बांधल्यामुळे दुसऱ्या राज्यात गेले तरी त्यात फारसे नुकसान मानण्याचे कारण नाही. कारण संघराज्यीय पद्धतीचा विचार केला तर भूभागाच्या दृष्टिने भारतासारख्या खंडप्राय देशात असे घडणे स्वाभाविकच आहे. यावर एक व्यवहार्य उपाय असा असू शकतो व तो म्हणजे जर नदीखोऱ्याच्या वरच्या राज्यातील असे धरण न बांधता व पर्यायी पायाभूत सुविधा उभारल्यामुळे शिल्लक राहिलेल्या व प्रवाहाच्या खालच्या राज्यात गेलेल्या पाण्याच्या मोबदल्यात अशा अतिरिक्त लाभधारक राज्याने वरच्या राज्याला त्याची वार्षिक आर्थिक भरपाई देवू करावी. किंवा वरच्या राज्याने धरण बांधण्याऐवजी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचा वापर केला तर अशा बंधाऱ्यांच्या बांधकामाचा खर्च खालच्या राज्याने देण्यास हरकत नसावी. यातून आंतरराज्यीय सलोखाही वृद्धिंगत होवू शकतो. आणि वरच्या राज्याच्या धरणावरील खर्च, भूमि अधिग्रहण, विस्थापन व पुनर्वसन यासारख्या समस्या तर मार्गी लागतीलच परंतु पर्यावरणाचेही नुकसान टाळता येणे शक्य होईल.

**तक्ता ४.६ (अ): प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या पिकपद्धतीचे विवेचन**

| | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | प्रमाण (%) | एकूण | प्रमाण (%) |
| होय | ७९ | ४३.८९ | १० | ४७.६२ |
| नाही | १०१ | ५६.११ | ११ | ५२.३८ |
| एकूण | १८० | १०० | २१ | १०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**आलेख ४.७: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या पिकपद्धतीचे विवेचन**




आजरा तालुक्याचे पर्जन्यमान कोकणाप्रमाणेच जास्त असल्याने १३०० मि. मी. व बहुतांशी वर्षभर पाण्याचे दुर्भिक्ष नसल्यामुळे पाटपाण्याची व्यवस्था नसली तरी शेतकरी स्वखर्चाने वार्षिक पिक पद्धती विकसित करतात असेच दिसून येते. त्यामुळे प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक या दोन्हीही समूहांकडील फळबाग लागवडीची चौकशी केली असता पिकरचनेप्रमाणेच याबाबतही फारशी तफावत निदर्शनास येत नाही. एकूण सर्वेक्षित प्रकल्पबाधीतांपैकी ४३.८९ टक्के कुटुंबांची स्वत:ची फळलागवड आहे तर नियंत्रण समूह कुटुंबाचे हेच प्रमाण ४७.६२ टक्के इतके असल्याचे निदर्शनास आले. अर्थात प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांकरवी वार्षिक पिकरचेनचा अवलंब होणे सहज शक्य असल्याने अशा कुटुंबाचे फळबाग लागवड प्रमाण प्रकल्पबाधीतांपेक्षा

अधिक असणे अगदीच सहज शक्य आहे. परंतु प्रकल्पबाधीतांचेही फळबाग लागवडीचे प्रमाण अगदीच अल्प आहे असेही नाही.

### ४.३: उत्पादन क्षमता:

पिकरचनेप्रमाणेच प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह कुटुंबाच्या पीक उत्पादनक्षमतेतही फारशी तफावत दिसून येत नाही. याचे मुख्य कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे व एकंदरीतच जास्त पर्जन्यमान, दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांना पाण्याची वर्षभर उपलब्धता आणि समान ''कृषी वातावरण'' विषयक (Agro Climatic)परिस्थिती होय.

**तक्ता ४.७ :प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या पिकवार एकरी उत्पादनक्षमतेचे विवेचन**

| पिके | प्रकल्प विस्थापित कुटुंबे प्रती एकर उत्पादकता (क्विंटल/मेट्रिक टन) | | नियंत्रण समूह कुटुंबे प्रती एकर उत्पादकता (क्विंटल/मेट्रिक टन) | |
|---|---|---|---|---|
| | खरीप | रब्बी | खरीप | रब्बी |
| भात | ७.५६ | १३.६४ | ७.२१ | १३.०० |
| नाचणी | ३.४० | ३.२४ | २.१४ | ३.३३ |
| भुईमूग | १.७७ | १.८६ | ३.०० | ३.०० |
| ऊस (मेट्रिक टन) | ११.२६ | | ३४.६५ | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

तक्ता क्रमांक ४.६ मधील प्राथमिक माहितीवर आधारित विश्लेषण केल्यास वर उल्लेख केल्याप्रमाणे माहिती प्राप्त होते. रब्बी व खरीप या दोन्ही हंगामातील भात, नाचणी व भूईमूग या पिकांच्या एकरी उत्पादकतेत प्रकल्पबाधीत व लाभधारक नियंत्रण समूह अशी शक्यतो तफावत दिसून येत नाही. कारण ही पिके ३-४ महिने अशा अल्प कालावधीची पिके आहेत. या कालावधीत प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक या दोन्हीही समूहाकडे पाण्याची मुबलक उपलब्धता असते. परंतु ऊसासारख्या वार्षिक पिकाच्या एकरी उत्पादनक्षतेत मात्र आमूलाग्र तफावत दिसून आली. याचे कारण ऊस पिकाला उन्हाळ्यातही पाण्याची आवश्यकता असते आणि उन्हाळ्यात मात्र बिगर सिंचन लाभधारक क्षेत्रात पाणी उपलब्ध करणे शक्य होत नाही. किंवा बहुतेकदा उन्हाळ्यात पाणी कमी पडते. तक्ता क्रमांक ६ मधील एकरी ऊस उत्पादनाच्या आकडेवारीचा विचार केला तर प्रकल्पबाधीत कुटुंबाची ऊसाची सरासरी एकरी उत्पादनक्षमता ११.२६ तर नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांची एकरी ऊस उत्पादनक्षमता ३४.६५ मेट्रिक टन इतकी दिसून आली. म्हणजेच या दोन्ही क्षेत्रातील ऊस उत्पादनक्षमतेचा विचार केला तर प्रकल्प लाभधारक क्षेत्रातील ऊस उत्पादनक्षमता बिगर

लाभधारक प्रकल्पबाधीत क्षेत्राच्या ३०७.७२ टक्के जास्त असल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकारे वार्षिक व्यापारी पिकाच्या उत्पादनक्षमतेबाबत शाश्वत पाणीपुरवठा किती महत्त्वाचा कृषी आदान घटक आहे हे लक्षात येते. अर्थात शेतीचे बागायतीकरण म्हणजे फक्त ऊस उत्पादनावर भर देणे असा त्याचा अर्थ होत नाही. जर ऊस पिकाव्यतिरिक्त इतर सर्व पिकांची सरासरी उत्पादनक्षमता प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक या दोन्ही समूहाबाबत जवळजवळ समान असेल तर फकत लौकिक अर्थाने ऊस बागायत करण्यासाठी धरण निर्मिती करून विस्थापन, पुनर्वसन, पर्यावरणविषयक आणि सार्वजनिक खर्चाची अकार्यक्षमता यासारख्या समस्यांना आमंत्रण देण्याचे काहीही कारण नाही.

**तक्ता ४.८: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाची फळ लागवडीचे विवेचन**

| फळझाडे | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | सरासरी फळझाडे | लागवडदार | सरासरी फळझाडे | लागवडदार |
| काजू | २१३ | २० | ७५ | ४ |
| आंबा | ८ | १ | ० | ० |
| पेरू | २० | ३ | ० | ० |
| एकूण | २४१ | २४ | ७५ | ४ |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

सर्फनाला प्रकल्पग्रस्त परिसरात मुबलक वनसंपदा असल्याचे दिसून आले. तसेच अनेक प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांकडे स्वत:च्या मालकीची फळबाग लागवड केल्याचेही दिसून आले. यात प्रामुख्याने काजू, आंबा, पेरू इत्यादी प्रकारच्या फळपिकांचा समावेश असल्याचे दिसून येते. ज्या प्रकल्पग्रस्तांनी अशी फळबाग लागवड केली आहे त्यांची सरासरी संख्या व फळझाडे पुढीलप्रमाणे काजू २१३ (२०), आंबा ८ (१) व पेरू २० (३) अशी असल्याचे दिसून येते. प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहाच्या बाबतीत हा आकडा जरासा वेगळा दिसून येतो. यामध्ये फक्त ४ शेतकऱ्यांनी काजूची लागवड केली असून प्रत्येकी ७५ काजू झाडे त्यांच्याकडे असल्याचे दिसून आले. यावरून असे समजते की प्रकल्प लाभक्षेत्रात फळपिकांऐवजी ऊसासारख्या तुलनेने कमी कष्ट व विक्रीची समस्या नसलेल्या पिकास प्राधान्य दिले जाते (तक्ता क्रमांक ७).तसेच जेंव्हा सिंचन प्रकल्पांचे लाभ मिळतात तेंव्हा शक्यतो ऊस पिकाकडेच शेतकऱ्यांचे अनावश्यक आकर्षण असल्याचे सर्वदूर

महाराष्ट्राचा अनुभव येथेही येतो व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक कुटुंबांच्या बाबतीत सत्यतेत उतरतो.

वर नमूद केल्याप्रमाणे एकंदरीतच आजरा तालुक्याचे पर्जन्यमान कोकणसदृश्य व मुबलक असल्याने या तालुक्यात सरकारी व खाजगी मालकीची वनसंपदाही पुष्कळ असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे सरकारी वन विभागाव्यतिरिक्त खाजगी वनसंपदाही धरणाच्या बुडीत क्षेत्रात येते. यात काही आश्चर्यनाही असेच आम्हाला क्षेत्रभेटी व आकडेवारीवरून लक्षात आले. परंतु अशा वनसंपदेचे नुकसान प्रचंड आहे असे निश्चित.

**तक्ता ४.९: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाच्या खाजगी वनसंपदेचे विवेचन**

| प्रकार | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | | नियंत्रण समूह कुटुंबे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मालकी कुटुंबे | वनसंपदा | कौटुंबिक सरासरी | मालकी कुटुंबे | वनसंपदा | कौटुंबिक सरासरी |
| काजू | १३१ | ८५६८ | ६५ | १० | ४०६ | ७ |
| आंबा | ३१ | १४४४ | ८ | १३ | ९० | १ |
| पेरू | १२४ | २६० | १२ | ० | ० | ० |
| फणस | १०१ | १०३२ | १० | १० | ६० | १ |
| जांभूळ | १३ | २७६८ | १३१ | ३ | १७ | ४४ |
| मेसकाठी | ८१ | १३०९१८ | १६१६ | १ | ५०० | ४१ |
| आमसूल | १५ | २६५ | १५ | ० | ० | ० |
| किदंळ | १२ | १६९९ | ११ | ० | ० | ० |
| आईन | १७ | २३० | १६ | ० | ० | ० |
| नानेस | १२ | १३० | १६ | ० | ० | ० |
| बाभूळ | २५ | २८० | ११ | ० | ० | ० |
| रातंबा | २१ | १००९ | ४८ | ० | ० | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| करवंद | १४ | ४६१ | ३३ | ० | ६५ | ० |
| नारळ | ० | ० | ० | ८ | ६५ | ० |
| निलगिरी | ० | ० | ० | २ | ३२ | ० |
| चिक्कू | ० | ० | ० | २ | ११ | ० |
| इतर | ० | ० | ० | ३ | ३० | १० |
| एकूण | | १४९०६४ | | | १२११ | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

तक्ता क्रमांक ४.८ मधील आकडेवारीवरून प्रकारनिहाय वनसंपदेची एकूण व कौटुंबिक सरासरी संख्या दिसून येते. विस्थापित व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह शेतकऱ्यांची वनसंपदेची तुलना केली तर प्रकल्प विस्थापितांची वनसंपदा नियंत्रण समूहापेक्षा अनेक पटींनी अधिक आहे. कारण प्रकल्पबाधीत कुटुंबाची एकूण वनसंपदा १४९०६४ (सरासरी प्रती कुटुंब ८२८.१३) तर नियंत्रण समूहाची एकूण वनसंपदा १२११ (सरासरी प्रती कुटुंब ६०.५५) इतकी असल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रस्तुत प्रकल्पात मोठ्या प्रमाणात खाजगी वनसंपदेचे नुकसान होणार यात शंका नाही. या सर्व प्रकारच्या बाधीत वनसंपदेकरीता प्रकल्पग्रस्तांना रकमेच्या स्वरूपात नुकसान भरपाई मिळणार असली तरीही वनसंपदा कायमस्वरूपी नष्ट होणार असल्याने पर्यावरणाचे नुकसान निश्चितच जास्त आहे. तसेच हा सर्व परिसर पश्चिम घाटास लागून असल्याने वनसंपदेबरोबरच इतर नैसर्गिक नुकसान अधिक जास्त असू शकते.

## ४.४: जलनियोजन:

महाराष्ट्राच्या एकूण लागवडीयोग्य जमिनीपैकी (GCA) जलसिंचनाचे प्रमाण साधारणपणे १८ टक्के इतके सिमीत आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांची स्वयं गुंतवणूकीतून विहिरी, बोअरवेल यासारख्या मार्गांनी निर्माण केलेले जलस्त्रोतही महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

तक्ता ४.१०: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे कृषी जलस्त्रोत विवेचन

| पाण्याचा स्त्रोत | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रमाण (%) | संख्या | प्रमाण (%) |
| विहीर | १६ | ८.८९ | १ | ४.७६ |
| बोअरवेल | १३ | ७.२२ | १ | ४.७६ |
| नदी | २७ | १५.०० | ० | ०० |
| शेततळे | ० | ०० | ० | ०० |
| तलाव | १ | ०.५६ | ० | ०० |
| नदीपाट | ५९ | ३२.७८ | ० | ०० |
| नदी समांतर चारी | ० | ०० | २१ | १०० |
| इतर | २५ | १३.८९ | ० | ०० |
| आधार | १८० | | २१ | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

तक्ता क्रमांक ४.९ मधील पृथक्करीत आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की पारपोली प्रकल्पगस्त शेतकरी सिंचन नियोजनाकरिता प्रामुख्याने विहीर (८.८९ टक्के), बोअरवेल (७.२२ टक्के), नदी (१५ टक्के), तलाव (०.५६ टक्के) व नदीतून काढलेल्या समांतर चारीवर (३२.७८ टक्के) अवलंबून आहेत. याउलट प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहाचा विचार केला तर अल्प प्रमाणातील अनुक्रमे विहीर (४.७६ टक्के) व बोअरवेल (४.७६ टक्के) असे अवलंबित्व वगळता तर सर्व लाभधारकांना वार्षिक पाटपाण्याची (१०० टक्के) सुविधा उपलब्ध झाल्याचे दिसून येते. यावरून असे अनुमान निघते की प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे जलव्यवस्थापन पूर्णपणे स्वयंखर्चावर व स्वयंमगुंतवणूकीवर निर्भर असून प्रकल्प लाभधारक मात्र सरकारनिर्मित जलस्त्रोतांचा लाभ घेत आहेत.

प्रकल्पबाधीतांपैकी तीन ठिकाणच्या म्हणजेच मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे स्थित उपलब्ध सर्व १८० कुटुंबांचे जनगणना पद्धतीने सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण केले असता जलस्त्रोतांबाबत असे दिसून आले की एकूण १८० पैकी ३५ कुटुंबांनी स्वत:च्या विहिरी खणून


त्यावर डिझेल अथवा विद्युत पंपसेट बसविलेले होते. तर इतर १९ कुटुंबांनी बोअरवेल खोदून त्यावर पाणबुडी पंप (Submersible Pump) बसविलेले होते. परंतु नियंत्रण समूह कुटुंबाच्या बाबतीत विचार केला तर प्रत्येकी एका कुटुंबानेच विहीर व बोअरवेल खोदल्याचे दिसून आले. याचाच अर्थ लाभधारक शेतकऱ्यांना कृषी पाणीपुरवठ्याकरिता स्वत:च्या खाजगी गुंतवणूकीची आवश्यकता नाही (तक्ता क्रमांक ४.११).


**तक्ता ४.११: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे स्वत:च्या मालकीचे बोअरवेल व विहीरींचे यांचे विवेचन**

| प्रकार | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रमाण (%) | संख्या | प्रमाण (%) |
| विहीर | ३५ | १९.४४ | १ | ४.४६ |
| बोअरवेल | १९ | १०.५५ | १ | ४.७६ |
| आधार | १८० | | २१ | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**आलेख ४.८: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे स्वत:च्या मालकीचे बोअरवेल व विहीरींचे यांचे विवेचन**




**तक्ता ४.१२: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभपट्ट्यातील सरासरी भूजलपातळी विषयक विवेचन**

| प्रकार | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | नियंत्रण समूह कुटुंबे |
|---|---|---|
| | भूजलपातळी (फूट) | भूजलपातळी (फूट) |
| विहीर | २२ | ४० |
| बोअरवेल | २२१ | २५० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

उपरोल्लेखित तक्ता क्रमांक ४.११ मधील आकडेवारीच्या सहाय्याने प्रकल्प विस्थापित व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह क्षेत्रातील सरासरी भूजल पातळी दर्शविली आहे. तक्त्यातील आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की विस्थापित क्षेत्रातील विहीर खोदकामाची सरासरी भूजल पातळी २२ फूट तर बोअरवेलकरिता २२१ फूट आहे. याउलट प्रकल्प लाभक्षेत्रात या दोन्ही जलस्त्रोतांकरिताच्या भूजल पातळी अनुक्रमे ४० व २८० फूट खोल असल्याचे दिसून येते. याची दोन कारणे संभवतात. एक म्हणजे प्रकल्प लाभक्षेत्रात ऊसासारख्या विक्रमी पाणी वापराच्या व्यापारी पिक लागवडीमुळे जलस्त्रोतांचा अनियंत्रित वापर व उपसा होत राहतो व दुसरे कारण म्हणजे ऊसासारख्या व्यापारी पिकामुळे वर्षभर पाणी उपसा होत राहिल्याने भूगर्भातील पाणी पातळी खोल जाते. म्हणजेच प्रकल्प लाभक्षेत्रातील पिक पद्धती व अनियंत्रित पाणी वापर हे दोन्ही पर्यावरणाच्या दृष्टिने काहीसे हानीकारकच असल्याचे दिसून येते.


जलसिंचन प्रकल्पाचे लाभधारक नसलेली शेतकरी कुटुंबे उदरनिर्वाहासाठी स्वत:च्या शेतीव्यतिरिक्त इतर साधनांवर अवलंबून असणे अगदी अपरिहार्य असते. कारण अशा कुटुंबांना आपल्या पावसावर अवलंबून असणाऱ्या व व्यापारी पिके नसणाऱ्या शेतलागवडीतून पर्याप्त उत्पन्न मिळू शकत नाही.

**तक्ता ४.१३: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे रोजगारविषयक विवेचन**

| रोजगार | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | | | नियंत्रण समूह कुटुंबे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कुटुंबे | प्रमाण (%) | स्त्रिया | पुरुष | कुटुंबे | प्रमाण (%) | स्त्रिया | पुरुष |
| स्वत:ची शेती | ८३ | ४६.११ | ११६ | १२३ | ५ | २३.८० | २० | ५ |
| शेतमजूरी | ३९ | २१.६६ | ४२ | ५४ | ५ | २३.८० | ० | ४ |
| नोकरीला | ६५ | ३६.११ | १७ | ८९ | ३ | १४.२८ | ० | ४ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

आलेख ४.९: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे रोजगारविषयक विवेचन




मौजेपारपोली सर्फनाला विस्थापित व प्रकल्प लाभ नसलेले ४६.११ टक्के कुटुंबे रोजगारासाठी स्वत:च्या शेतलागवडीवर निर्भर आहेत. अनुक्रमे शेतमजूरी करणाऱ्यांचे प्रमाण २१.६६ टक्के व नोकरीवर निर्भर असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ३६.११ टक्के आहे. म्हणजेच कृषी लावगडीतून या कुटुंबांचा पूर्ण उदरनिर्वाह होणे शक्य नाही असेच दिसून येते. परंतु प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहातील परिस्थितीही फारशी भिन्न नाही असे दिसून येते.

तक्ता ४.१४: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे बिगर कृषी रोजगारविषयक विवेचन (पशुपालन)

| | प्रकल्प विस्थापित कुटुंबे | | | | नियंत्रण समूह कुटुंबे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाळणाऱ्यांची संख्या | प्रमाण (%) | पशु संख्या | प्रमाण (%) | पाळणाऱ्यांची संख्या | प्रमाण (%) | पशु संख्या | प्रमाण (%) |
| गाय | १५ | ९.६२ | १८ | ३.९६ | ३ | १५.०० | ५ | १०.०० |
| म्हैस | ९७ | ६२.१८ | १८९ | ४१.५४ | १४ | ७०.०० | २४ | ४८.०० |
| शेळी | २ | १.२८ | २१ | ४.६२ | २ | १०.०० | १५ | ३०.०० |
| मेंढी | ० | ०० | ० | ०० | ० | ०० | ० | ०० |
| कुक्कुटपालन | ४२ | १६.९२ | २२७ | ४९.८९ | १ | ५.०० | ६ | १२.०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | १५६ | १०० | ४५५ | १०० | २० | १०० | ५० | १०० |
| | रोजचे दूध व अंडी उत्पादन तपशील | | | | | | | |
| | उत्पादक | लिटर | प्रमाण (%) | | उत्पादक | लिटर | प्रमाण (%) | |
| गाय | १४ | ४९ | ५५.६८ | | ४ | ३० | ४१.१० | |
| म्हैस | ७४ | २१९ | ८४.०९ | | ११ | ४३ | ५८.९० | |
| रोजचे अंडी उत्पादन | २७ | ९४ | | | १ | ४ | | |
| रोजचे दूध उत्पादन | ८८ | २६८ | | | १५ | ७३ | | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बिगर कृषी अथवा पूरक उत्पन्नाचे मार्ग आपोआपच निर्माण होतात. अथवा तसे मार्ग निर्माण करण्याची क्षमता लाभक्षेत्रातील शेतकरी कुटुंबात तयार होते. अशा बिगर कृषी अथवा जोड उत्पन्नाच्या मार्गांमुळे शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नात वृद्धी होवून त्यांचे जीवनमान सुधारणे शक्य बनते. उदाहरणार्थ दूधाचा व्यवसाय करण्यासाठी महत्त्वाचा घटक म्हणजे वर्षभर ओल्या चाऱ्याची उपलब्धता असावी लागते. आणि असा ओला चारा उपलब्ध होण्याच्या मार्गातील एकमेव अडथळा म्हणजे वर्षभर पाण्याची उपलब्धता नसणे. परंतु जलसिंचन प्रकल्प लाभक्षेत्रात हा प्रमुख अडथळाही दूर होणे शक्य असल्यामुळे अशा भागातील शेतकरी दूधाचा जोडधंदा सुरू करू शकतात. गाय, म्हैस, शेळी किंवा मेंढीसारखे प्राणी पाळून जोड उत्पन्नाचे मार्ग निर्माण करू शकतात. परंतु अशी परिस्थिती मात्र आम्ही केलेल्या सर्वेक्षणात दिसून आली नाही. कारण एकूणच आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला तर असे निदर्शनास येते की सिंचन प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह शेतकरी कुटुंबाचा असा जोडधंदा करण्याचा मानस प्रकल्पबाधीतांपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. कदाचित पिक पद्धतीतील बदल, उत्पादकता व उत्पन्नातील वृद्धीमुळे त्यांना अशा कृषी जोडधंद्याची आवश्कता वाटत नसावी असेही असू शकते. परंतु शाश्वत पाणीपुरवठ्याच्या ठिकाणी देशात इतरत्र कोठेही अध्ययन केले तर कृषी जोडधंद्यात निश्चितपणे वृद्धी झाल्याचीच उदाहरणे व अनुभव आहेत. वर दिलेल्या तक्ता क्रमांक १३ मधील आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला असता असे निदर्शनास येते की दुभती जनावरे अथवा शेळी, मेंढी किंवा कुक्कुटपालनाच्या कामी व त्यापासून मिळणाऱ्या उत्पादन व मिळकतीसंदर्भात प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहातील शेतकरी कुटुंबे प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या मागे आहेत. अथवा अशा पूरक व्यवसायात आजरा तालुक्यातील प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांची इच्छा नाही असेच निदर्शनास येते.

## ४.५: वित्तीय निर्देशांक:

वित्तीय सेवांमध्ये प्रामुख्याने बचत, कर्ज व विमा सेवा व त्यांचा वापर इत्यादी विषयक निर्देशकांचा समावेश होतो. गेल्या दोन दशकांत वित्तीय सेवाक्षेत्रात बचत गटांचे अस्तित्व अधिक प्रभावीपणे जाणवू लागले आहे. ग्रामीण भागात अशा प्रकारच्या वित्तीय सेवांचा वापर प्रामुख्याने त्यांच्या उपलब्धतेवर अवलंबून असतो. आणि अशा सेवांची उपलब्धता;उदा. बँक शाखा उघडणे संबंधित ग्रामीण भागाच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून असते. जर ग्रामीण भागाची कृषी व बिगर कृषी अर्थव्यवस्था सुधारलेली असेल व उत्पन्नाचे प्रमाण वाढून बचतीसाठी लोकांकडे नगद उपलब्ध असेल तेंव्हा त्यांना बँक, पोस्ट अथवा विमा खात्याची आवशयकता जाणवते. तसेच जेंव्हा संबंधित भागातील नागरिकांकडे पुरेशी बचत क्षमता निर्माण होते तेंव्हा बँकांनाही आपल्या शाखा सुरू करणे आर्थिकदृष्टया परवडते. विशेषत: ग्रामीण भागाबाबत ही बाब अतिशय ठळकपणे महत्त्वाची असते. ग्रामीण भागात जेंव्हा पाणीपुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध होतात तेंव्हा एकंदरीतच पिकरचनेत व उत्पादनक्षमतेत बदल होवून कास्तकारी किफायतशीर होण्यास मदत होते. तसेच कृषी विकासामुळे अशा ग्रामीण भागात बिगर कृषी रोजगार व व्यवसाय सुरू होवून त्यांचीही लोकांच्या उत्पन्नवृद्धीत महत्त्वाची भूमिका बनते.

**तक्ता ४.१५: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे बँक, बचतगट, पोस्ट ऑफीस व पतसंस्था सुविधा विषयक विवेचन**

| | प्रकल्पबाधीत विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | प्रमाण (%) | एकूण | प्रमाण (%) |
| **बँक खाते** | | | | |
| **होय** | १७५ | ९७.२२ | २१ | १०० |
| **नाही** | ५ | २.७८ | ० | ०० |
| **एकूण** | १८० | १०० | २१ | १०० |
| | | **बचतगट** | | |
| **होय** | १०३ | ५७.२२ | १० | ४७.६२ |
| **नाही** | ७७ | ४२.७८ | ११ | ५२.३८ |
| **एकूण** | १८० | १०० | २१ | १०० |


| | | | | |
|---|---|---|---|---|
| पोस्ट ऑफीस खाते | | | | |
| होय | २८ | १५.५६ | १० | ४७.६२ |
| नाही | १५२ | ८४.४४ | ११ | ५२.३८ |
| एकूण | १८० | १०० | २१ | १०० |
| पतसंस्था खाते | | | | |
| होय | ७४ | ४१.११ | १८ | ९०.०० |
| नाही | १०६ | ५८.८९ | २ | १०.०० |
| एकूण | १८० | १०० | २१ | १०० |


संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

तक्ता क्रमांक ४.१४ मध्ये सर्फनाला प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूहाच्या चित्री पाटबंधारे प्रकल्प लाभधारक शेतकरी कुटुंबाच्या बँक खाते, बचतगट सदस्यत्व, पोस्टातील बचत खाते तसेच स्थानिक सहकारी पतसंस्थेतील बचत खात्याविषयीचे विवरण सादर केले आहे. तक्त्यातील पृथक्करीत माहितीवरून असे नमूद होवू शकते की बचतगट सदस्यत्वाचा अपवाद वगळता इतर सर्व निर्देशाकांच्या बाबतीत नियंत्रण समूह कुटुंबे प्रकल्पबाधीत कुटुंबापेक्षा आघाडीवर आहेत. यामधून असाच अर्थ ध्वनीमुद्रित होतो की बिगर जलसिंचन लाभधारक ग्रामीण कुटुंबापेक्षा सिंचन लाभधारक कुटुंबांची आर्थिक स्थिती निश्चितपणे सुधारलेली असते.

शेतकऱ्यांना उत्पादक व अनुत्पादक अशा दोन्ही प्रकारच्या कर्जाची गरज भासते. काही कारणामुळे पिके खराब झाली तर शेतकऱ्यांना अनुत्पादक म्हणजे उपभोगाकरिता कर्जाची आवश्यकता भासते. इतरवेळी शेतीच्या कामाकरिता उत्पादक कर्ज काढावे लागते. कृषी कर्जाचे दोन प्रकार पडतात. एक; अल्पकालीन पिक कर्ज आणि दोन;दीर्घकालीन गुंतवणूक व शेती विकास कर्ज.हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्बाधीत सर्वेक्षीत १८० पैकी एकूण ११२ शेतकऱ्यांनी (कुटुंबानी) विविध प्रकारची अल्प व दीर्घकालीन अशी १.९५ कोटी रकमेची कर्जे घेतली आहेत.

## आलेख ४.१०: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे बँक, बचतगट, पोस्ट ऑफीस व पतसंस्था सुविधा विषयक विवेचन




तर प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह २१ पैकी १६ कुटुंबांनी एकूण १९.९९ लक्ष रूपयांची कर्जे घेतली असल्याचे दिसून आले. या सर्व कर्जांची आम्ही प्रती कुटुंब व प्रती एकर अशी सरासरी काढून या दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांची तुलना केली असता असे दिसून आले की ट्रॅक्टरसारखे भांडवली कर्ज नियंत्रण समूह शेतकरी प्रकल्पबाधीतांपेक्षा प्रती एकर व प्रती कुटुंब जास्त रक्कमेची घेतात असे दिसून आले.

तक्ता ४.१६:प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक उद्दिष्टनिहाय एकूण, सरासरी कौटुंबिक व सरासरी प्रती एकर कर्जाचे विवेचन

| कर्ज प्रकार | प्रकल्पबाधीत विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | कर्ज (रूपये) | प्रमाण (%) | कर्ज (रूपये) | प्रमाण (%) |
| पीक कर्ज | ११११५९००० | ५७.३२ | ७९४००० | ३९.७१ |
| खावटी | ३५००१ | १.८ | १००००० | ५ |
| विहीर | ५०००० | ०.२६ | ० | ०० |
| पाईपलाईन | ४७४४९९ | २४.३७ | ० | ०० |
| ट्रॅक्टर | ६५०००० | ३.३४ | १०२५००० | ५१.२७ |
| बोअरवेल | ६५०००० | ३.३४ | ० | ०० |
| इतर | १८६५००० | ९.५८ | ८०००० | ४ |
| एकूण | १९४६९००० | १०० | १९९९००० | १०० |
| आधार | ११२ कर्जदार | | १६ कर्जदार | |
| | प्रती कुटुंब सरासरी | | | |
| पीक कर्ज | ९९६३३.३९ | ५७.३२ | ४९६२५ | ३९.७१ |
| खावटी | ३१२५.०१ | १.८ | ६२५० | ५ |
| विहीर | ४४६.४३ | ०.२६ | ० | ०० |
| पाईपलाईन | ४२३६६.०६ | २४.३७ | ० | ०० |
| ट्रॅक्टर | ५८०३.५७ | ३.३४ | ६४०६२.५ | ५१.२७ |
| बोअरवेल | ५८०३.५७ | ३.३४ | ० | ०० |
| इतर | १६६५१.७९ | ९.५८ | ५००० | ४ |
| एकूण | १७३८३०.३६ | १०० | १२४९३७.५ | १०० |

| आधार | ११२ कर्जदार | | १६ कर्जदार | |
|---|---|---|---|---|
| | प्रती एकर सरासरी | | | |
| पीक कर्ज | २४६७८.७७ | ५७.३२ | २६६५.३ | ३९.७२ |
| खावटी | ७७४.०५ | १.८ | ३३०७.९७ | ५ |
| विहीर | ११०.५८ | ०.२६ | ० | ०० |
| पाईपलाईन | १०४९३.८४ | २४.३७ | ० | ०० |
| ट्रॅक्टर | १४३७.५१ | ३.३४ | ० | ०० |
| बोअरवेल | १४३७.५१ | ३.३४ | ३३९०६.७२ | ५१.२८ |
| इतर | ४१२४.५५ | ९.५८ | २६४६.३८ | ४ |
| एकूण | ४३०५६.८१ | १०० | ६६१२६.३६ | १०० |
| आधार | ४५२.१७ (एकर) | | ३०.२३ (एकर) | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

अशाच प्रकारचे निरीक्षण खावटी कर्जाच्या संदर्भातही दिसून येते. याचाच अर्थ असा की जलसिंचन प्रकल्पांमुळे जो शाश्वत पाणीपुरवठा निर्माण होतो त्यामुळे उत्पादन व उत्पन्न वृद्धीहोवून शेतकऱ्यांची कर्ज (Credit Ability) क्षमता वाढते. परिणामे वेळेवर परतफेड करण्याची क्षमताही वाढल्याने बँकांचा त्यांच्या प्रती विश्वास वाढून अशा शेतकऱ्यांना अधिकचा कर्जपुरवठा होवून तो प्रवाह अविरत सुरू राहू शकतो. तक्ता क्रमांक १५ मधील प्राथमिक माहितीवरून दुसरे महत्वाचे निरीक्षण असे मिळते की ज्या कारणांसाठी प्रकल्पबाधीत निसर्गावलंबी शेतकऱ्यांना कर्जावर निर्भर राहावे लागते;उदा. विहीर, पाईपलाइन व बोअरवेल अशा भांडवली साधनांची खरेदी अथवा निर्मिती करताना प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहातील शेतकरी स्वयंनिर्भर असल्याचे दिसून येते. यावरून असेचसिद्ध होते की प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती निश्चितच प्रकल्पबाधीतांपेक्षा सक्षम आहे. म्हणजेच शाश्वत कृषीकरिता वर्षभर शाश्वत पाणीपुरवठा असणे अत्यंत आवश्यक आदान मानले जावे. नव्हे तसे ते आहे सुद्धा.

## तक्ता ४.१७: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूह सिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे कर्ज, परतफेड, व्याज, थकबाकी विषयक विवेचन

| अ. क्र. | कर्ज, परतफेड निर्देशांक | प्रकल्प प्रभावित | नियंत्रण गट | फरक (कलम ३-४) |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण कर्ज (रूपये) | १९४६९००० | १९९९००० | १७४७००००.०० |
| २ | कर्जदार कुटुंबाचे एकूण धारणक्षेत्र (एकर) | ४५२.१७ | ३०.२३ | |
| ३ | सर्वेक्षित कुटुंबाचे एकूण धारणक्षेत्र (एकर) | १००५ | ६९.७२ | |
| ४ | सर्वेक्षित कुटुंबाचे सरासरी धारणक्षेत्र (एकर) | ५.४९ | ३.३२ | |
| ५ | कर्जदार कुटुंबाचे सरासरी धारणक्षेत्र (एकर) | ४.०३ | १.८८ | |
| ६ | कर्ज परतफेड(रूपये) | ५९७८९३० | ७९६६०१.५ | |
| ७ | शिल्लक/थकबाकी कर्ज (रूपये) | २१६४१७४० | १२९५१२५ | |
| ८ | एकूण कर्जदार कुटुंबे | ११२ | १६ | |
| ९ | कर्जदार कुटुंबाचे प्रमाण % | ६१.२ | ७६.१९ | |
| १० | कर्जावरील एकूण व्याज (रूपये) | १३४९००७०.०० | १२०२३९८.५० | |
| | महत्त्वाचे निर्देशांक | | | |
| ११ | कुटुंबाचे सरासरी कर्ज (रूपये) | १७३८३०.३६ | १२४९३७.५० | ४८८९२.८६ |
| १२ | कर्ज : जमीन प्रमाण (रूपये@एकर) | ४३०५६.८१ | ६६१२६.३६ | -२३०६९.५५ |
| १३ | कर्ज परतफेड : जमीन प्रमाण (रूपये@एकर) | १३२२२.७५ | २६३५१.३६ | -१३१२८.६१ |
| १४ | थकबाकी : जमीन प्रमाण (रूपये@एकर) | ४७८६१.९५ | ४२८४२.३८ | ५०१९.५८ |
| १५ | कुटुंब सरासरी थकबाकी (रूपये) | १९३२२९.८२ | ८०९४५.३१ | ११२२८४.५१ |
| १६ | कुटुंब सरासरी परतफेड(रूपये) | ५३३८३.३० | ४९७८७.५९ | ३५९५.७१ |
| १७ | कर्ज : परतफेड प्रमाण (%) | ३.२६ | २.५१ | ०.७५ |
| १८ | कर्ज : थकबाकी प्रमाण (%) | ०.९० | १.५४ | -०.६४ |
| १९ | कर्ज : थकबाकी : परतफेड प्रमाण (%) | ३.६२ | १.६३ | १.९९ |
| २० | कौटुंबिक सरासरी व्याज (रूपये) | १२०४४७.०५ | ७५१४९.९१ | ४५२९७.१५ |
| २१ | कर्ज : व्याज प्रमाण (%) | १.४४ | १.६६ | -०.२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | व्याज : परतफेड प्रमाण (%) | ०.४४ | ०.६६ | -०.२२ |
| २३ | व्याज : धारणक्षेत्र प्रमाण (%) (रूपये@एकर) | २९८३४.०७ | ३९७७५.०१ | -९९४०.९४ |
| २४ | थकबाकी : व्याज प्रमाण (%) | १.६० | १.०८ | ०.५३ |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

संस्थात्मक अथवा बिगर संस्थात्मक खाजगी मार्गांनी कर्ज काढले व त्या कर्जाची वेळेवर परतफेड केली तर नवीन कर्ज मिळण्याची क्षमता अबाधित राहते. प्रामुख्याने अशी क्षमता कृषी उत्पादकता, उत्पादन व उत्पन्नाच्या शाश्वततेवर निर्भर असते. अशा प्रकारच्या निर्धारणात वार्षिक व अखंडित पाणीपुरवठा महत्त्वाची भूमिका बजावतो. कारण त्यामुळे शेतकऱ्यांना व्यापारी पिके घेणे तर शक्य होतेच. परंतु वर्षाकाठी तीन पिके अथवा वार्षिक पिकाखाली जास्तीत जास्त जमीन आणून त्यांचे उत्पादनही वाढते. अशा प्रकारच्या सुधारणा जलसिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात शक्य असल्यामुळे अशा शेतकऱ्याची कर्जक्षमता वाढते व बँकाकडील कर्ज सुरळीतपणे मिळण्याचा मार्ग सुकर बनतो. वर दिलेल्या तक्ता क्रमांक १६ मधील पृथक्करीत आकडेवारीवरून असे दिसून येते की एकूण २१ प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह कुटुंबापैकी १६ कुटुंबांनी कर्ज काढले व परत करण्याचा मार्ग अवलंबला आहे. तर प्रकल्पबाधीत १८० सर्वेक्षित कुटुंबापैकी ११२ कर्जदार शेतकरी आहेत. या सर्वांच्या एकूण कर्ज, कौटुंबिक सरासरी कर्ज, सरासरी प्रती एकर कर्ज व कर्ज परतफेडइत्यादी निर्देशकांचा विचार करता असे निदर्शनास येते की बहुतांश निर्देशकांबाबत प्रकल्प लाभधारक कुटुंबे प्रकल्पबाधीतांपेक्षा आघाडीवर आहेत. तसेच कर्ज परतावा आणि कर्ज थकबाकीबाबतही अशीच काहीशी परिस्थिती जाणवते. प्रती एकर कर्जाच्या बाबतीत असे दिसून येते की प्रकल्पबाधीतांचे प्रमाण एकरी ४३.०३ तर प्रकल्प लाभधारकांचे प्रमाण ६६.१२ हजार रूपये तर एकरी परतफेडीचे प्रमाण अनुक्रमे १३.२२ व २६.३५ हजार रूपये असून या दोन्ही निर्देशांकांबाबत प्रकल्प लाभधारक कुटुंबे प्रकल्पबाधीत कुटुंबापेक्षा अग्रेसर आहेत. कुटुंबाची सरासरी कर्ज थकबाकीची आकडेवारी असे दर्शविते की प्रकल्पबाधीत कुटुंबाची थकबाकीची सरासरी (१.९३ लक्ष रूपये) प्रकल्प लाभधारकांच्या सरासरीपेक्षा (८०.९४ हजाररूपये) अधिक आहे. असेच प्रमाण प्रती एकर सरासरी कर्ज थकबाकीबाबतही (अनुक्रमे ४७.८६ व ४२.८४ हजाररूपये)दिसून येते. अशा प्रकारच्या वित्तीय निर्देशांकांवरून असे स्पष्ट होते की प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहांची वित्तीय क्षमता प्रकल्पबाधीत कुटुंबापेक्षा जास्त असल्यामुळे त्यांची भविष्यातील कर्जक्षमताही आपोआपच जास्त राहते. परिणामी अशा शेतकरी कुटुंबांना भविष्यात कर्जमाफीसारख्या योजनांची आवश्यकता कमीत कमी भासते. परंतु वित्तीय निर्देशकांबाबत विचार केला तर असे निष्पन्न होते की बिगर जलसिंचन

लाभधारकांची कर्जक्षमता असमाधानकारक राहिल्याने त्यांना मात्र व्यक्तिगत कर्जाची परतफेड करण्यासाठी कर्जमाफीसारख्या योजनांची आवश्यकता भासते.

### ४.६: प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनाविषयी:

डिसेंबर २०१३ च्या ''भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास'' कायद्याप्रमाणे प्रकल्पबाधीतांचे उत्पादन व उत्पन्न आणि निवासविषयक म्हणजेच आर्थिक व सामाजिक पुनर्वसन बंधनकारक बनले आहे. म्हणजेच सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्ट्या पुनर्वसनाचा विचार या कायद्यात केला गेला आहे. या कायद्यातंर्गत प्रकल्पबाधीत जमीनींच्या मोबदल्यात जमीन अथवा बाजार किंमतीच्या चारपट मोबदला आणि घरांची किंमत तसेच नवीन घरबांधणीसाठी पर्यायी जागा अशा प्रकारचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक पुनर्वसन अपेक्षित असल्याने पर्यायी उत्पादक जमीन व घरांसाठी जमिनीच्या तुकड्यांची तयारी सरकारला करणे आवश्यक बनले आहे. हिरण्यकेशी सर्फनाला लघु पाटबंधारे प्रकल्पबाधीत मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे येथील विस्थापितांना पुनरवाटपाकरिता प्रकल्प लाभक्षेत्रात कमाल जमीन धारणा कायद्याच्या तत्वानुसार भूमिअधिग्रहण करण्यात आलेले आहे. तसेच गाव पुनर्वसनासाठी (पारपोली व पारपोली गावठाण) मौजे शेळप व मौजे देवर्डे येथे (अनुक्रमे १२८ व १०५) एकूण २३३भूखंडांची तयारी करण्यात आली आहे.

**तक्ता ४.१८:सर्फनाला सिंचन प्रकल्पबाधीत कुटुंबांचे बुडीत क्षेत्र आणि जमिन पुनर्वसन अनुशेष विषयक विवेचन**

| | बुडीत जमिन (एकर) | | | शिल्लक जमिन (एकर) | | | मिळालेली जमिन (एकर) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बागायत | जिरायत | पडीक | बागायत | जिरायत | पडीक | बागायत | जिरायत | पडीक |
| | १७१.४४ | ३६२.२७ | ११८.८२ | १२१.२८ | १२२.८३ | १०८.३७ | ७.९८ | ६०.०३ | ११०.०९ |
| एकूण जमिन | ६५२.५३ | | | ३५२.४८ | | | | १७८.१ | |
| कौटुंबिक सरासरी | ०.९५ | २.०१ | ०.६६ | ०.६७ | ०.६८ | ०.६ | ०.०४ | ०.३३ | ०.६१ |
| कौटुंबिक सरासरी फरक | ०.९१ | १.६८ | ०.०५ | | | | | | |
| जमिन पुनर्वसन अनुशेष = ४७४.४३ एकर | | | | | | | | | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

### तक्ता ४.१९: प्रकल्पबाधीत पारपोली व पारपोली गावठाण येथील कुटुंबांच्या राहत्या घरांचे पुनर्वसन विषयक विवेचन

| | प्रकल्पबाधीत विस्थापित कुटुंबे | |
|---|---|---|
| | एकूण | प्रमाण (%) |
| होय | ९४ | ५२.२२ |
| नाही | ८६ | ४७.७८ |
| एकूण सर्वेक्षित कुटुंबे | १८० | १०० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

### तक्ता ४.२०:सर्फनाला सिंचन प्रकल्प विस्थापित पारपोली व पारपोली गावठाण आणि खेडगे येथील कुटुंबांना जमिन पुनर्वसनाअंतर्गत मिळालेल्या पर्यायी जमिनींचे विवेचन

| | प्लॉट मिळाला आहे काय? | |
|---|---|---|
| | एकूण | प्रमाण (%) |
| होय | ९३ | ५१.६७ |
| नाही | ८७ | ४८.३३ |
| एकूण | १८० | १०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

वर नमूद केलेल्या दोन तक्त्यातील अनुक्रमे तक्ता क्रमांक ४.१८ व ४.१९ मधील माहितीचा विचार केला तर एकूण सर्वेक्षित १८० कुटुंबापैकी ५२.२२ टक्के प्रकल्पबाधीतांना घरासाठी पर्यायी जागा मिळाली असून उर्वरित ४७.७८ टक्के प्रकल्पबाधीतांना अशी जागा मिळणे अद्याप बाकी आहे. पर्यायी शेतजमिनीबाबतही अशाच प्रकारची माहिती समोर येते (तक्ता क्रमांक १९). यावरून उत्पादक पुनर्वसचनाचे काम अद्याप अपूर्ण आहे असे निष्पन्न होते. ज्या प्रकल्पबाधीतांनी पर्यायी जमीन मिळाली नाही असे नमूद केले त्यांच्याशी चर्चा केली असता असे निदर्शनास आले की उपलब्ध पर्यायी जमिनी खडकाळ व तीव्र उताराच्या असल्याने त्या अनुत्पादक व लागवडयोग्य नाहीत. तर काही देवू केलेल्या जमिनी अशा आहेत की त्या ठिकाणी खाणकाम म्हणजे दगडी खाणी पूर्णपणे संपल्याने खड्डयाच्या व दगड तळाशी गेलेल्या जमिनी असल्याने अशा जमिनी

प्रकल्पबाधीतांनी स्विकारणे नाकारले आहे. यातील अनेक ठिकाणच्या जमिनी टेकडीवजा उंच ठिकाणी आहेत. अशा जमिनींवर समांतर पाटचारीद्वारे पाणी पोहोचणे शक्य नाही. किंबहुना अशा जमिनींपर्यंत पाईपलाइनने पाणी पोहोचविणे खर्चिक व प्रकल्पबाधीतांच्या आवाक्याबाहेरचे आहे. असे सर्व प्रश्न गंभीर स्वरूपाचे असून त्या जमिनींची उत्पादन व लागवड क्षमता संबंधित तज्ज्ञांकडून (कदाचित कृषी विभाग)तपासून घेणे आवश्यक आहे. तसेच उत्पादन व लागवड क्षमता तपासताना या भागातील ‘‘कृषी वातावरणानुरूप’’ (Agro Climatic)मान्य पिकरचनेत समाविष्ट होणाऱ्या पिकांकरीता या जमिनी योग्य आहेत अथवा नाहीत याचे अधिकृत प्रामाणिकीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. आणि जर या जमिनी लागवड व उत्पादन योग्य नसतील तर प्रशासनाने एकतर पर्यायी जमिनींची व्यवस्था करणे अथवा याच जमिनी लागवड सुयोग्य बनविणे (सरकारी खर्चाने) अत्यावश्यक आहे. तसेच उंचीवरील जमिनींपर्यंत प्रकल्पचारीचे पाणी किंवा पाईपलाइनचा खर्च हा सरकारी पुनर्वसन खर्चाचा भाग असणे आवश्यक आहे.

वर दिलेल्या तक्त्यात (क्रमांक १७) पाहणी केलेल्या प्रकल्पबाधीत १८० कुटुंबांपैकी एकूण बुडीत जमीन, बुडीत न झालेली एकूण शिल्लक जमीन व मिळालेल्या पर्यायी जमिनीची तुलना केली आहे. ही तुलना करताना बागायत, जिरायत व पडीक अशा तीनही प्रकारच्या जमिनींचा स्वतंत्रपणे विचार केला गेला आहे. प्राथमिक माहितीवरून असे निष्पन्न होते की प्रकल्पग्रस्तांचे अद्यापपर्यंत पूर्णपणे पुनर्वसन झाले नसल्याने आणि ज्याची जमीन प्रकल्पात अधिक बुडत असल्याने स्वेच्छा पुनर्वसन म्हणजेच जमिनीच्या बदल्यात रोख रकमेचा पर्याय स्विकारल्यामुळे पुनर्वसनाचीजमिन तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. स्वेच्छा पुनर्वसन स्विकारल्याचे कारण असे आहे की पुनर्वसनाचीप्रती खातेदार स्विकृत कमाल मर्यादा चार (४) एकर आहे. परंतु काही शेतकऱ्यांची चार (४) एकरपेक्षा अधिक जमिन बुडिताखाली जात असल्याने त्यांना कमाल पुनर्वसनाप्रमाणे फक्त चार (४) एकर जमिन स्विकारणे परवडणारे नसल्यामुळे त्यांनी बुडित जमिनीच्या मोबदल्यात बाजारकिंमतीच्या चारपट(४) रक्कम स्विकारण्याचा पर्याय स्विकारला आहे. प्रकल्प पुनर्वसनात मिळालेली जमीन कमी असण्याचे दुसरे महत्वाचे कारण म्हणजे प्रकल्पबाधीतांपैकी बऱ्याच शेतकऱ्यांनी अद्याप पर्यायी जमिनीचा स्विकार केलेला नाही. अर्थात याची कारणे वर नोंदविली आहेतच. याचे महत्वाचे कारण म्हणजे पुनर्वसनाकरिता उपलब्ध असलेल्या जमिनी एकतर लागवड योग्यच नाहीत तसेच अनेक जमिनी अशा आहेत की त्या जमिनी तांत्रिकदृष्टया (७/१२ उतारा) लाभक्षेत्रात येणाऱ्या गावांच्या हद्दीत आहेत परंतु संबंधित जमिनी उंच टेकड्यांवर असल्यामुळे तेथपर्यंत धरणाचे पाटपाणी पोहचू शकत नाही. किंवा जर प्रकल्पबाधीत पुनर्वसन झालेल्या शेतकऱ्यांना या जमिनींवर पाणी न्यायचे असेल तर प्रत्येकाला दूरवरच्या अंतरावरून पाईपलाइन टाकावी लागणार आहे. अशा पाईपलाइनचा खर्च प्रकल्पग्रस्तांना करावा लागणार असल्याने त्यांना ते शक्य नाही. किंबहुना असा खर्च

आर्थिकदृष्ट्या परवडणाराही नाही. कारण प्रत्येकी फक्त चार एकर एवढीच पर्यायी जमीन देण्याचे धोरण सर्फनाला प्रकल्पबाधीतांसाठी सरकारने स्विकारले आहे. तर कित्येक ठिकाणी पुनर्वसनाची चार (४) एकर जमिन सलग नसून वेगवेगळ्या ठिकाणी लहान तुकड्यांत विभागली असल्याने अशा लहान शेत तुकड्यांकरिता पाईपलाईनचा खर्च आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरणार नाही. कारण तशी पुनर्वसन कामाला मर्यादा आहे. यावरून असा निष्कर्ष मिळतो की जर पुनरवसीत प्रकल्पबाधीतांना देवू केलेल्या पर्यायी जमिनीवर सर्फनाला पाटपाणी प्रकल्पबाधीतांच्या स्वयंप्रयत्नाशिवाय व स्वयंगुंतवणुकीशिवाय पोहोचणार नसेल तर अशा पर्यायी जमिनींना प्रकल्प लाभक्षेत्र संबोधणे अप्रस्तुत आहे. आणि जर सरकारचा तसा युक्तिवाद असेल तर मग या जमिनींवर पाणी पोहोचविण्याचा सर्व खर्च पाटबंधारे खात्यामार्फत करणे आवश्यक आहे. किंवा पर्यायी जमिनींची कमाल मर्यादा वाढविणे तरी आवश्यक ठरते. अन्यथा प्रस्तुत पुनर्वसन हे न्याय्य पुनर्वसन दिसून येत नाही. असाच काहीसा आक्षेप प्रकल्पबांधीतांचाही असल्यामुळे त्यापैकी बहुतेक प्रकल्पबाधीतांनी अद्याप सरकारने देवू केलेल्या जमिनी स्विकारल्या नाहीत. प्रत्यक्ष स्थळभेटीच्यावेळी आणखी एक गंभीर बाब समजली व ती म्हणजे आजरा तालुक्यात चित्री मध्यम प्रकल्प या नावाने आणखी एक मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे पुनर्वसन काम पूर्ण झाले आहे. सर्फनाला प्रकल्प बुडीत क्षेत्रापेक्षा चित्री बुडीत क्षेत्रातील जमिनींची प्रतवारी कमी होती असे सर्फनाला प्रकल्पबाधीतांचे म्हणणे आहे. परंतु चित्री प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण करून पर्यायी जमिनी देवू करताना प्रत्येकी (प्रती खातेदार) आठ(०८) एकराची कमाल मर्यादा स्विकारली होती.

मग हिरण्यकेशी सर्फनाला पुनर्वसनात प्रकल्पबाधीतांना पर्यायी जमिनी वाटप करताना चार (०४) एकराची कमाल मर्यादा कशाकरीता आहे. असे सर्फनाला प्रकल्प विस्थापितांचे म्हणणे आहे. प्रस्तुत दोन्हीही प्रकल्प कोल्हापूर जिल्ह्याच्या आजरा तालुक्यातच येतात. त्यामुळे सर्फनाला प्रकल्पबाधीतांना पुनर्वसनात त्यांच्यावर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळेही अनेक सर्फनाला प्रकल्पग्रस्तांनी अद्याप जमिनींचा स्विकार केलेला नाही असे समजते. एकाच तालुक्यात दोन प्रकल्पांच्या प्रकल्पबाधीतांसाठी भिन्न पुनर्वसन निती वापरली असल्यामुळे सर्फनाला प्रकल्पबाधीत शेतकरी प्रकल्प पुनर्वसन व एकूणच प्रकल्पाच्या विरोधात आहेत असे दिसून येते.

## प्रकरण: ५

# आर्थिक व निवास विषयक पुनर्वसन संदर्भात शासनाची पूर्वतयारी

लोकशाही व कल्याणकारी राज्य अशी अर्थीक व सामाजिक रचना भारताने स्वीकारलेली असलेने कोणत्याही योजनेच्या अमंलबजावणीतून निर्माण होणाऱ्या नकारात्मक, नुकसानकारक परिणामाबाबत शासन स्वत:हून काही प्रतिबंधात्मक व निवारणात्मक उपायोजना करीत असते. कालखंडानुसार व लोकदबावातून यामध्ये बदलही होत असतात. याबाबत असणारी कायदेशीर तरतूद गेल्या दशकात आमूलाग्र बदलली असून यापूर्वी झालेल्या सिंचन प्रकल्पाबाबतचा सामायिक रोष यातून कमी करणेचा प्रयत्न २०१३ च्या अधिनियमातून व २०१४ च्या भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करता भरपाई मिळण्याचा कायदा यातून झालेला आहे. शासनाची प्रकल्पग्रस्त समुदायाबाबत असणारी भूमिका तसेच नुकसानभरपाई निकष यातून स्प्ष्ट होतात. प्रकल्पग्रस्तांचे होणारे नुकसान सामाजिक, आर्थिक आणि मानसिक अशा बहुस्तरावर होत असते. धरणग्रस्त किंवा प्रकल्पग्रस्तांच्या भूमिअधिग्रहणातून त्याची जमिन गेल्याने त्याचे अर्थिक नुकसान तर होतेच पण त्याचबरोबर रोजगारदेखील स्पष्ट होतो. त्या शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतमजूराचा, शेतकऱ्याच्या पशू-पक्षी यांच्या अवलंबनाचाही नुकसान मापन करताना विचार करणे आवश्यक असते. जेंव्हा बुडीत क्षेत्रात एखादे गाव किंवा वस्ती जाते तेंव्हा त्या संबधीत कुटुंबाचे पुनर्वसन व पुनरस्थापन करणे आवश्य्क ठरते. यासाठी ही प्रक्रिया प्रशासन केंद्रीत व आदेशात्मक न राहता लोककेंद्रीत व सामाजिक विचारविनिमयातून होणे आवश्यक ठरते नव्या कायद्यात विशेषकरुन सामाजिक परिणाम निर्धारण तरतूदीने हे बहुतांशी साध्य झाले आहे.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनरस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

महाराष्ट्र शासनाने प्राथमिक प्रारुप धोरण भूमि संपादन, पुनर्वसन व पुनरस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम १०८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून प्रसिद्ध करण्यात आले. त्यामुळे भूमिसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना यामध्ये सदर अधिनियमाखाली परिगणना केल्यापेक्षा जास्त नुकसान भरपाई देता येईल. बाधित व्यक्तींचा नुकसान भरपाईचा हक्क सदर अधिनियमाखाली देण्यात येणारी नुकसान भरपाई पुनर्वसन आणि पुनर्स्थापना यांच्या पॅकेजपेक्षा सर्वसाधारणपणे जास्त आहे. त्यामुळे बाधित व्यक्ती किंवा त्यांचे कुटुंबीय त्यांची ज्या राज्यात तात्पुरत्या लागू असलेल्या इतर

कोणत्याही शासकीय कायद्याखाली संपादित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे अशा अधिनियमाखाली अशा प्रकारे जास्त नुकसान भरपाई, पुनर्वसन आणि पुनर्स्थापनाप्राप्त करू ाकतात.

भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापनाकरताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०८ नुसार खालीलप्रमाणेधोरण प्रसिद्ध केले आहे.

**५.१: जमिनीचे मूल्यांकन:**

संपादित होणाऱ्या जमिनीचे बाजार मूल्य महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ५९) आणि महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे रास्त बाजार मूल्य निश्चित करणे) नियम, १९९५ खाली असलेल्या शिघ्रसिद्ध गणकाप्रमाणे निश्चित करणे आवश्यक राहील.

(२) ग्रामीण भागात जमिनीच्या बाजार मूल्याला १.२० या गुणकाने तर शहरी भागात १.१० या गुणकाने गुणणे आवश्यक आहे (हा गुणक शासनाने मंजूर केलेल्या गुणकापेक्षा किमान १० टक्के जास्त असणे आवयक आहे.)

(३) ग्रामीण भागात संपादित करावयाच्या जमिनीची नुकसानभरपाई (बाजार मूल्य = १.२० अ जमिनीशी जोडलेल्या मत्तेचे किंवा इमारतीचे मूल्य) अ (१०० टक्के दिलासा रक्कम) उ जमिनीच्या नुकसान भरपाई किंमत.

(४) शहरी भागात संपादित करावयाच्या जमिनीची नुकसानभरपाई(बाजार मूल्य = १.१०) अ जमिनीशी जोडलेल्या मत्ते किंवा इमारतीचे मूल्य) अ (१०० टक्के दिलासा रक्कम) उ जमिनीची नुकसान भरपाईची किंमत.

(५) जर शहरीकरणासाठी जमीन संपादित केली असेल तर, २० टक्के विकसित जमीन राखून ठेवण्यात येईल आणि ती जमीन मालकाला संपादनाचा खर्च आणि विकसनाचा खर्च एवढा किंमतीत देऊ करण्यात येईल. संपादनाचा खर्च आणि एकूण जमिनीच्या विकासाचा खर्च वसूल करून पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आवश्यक असलेली जमीन वगळून निव्वळ जमीन म्हणजेच २० टक्के जमीन राखीव ठेवण्यात येईल आणि देऊ करण्यात येईल. पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असलेली जमीन आणि अशा सुविधांचा खर्च सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जलसंपदा विभाग किंवा ग्रामीण विकास विभाग किंवा महानगरपालिका किंवा शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) किंवा मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) किंवा औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) या विभांगानी/संस्थानी विहित केलेल्या प्रमाणकानुसार निश्चित करण्यात येईल. नियत वाटप करावयाच्या जमिनीची परिगणना करताना पायाभूत सुविधांसाठी प्रत्यक्षात आवश्यक असलेले क्षेत्र विचारात घेतले जाईल.

जमीन मालकासाठी राखीव ठेवावयाची किंवा त्याला देऊ करावयाची निव्वळ जमीन पुढीलप्रमाणे असेल;

पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असलेली एकूण जमिनीच्या २० टक्के जमीन सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जलसंपदा विभाग किंवा ग्रामीण विकास विभाग किंवा महानगरपालिका किंवा महाराष्ट्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) किंवा मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) किंवा औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) संस्था/विभाग यांनी विहित केलेल्या प्रमाणकानुसार निचित होईल. एकूण २० टक्के विकसित जमिनीसाठीचा संपादनाचा खर्च-भूमि संपादन, पुनर्वसन आणि पुनरस्थापना यामध्ये योग्य नुकसानभरपाई आणि पारदर्शकता हक्क अधिनियम, २०१३ अन्वये आणि विकासाचा खर्च सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जलसंपदा विभाग किंवा ग्रामीण विकास विभाग किंवा महानगरपालिका किंवा शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) किंवा मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) या विभागानी/संस्थानी विहीत केलेल्या प्रमाणकानुसार असेल.

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांच्या प्रमाणकानुसार पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ३० टक्के क्षेत्र आवश्यक असते, त्यामुळे जमीन मालकासाठी राखीव ठेवलेली किंवा त्याला देऊ केलेली निव्वळ जमीन पुढील प्रमाणे असेल;

एकूण जमिनीच्या २० टक्के - पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आवश्यक असलेले ७ टक्के क्षेत्र उ संपादित केलेल्या जमिनीच्या १४ टक्के - (एकूण २०टक्के जमिनीसाठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांच्या प्रमाणकानुसार वसूल केलेला भूसंपादन खर्च आणि विकसन खर्च)

स्थलांतरीत व्यक्तीला किंवा त्याच्या कुटुंबियांना प्रत्यक्ष जमीन देण्याऐवजी संपादन मंडळ निव्वळ विकसन झालेल्या जमिनीएवढे मूल्य पैशाच्या रुपात देखील देऊ शकेल.

### ५.२: पुनर्वसन:

प्रकल्पामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील पारपोली, ता. आजरा व गावठाणवाडी ता. आजरा ह्या दोन वस्ती पूर्णपणे बाधित होत असून यासाठी मौजे देवर्डे व मौजे शेळप अशी दोन पुर्नवसित गावठाणे विकसित करण्यात येत आहेत. यामधील बाधित खातेदार २२९ व ६५टक्के रक्कम भरणा करणारे २१७ खातेदार यासाठी आवश्यक पर्यायी जमीन २४२.८४ हेक्टर असून संपादीत पर्यायी जमीन १५४.७१ हेक्टर इतकी आहे.

## ५.३: नागरी सुविधा कामे:

मौजे देवर्डे व शेळप या दोन ठिकाणी पुनर्वसन गावठाणे निश्चित केली असून त्यातील नागरी सुविधा कामे बहुतांशी पूर्णत्वास आली आहेत.उर्वरित नागरी सुविधा कामांसाठीरू १.६० कोटी निधी आवश्यक आहे.

**तक्ता ५.१: प्रकल्प निवासी पुनर्वसन पूर्वतयारी निर्देशक विवेचन**

| अ. क्र. | पुनर्वसन गावठाण | भूखड संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | वाटप | शिल्लक |
| १ | देवर्डे | १०५ | ५८ | ५७ |
| २ | शेळप | १२८ | ९० | ३८ |
| | एकूण | २३३ | १४८ | ८५ |

स्त्रोत : प्रकल्प टिपणी, कार्यकारी अभियंता, जलसंधारण विभाग, कोल्हापूर

## ५.४: प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप:

प्रकल्पात एकूण २२९ खातेदार प्रकल्पग्रस्त आहेत. त्यापैकी ११ प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसन घेतलेले आहे. एकूण २१८ प्रकल्पग्रस्तांना २०८ हेक्टर पर्यायी क्षेत्र देय आहे. सद्य:स्थितीत एकूण १५४.७०९ हेक्टरक्षेत्र जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (पुनर्वसन) यांचे नावे असून खातेदारांना ९७.८०४हेक्टर क्षेत्र वाटप झाले आहे. शिल्लक क्षेत्राच्या वाटपाची कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीत आहे. उर्वरित खातेदारांना ११६.६६६ हेक्टर जमिनीचे वाटप होणे बाकी आहे.

**तक्ता ५.२: प्रकल्प कृषी पुनर्वसन पूर्वतयारी निर्देशक विवेचन**

| अ. क्र. | गावाचे नाव | संपादित क्षेत्र हेक्टर | वाटप क्षेत्र हेक्टर | शिल्लक क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|
| १ | पारपोली | ८.६८ | ६.२८ | २.४० |
| २ | शेळप | ५६.७५६ | ४६.३९८ | १०.३५८ |
| ३ | दर्डेवाडी | ४.४० | ० | ४.४० |
| ४ | आल्याची वाडी | १४.७१ | ११.५७१ | ३.१३९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | गवसे | ५.१९ | ३.७ | १.४९ |
| ६ | मेढेवाडी | १७.६०३ | ७.२६ | १०.३४३ |
| ७ | देवकांडगांव | ४.४८५ | ० | ४.४८५ |
| ८ | दाभीळ | १८.३९ | ८.७९ | ९.६० |
| ९ | वेळवट्टी | १४.४७५ | १२.५९५ | १.८८ |
| १० | विनायकवाडी | ८.८२ | १.२१ | ७.६१ |
| ११ | हरपवडे | १.२० | ० | १.२० |
| | **एकूण** | **१५४.७०९** | **९७.८०४** | **५६.९०५** |

स्त्रोत : प्रकल्प टिपणी, कार्यकारी अभियंता, जलसंधारण विभाग, कोल्हापूर

उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) कोल्हापूर यांचेकार्यालयाकडूनप्राप्त माहितीनुसार- प्रकल्पग्रस्तांना लाभक्षेत्रातील ११ गावांमधील ९७.८०४ हेक्टर क्षेत्राचे वाटप झाले आहे.पर्यायी जमीन संपादनाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे;

**तक्ता ५.३: प्रकल्प पूर्तीकामी जमिन अधिग्रहण निर्देशक विवेचन**

| अ. क्र. | गावाचे नाव | एस.आर. क्र. | क्षेत्र हेक्टर | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|
| | **अ) संपादन पूर्ण प्रकरणे** | | | |
| १ | पारपोली | ५२१/०९ | ८.६८ | १५४.७०९ हेक्टर क्षेत्र जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन यांचे नावे त्यापैकी ९७.८०४ हेक्टर क्षेत्राच प्रकल्पग्रस्तांना वाटप |
| २ | शेळप | ५२/०९ | ५६.७५६ | |
| ३ | दर्डेवाडी | ५२०/०९ | ४.४० | |
| ४ | आल्याची वाडी | ५२६/०९ | १४.७१ | |
| ५ | गवसे | ५२७/०९ | ५.१९ | |
| ६ | मेढेवाडी | ५२५/०९ | १७.६०३ | |
| ७ | देवकांडगांव | ५२२/०९ | ४.४८५ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | दाभीळ | ५३३/०९ | १८.३९ | |
| ९ | वेळवट्टी | ५१/०९ | १४.४७५ | |
| १० | विनायकवाडी | ५३४/०९ | ८.८२ | |
| ११ | हरपवडे | ५२८/०९ | १.२० | |
| | | **एकूण** | **१५४.७०९** | |
| | **ब) भूसंपादन प्रक्रियेतील प्रकरणे** | | | |
| १२ | कोरीवडे | ५२९/०९ | ७.७० | नवीन भूसंपादन कायद्याच्या अनुषंगाने कलम ११ अधिसूचनेपूर्वी SIA/EIA आवश्यक असलेबाबत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १२ कोल्हापूर यांनी त्यांचे दि. ८/२/२०१६ च्या पत्राने विभागास कळविले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जा. क्र. कार्या/११/भूसं/आरआर/५९२/२०१६ दि. १४/१२/२०१६ नुसार मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना SIAअहवालाबाबत कळविण्यात आलेले आहे. कार्यवाही सुरू आहे. |
| १३ | देवर्डे | ५३०/०९ | ४३.०५ | |
| १४ | पेरणोली | ५३२/०९ | ४.२४ | |
| | | एकूण | ५४.९९ | |
| | अ+ब | एकूण | २०९.६९९ | |

**गायरान जमीन : सुधारित प्रस्ताव**

| **अ. क्र.** | **गावाचे नाव** | **गट नं.** | **प्रकार** | **क्षेत्र हेक्टर** | |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेरणोली | ५९ | गायरान | ७.१८ | गायरान मंजुरीचा प्रस्ताव महसूल व वन विभाग कडून पत्र जा.क्र. जमीन-३८१७/प्रक २०२/ज-५ अ दि. २४/०७/२०१७ अन्वये जिल्हाधिकारी |
| २ | देवर्डे | ३०९ | गायरान | १२.८१ | |
| ३ | पारपोली | १२५ | गायरान | ३३.५५ | |

| | | |
|---|---|---|
| | | कोल्हापूर यांचेकडे अद्ययावत जमीन मागणी प्रस्ताव तात्काळ सादर करणेसाठी पाठविला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर कडून ६४.८७ हेक्टरचा अद्ययावत जमीन मागणी प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयक, पुणे यांच्यामार्फत पत्र क्र. मह/२/जमीन/कोल्हापूर/१३/२०१८ दि.२८/०२/२०१८ नुसार शासनास सादर करण्यात आला आहे. |
| मुलकी पड – पारपोली | १.४१ | मा. जिल्हाधिकारी कार्याय, कोल्हापूर यांचे कडून क्र. कार्यासन-३ इ/जमीन वाटप/एसआर ०७/२०१७ दि. १५/०५/२०१७ अन्वये पारपोली येथील गटनं. ५८ मधील ३.७३ हेक्टर क्षेत्र जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकल्प पुनर्वसन कोल्हापूर यांचे नावे करण्यासाठी आगाऊ ताबा देणेबाबत आदेश काढण्यात आलेला आहे. पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. |
| एकूण | ६६.२८ | |

स्त्रोत : प्रकल्प टिपणी, कार्यकारी अभियंता, जलसंधारण विभाग, कोल्हापूर

### तक्ता ५.४: पर्यायी जमीन वाटप व स्वेच्छा पुनर्वसनाबाबत निर्देशक विवेचन

| अ. क्र. | मुद्दा | एकूण हेक्टर | पैकी वाटप | उर्वरित |
|---|---|---|---|---|
| १ | १. आवश्यक पर्यायी जमीन | २०८ | | |
| | २. संपादित सर्फनाला प्रकल्प | १५४.७०९ | ९१.३३४ | ६३.३७५ |
| | ३. उर्वरित आवश्यक पर्यायी जमीन | ५३.२९१ | – | – |
| २ | अ गायरान मंजूरीचा प्रस्ताव महसूल व वन विभाग कडून पत्र जा. क्र. जमीन-३८१७/प्रक्र २०२/ज-५ अ दि. २४/०७/२०१७ अन्वये जिल्हाधिकारी कोल्हापूर | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | यांचेकडे अद्ययावत जमीन मागणी प्रस्ताव तात्काळ सादर करणेसाठी पाठविला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर कडून ६४.८७ हेक्टर चा अद्ययावत जमीन मागणी प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करण्यात आला आहे. | | |
| | ब मुलकीपड – मा. जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचेकडून क्र. कार्यासन–३ इ/जमीन वाटप/एसआर ०७/२०१७ दि. १५/०५/२०१७ अन्वये पारपोली येथील गट नं. ५८ मधील १.४१ हेक्टर क्षेत्र जिल्हाधिकारी तथा उपसंचालक प्रकलप पुनर्वसन कोल्हापूर यांचे नावे करण्यासाठी आगाऊ ताबा देणेबाबत आदेश काढण्यात आलेला आहे. पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | | |
| ३ | क लाभक्षेत्रातील<br>१. देवर्डे – ४३.०५<br>२. कोरीवडे – ७.७०<br>३. पेरणोली – ४.२४ | जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जा. क्र. कार्या/११/भूसं/आरआर/५९२/२०१६ दि. १४/१२/२०१६ नुसार मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना SIAअहवालाबाबत कळविण्यात आलेले आहे. कार्यवाही प्रलंबित आहे. | |
| | एकूण : ११७ हेक्टर | | १२१.२७ |
| | लाभक्षेत्रातील संपादित पैकी वाटप करावयाचे क्षेत्र (प्रकल्पग्रस्तांनी नापंसत केलेले क्षेत्र) – प्रकल्पग्रस्तांना उर्वरित आवश्यक पर्यायी जमिन ५३.२९१ हे.आवश्यक आहे. संपादनाखालील क्षेत्र १२३.५९ हे. होत असले तरी पूर्वी संपादन झालेल्या १५४.७०९ हे. क्षेत्रापैकी ६३.३७५ हे. क्षेत्र प्रकल्पग्रस्तांनी नापसंत केले आहे. या बाबत उपविभागीय अधिकारी आजरा भुदरगड उपविभाग गारगोटी यांनी त्यांचे पत्र जा. क्र. ५७२ दि. १४/८/२०१७ अन्वये सर्फनाला मध्यम प्रकल्पातील | | ६३.३७५ |

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटपासाठी सदर पूर्वी संपादन झालेल्या जमीनीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. सदर जमीनी बाबत कृषि अधिकाऱ्याकडून पाहाणी करून जमीनीच्या उपयुक्ततेबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना आहेत. सदर जमीनीची पाहाणी झालेनंतर प्रकल्पग्रस्तांना सदर जमीनीचे वाटप आदेश होणार आहेत. | | |
| **स्वेच्छा पुनर्वसन –** | | |
| अ) एकूण प्रकल्पग्रस्त | २२९ | उंचगी प्रकल्पाच्या मंजूर स्वेछा पुनर्वसन निवाड्याप्रमाणे सर्फनाला प्रकल्पाचा स्वेछा पुनर्वसन निवाडा उपविभागीय अधिकारी, आजरा भुदरगड उपविभाग, गारगोटी यांचे कडे प्रगतीपथावर |
| ब) स्वेच्छा पात्र प्रकल्पग्रस्त | १२ | |
| क)स्वेच्छा निवाडा समाविष्ट प्रकल्पग्रस्त | ११ | |
| ख)स्वेच्छा अनुदान वाटप केलेले प्रकल्पग्रस्त | – | |
| ग)निवाड्यानुसार अनुदान वाटप करावयाचे प्रकल्पग्रस्त | – | |
| घ)स्वेच्छा प्रात्र परंतू निवाडा न झालेले प्रकल्पग्रस्त | ११ | |
| ड)स्वेच्छा दिलेले परंतु अपात्र प्रकल्पग्रस्त | १ | |

स्त्रोत : प्रकल्प टिपणी, कार्यकारी अभियंता, जलसंधारण विभाग, कोल्हापूर

## ५.५: पुनर्वसनाची स्थिती काय आहे?

प्रकल्पामुळे कोल्हापूर जिल्हयातील आजरा तालुक्यातील १ गाव व १ वाडी पूर्णपणे बाधित होत असून यासाठी २ पुनर्वसित गावठाणे विकसित करण्यात आली आहेत. पुनर्वसनाबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता ५.५: प्रकल्पबाधन व पुनर्वसनविषयक आवश्यकतांचे समग्र विवेचन**

| अ. क्र. | बाब | सद्य:स्थिती |
|---|---|---|
| १ | बाधीत गावे | पारपोली, ता. आजरा व गावठाणवाडी, ता. आजरा |
| २ | पुर्नवसित गावठाणे | १. देवडे, ता. आजरा<br>२. शेळप, ता. आजरा |
| ३ | बाधीत खातेदार | २२९ |
| ४ | ६५ टक्के रक्कम भरणा करणारे खातेदार | १७४ |
| ५ | स्थलांतरीत खातेदार | निरंक |
| ६ | आवश्यक पर्यायी जमीन (हेक्टर) | २०८ हेक्टर |
| ७ | संपादित पर्यायी जमीन (हेक्टर) | १५४.७१ हेक्टर |
| ८ | त्यापैकी वाटप जमीन (हेक्टर) | ९१.३३ हेक्टर |

स्त्रोत : प्रकल्प टिपणी, कार्यकारी अभियंता, जलसंधारण विभाग, कोल्हापूर

## ५.६: पुनर्वसन नागरी सुविधा कामे:

मौजे देवर्डे व शेळप या दोन ठिकाणी पुनर्वसन गावठाणे निश्चित केली असून त्यातील नागरी सुविधा कामे बहुंतांशी पुर्णत्वास आली आहेत. उर्वरित नागरी सुविधा कामांसाठी अंदाजे रू १.६० कोटी निधी आवश्यक असून त्या पूर्ण करणेची कार्यवाही पर्यायी जमीन वाटपाच्या प्रगतीस अनुसरून सुरू करणेत येणार आहेत.

**तक्ता ५.६: प्रकल्प पुनर्वसनविषयक समग्र विवेचन**

| प्रकल्पग्रस्त (संख्या) | | | पर्यायी जमीन (हेक्टर) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण प्रकल्पग्रस्त | स्वेच्छा प्रकल्पग्रस्त | पर्यायी जमीन देय प्रकल्पग्रस्त | देय | संपादित | उर्वरित | संपादित पैकी वाटपाचा तपशील | | |
| | | | | | | प्रकल्पग्रस्त (संख्या) | वाटप जमीन | उर्वरित |
| २२९ | १२ | २१७ | २०८ | १५४.७१ | ५३.२९ | १३६ | ९१.३३४ | ६३.३७५ |

स्त्रोत : प्रकल्प टिपणी, कार्यकारी अभियंता, जलसंधारण विभाग, कोल्हापूर

## ५.७: पुनर्वसन आणि पुनरस्थापना अंतर्गत घटक:

(१) जर ग्रामीण भागात घर गमावले तर इंदिरा आवास योजनेच्या निकषानुसार बांधलेले घर किंवा त्याऐवजी रु. १,६५,००० देणे आवयक आहे.

इंदिरा आवास योजनेनुसार २५ चौ. मीटर घर दिले जाईल.कमी प्रमाणातील निकष लक्षात घेता, बांधकामाचा किमान खर्च रु. ६००/- प्रति. चौ. फुट असेल त्यामुळे जमीन विकासाचा खर्च वगळून एकूण खर्च रु. १,६१,४००/- असेल.

(२) जर शहरी भागात घर गमावले तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषानुसार ५० चौ. मिटर जोते क्षेत्र असलेले घर किंवा घराऐवजी रु. ५.५ लाख देणे आवयक आहे.

प्रति. चौ. फूट रु. १०००/- बांधकाम खर्च लक्षात घेऊन जमिनीच्या विकसनाचा खर्च वगळून, एकूण खर्च रु. ५,३८,०००/- असेल.

(३) ज्या कुटुंबात रोजगारासाठी पात्र उमेदवार असेल अशा प्रत्येक बाधित कुटुंबांला ५ लाख रुपये एकदाच दिले जातील.

(४) बाधित स्थलांतरीत कुटुंबाला दरमहा रु. ३०००/-निर्वाह भत्ता स्थलांतराच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी दिला जाईल. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या अशा कुटुंबांना अतिरिक्तरु. ५०,०००/- दिले जातील.

(५) प्रत्येक बाधित स्थलांतरीत कुटुंबाला रु. ५०,०००/- वाहतूक खर्च दिला जाईल.

(६) ज्या कुटुंबाकडे जनावरांचा गोठा किंवा छोटे दुकान होते. अशा कुटुंबाला एकदाच रु. २५,०००/- आर्थिक मदत दिली जाईल.

(७) कारागीर, छोटे व्यापारी यांना एकदाच रु. ५०,०००/- अनुदान दिले जाईल.

(८) घर बदलल्यानंतर एकदाच रु. ५०,०००/- पुनर्स्थापना भत्ता दिला जाईल.

(९) पुनर्वसन झालेल्या व्यक्तिच्या केवळ पहिल्या व्यवहारासाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क हे संबंधित संपादन संस्थेकडूनच भरले जाईल.

(१०) संबंधित संपादन संस्था, पुनर्वसन अणि पुनरस्थापना क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरवील त्यामध्ये रस्ते, मल:निस्सारण व्यवस्था, पंचायत घर, टपाल कार्यालय, समाज मंदिर आणि इतर सुविधा ज्यांचा समावेश असेल कीज्याचा भूसंपादन, पुनर्वसन अणि पुनरस्थापना योग्य नुकसान भरपाई आणि पारदर्शकता हक्क अधिनियम, २०१३ च्या अनुसूची ३ मध्ये करण्यात आला आहे.

तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुनर्वसन विभाग, किंवा जलसंपदा विभाग, किंवा ग्रामीण विकास विभाग, नगर विकास मंत्रालय किंवा महानगरपालिका किंवा शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) किंवा मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) विभागांच्या/संस्थाच्या प्रमाणकानुसार प्रत्येक कुटुंबाला अशा प्रकारच्या सुविधा निर्माण करण्यासाठी लागणारा खर्च लक्षात घेऊन संबंधित संपादन संस्था अशा सुविधा ऐवजी त्यांचा मोबदलाआर्थिक स्वरूपात देऊ शकेल अशा प्रकरणांत, संबंधित संपादन संस्थेने सदर अधिनियमाच्या तिसऱ्या अनुसूची खाली देण्यात येणाऱ्या सर्व सुविधांसाठी प्रति कुटुंब १० टक्के एवढी अतिरिक्त रक्कम देणे आवयक आहे.

(११) जर त्यावर्षी महागाईचा निर्देशांक ५ टक्के पेक्षा कमी नसेल तर प्रत्येक वर्षात १ जानेवारी रोजी वर नमूद केल्याप्रमाणे निश्चित केलेल्या आर्थिकमूल्यात ५ टक्के वाढ होणे आवयक राहील.

(१२) बाधीत व्यक्तीने लेखी स्वरूपात संमती दिली तर वर उल्लेख केलेले पॅकेज अनुज्ञेय होईल.

**५.८: अडचणी:**

१) मौजेपारपोली व मौजे देवर्डे येथील एकूण ६४.८७ हेक्टर गायरान क्षेत्र प्रकल्पग्रस्तांना वाटप करणेकरीता अद्ययावत जमीन मागणी प्रस्ताव शासनाकडून मंजूरी घेणेसाठी महसूल विभागाकडून तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आह.

२) लाभक्षेत्रातील मौजे देवर्डे, कोरीवडे व पेरनोली येथील ५४.९९ हेक्टर क्षेत्रासाठी भूसंपादनाची कार्यवाही महसूल खात्याकडून तातडीने पूर्ण होणे आवश्यक आहे.

३) प्रकल्पग्रस्तांना वाटपासाठी आवश्यक असणारे मुलकी पड क्षेत्र १.४१ हेक्टर उपलब्ध झाले असून त्याचे वाटप प्रकल्पग्रस्तांना उपविभागीय अधिकारी आजरा भुदरगड उपविभाग गारगोटी यांचेकडून होणे आवश्यक आहे.

४) बुडित क्षेत्रातील भू.प्र. क्र एस आर ६८/२००० व ६९/२००० मधील एकूण १२ खातेदारांनी स्वेच्छा पुनर्वसन घेतले असून त्याचा निवाडा उचंगी प्रकल्पाच्या निवाड्याप्रमाणे जाहीर होऊन नुकसान भरपाई वाटप उपविभागीय अधिकारी, आजरा भुदरगड उपविभाग, गारगोटी यांचेकडून होणे आवश्यक आहे.

५) बुडित क्षेत्रातील भूसंपादन प्रकरणे एस आर ५/२००९(क्षेत्र ८.९८ हेक्टर)व ६/२००९(क्षेत्र ९.६३ हेक्टर)बाबत भूसंपादन कार्यवाही खाजगी वाटाघाटीने करणेबाबत उपविभागीय

अधिकारी, आजरा- भूदरगड उपविभाग, गारगोटी यांचे पत्र क्र. भूसंपादन/कावि/४९४ दि. १९/१२/२०१६ अन्वये कळविले आहे. तत्पूर्वी दि. २०/१०/२०१६ रोजी एस आर ५/२००९ व ६/२००९ अंतर्गत येणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची बैठक पारपोली येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये कार्यकारी अभियंता श्री. शि. मा. चव्हाण, उपविभागीय अधिकारी, आजरा-भूदरगडउपविभाग, गारगोटी श्रीमती कीर्ती नलवडे व श्री. अे. आर. पाटील, सहाय्यक अभियंता हे उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये खाजगी वाटाघाटीद्वारे प्रकल्पग्रस्तांना देय होणारी रक्कम व भूसंपादन प्रक्रियेच्या कालावधीमध्ये होणारी बचत याबाबत खाजगी वाटाघाटीने भूसंपादनाने होणारे फायदे उपविभागीय अधिकारी, आजरा-भूदरगड उपविभाग, गारगोटी यांनी प्रकल्पग्रस्तांना सांगितले.

एसआर ५/२००९ व ६/२००९ मध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची जमीन यापूर्वीच्या भूसंपादनामध्ये गेली असल्याने तसेच त्यांची ६५टक्के रक्कम भरून पर्यायी जमीन घेतलेली आहे. खाजगी वाटाघाटीद्वारे मिळणाऱ्या मोबदल्यातील भूसंपादन नियमानुसार पर्यायी जमीन प्रकल्पग्रस्तांनी घेतली असल्याने खाजगी वाटाघाटीने मिळणाऱ्या मोबदल्यातून ६५ टक्के रक्कम वजा होणार असल्याने काही प्रकल्पग्रस्तांनी विरोध केला .

तद्नंतर १९/६/२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात मा. आमदार श्री. प्रकाश आबिटकर व अप्पर जिल्हाधिकारी यांच्या समवेत प्रकल्पग्रस्तांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये काही प्रकल्पग्रस्तांनी खाजगी वाटाघाटीद्वारे जमीन देण्यास होकार दिला. परंतु यापूर्वी पर्यायी जमीन घेतली असल्यामुळे ६५ टक्के रक्कम वजा न करता मागील पर्यायी घेतलेली जमीन शासनास आम्ही परत करतो व पर्यायी जमीन घेतांना वजा केलेली ६५ टक्के रक्कम परत मिळाल्यास एकूण किती मोबदला मिळेल याबाबत विचारणा केली. याबाबत अप्पर जिल्हाधिकारी श्री नंदकुमार काटकर यांनी उपविभागीय अधिकारी, आजरा-भुदरगड उपविभाग, गारगोटी श्री.खिलारे यांना एसआर ५/२००९ व ६/२००९ मध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्तांबाबतचा वरील संदर्भानुसार एकूण येणाऱ्या मोबदल्याबाबतचा अहवाल तयार करून सादर करणेविषयी सांगितले आहे.

६) बुडित क्षेत्रातील मौजे पारपोली येथील बुडित गांवठाण (एकूण घरे १६२) बाबतचा भू. प्र. क्र. एसआर १/२०१० चे कलम ११ उपविभागीय अधिकारी, आजरा भुदरगड उपविभाग, गारगोटी यांचेकडून प्रसिद्ध होणे होणे आवश्यक आहे.

## प्रकरण: ६
# निष्कर्ष व शिफारशी

हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम सिंचन प्रकल्प ऑक्टोबर १९९८ पासून प्रलंबित असून प्रलंबनाची प्रमुख कारणे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन , पुनरस्थापन व प्रकल्पबाधीत शेतजमीनी आणि इतर मालमत्तांच्या मोबदल्यांशी निगडीलत आहेत. एकूणच प्रकल्पबाधीतांचे भविष्य व जीवनमान आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न उपस्थित झाल्याने मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे येथील प्रकल्पबाधीतांनी सातत्याने आपला विरोध दर्शविल्यामुळे प्रकल्पाचे काम गेली वीस वर्षे प्रलंबित आहे. या विरोधामुळे प्रकल्पाची इतर कामे जरी पूर्ण झाली असली तरी घळभरणीचे काम पूर्ण करून प्रकल्पात पाणी अडवीने बाकी असल्याने व सततच्या विलंबामुळे प्रकल्पाचा व्ययसुद्धा अनेकपटींनी वाढून २०० कोटी रूपयांपेक्षा जास्त झाला आहे. मौजे पारपोली व पारपोली गावठाण येथील लोकवस्ती व जमिनी आणि मौजे खेडगे येथील शेतजमीनी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात जावून या सर्व बहुतांशी शेतकरी असलेल्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर असल्यामुळे या सर्व कुटुंबांचा प्रकल्पास विरोध असल्याचे कारण म्हणजे त्यांच्या मालमत्तेचा योग्य मोबदला व आदर्श पुनर्वसनाची मागणी असे आहे. या सर्व बाबींचा शास्त्रोक्त अभ्यास होवून उभयपक्षी (सरकार व प्रकल्पबाधीत) मान्य तोडगा निघण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात आम्ही प्रस्तुत अभ्यास करून हा अहवाल सादर करत आहोत. अभ्यास अहवालाच्या या शेवटच्या प्रकरणात आम्ही आमच्या अभ्यासावर आधारित प्रमुख निष्कर्ष व शिफारशी करत आहोत.

सर्फनाला मध्यम प्रकल्प ता. आजरा, जिल्हा कोल्हापूर हाहिरण्यकेशी नदीखोऱ्यातील पारपोली या गावा नजीक बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचे बांधकाम ७५ टक्के पूर्ण झाले असून यामध्ये जलरोधीचराचे सर्व काम पूर्ण झाले आहे तसेच भरावाचे काम पूर्ण झाले असून घळभरणीचे काम प्रस्तावितआहे.

या प्रकल्पासाठी २६१.२३ हेक्टरखाजगीव १६.२२ हेक्टर सरकारी (देवस्थान जमीन) व रस्त्यासाठी खाजगी जमीन १.६१ हेक्टर व६.५० हेक्टर वनजमीनअसे एकूण २८५.५६ हेक्टर क्षेत्र लागणारआहे.सदर प्रकल्पात एकूण २२९ खातेदार प्रकल्पग्रस्तआहेत. त्यापैकी ११ प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसन  घेतलेले आहे. एकूण २१८ प्रकल्पग्रस्तांना २०८ हेक्टर पर्यायी क्षेत्र देय आहे. सद्य:स्थितीत एकूण १५४.७०९ हेक्टर क्षेत्र जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (पुनर्वसन) यांचे नावे असून खातेदारांना ९७.८०४ हेक्टर क्षेत्र वाटप झाले आहे. शिल्लक क्षेत्राच्या वाटपाची कार्यवाही

महसूल विभागामार्फत प्रगतीत आहे. उर्वरित खातेदारांना ११६.६६६ हेक्टर जमिनीचे वाटप होणे बाकी आहे.

प्रकल्पामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील मौजे पारपोली, ता. आजरा व गावठाणवाडी, मौजे पारपोली, ता.आजरा पूर्णपणे बाधित होत असून एकूणप्रकल्पबाधीत खातेदार २२९ आहेत. यासाठी अनुक्रमे १) देवर्डेव २) शेळप ही पुर्नवसित गावठाणे विकसीत करण्यात येत आहेत. यामध्ये देवर्डे येथे १०५, तरशेळप येथे १२८असे एकूण २३३ भूखंड विकसित केले आहेत. यामधील १४८ भूखंडांचे वाटप झाले आहे व उर्वरित ८५ भूखंड शिल्लक आहेत;

१. प्रलंबित प्रकल्प सन १९९७-९८ मध्ये मंजूर झाला होता. २००२ मध्ये धरण पायाचे अवॉर्ड मंजूर झाले. वीस वर्षाहून अधिक काळ हा प्रकल्प शासनाकडून धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहे. यामुळे धरणग्रस्त कुटुंबांना मोठ्या प्रमाणात आर्थिक, सामाजिक व मानसिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. एकंदरीतच धरणग्रस्त त्रासलेल्या मन:स्थितीत असल्याचे आमच्या लक्षात आले.

२. प्रकल्पग्रस्त कुटुंबाची पाहणी तसेच गटचर्चा केल्यानंतर त्यांच्या अडचणी समजून घेणे शक्य झाले. तसेच प्रकल्पग्रस्तांपैकी अनेक प्रतिनिधींनी लेखी स्वरुपात केलेल्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. या सर्व सूचनांमधून पुनर्वसन, पर्यायी जमिनी, वनसंपदेचे मूल्यांकन, निवासी पुनर्वसनाच्या समस्या इत्यादीविषयक अनेक अडचणी अद्यापही असल्याने प्रकल्पग्रस्तांच्या मनात असमाधानाची भावना असल्याचे निष्पन्न झाले.

३. प्रकल्पग्रस्तांना दिला जाणारा मोबदला हा पर्यायी जमीन,घरासाठी भूखंड तसेच त्यांची मालमत्ता उदा. फळझाडे व वनसंपदा इत्यादींचेमूल्यांकन करून त्यांना देय असलेल्या मोबदल्यासंदर्भात पुढील बाबी निदर्शनास आल्या.

    १. प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनार्थ वाटप करण्यासाठी लाभक्षेत्रात संपादित केलेल्या जमिनीपैकी ७० (सत्तर) हेक्टर जमीन अशी आहे की त्या जमिनीवर पीक लागवड करणे दुरापास्त आहे. कारण यापैकी अनेक जमिनी दगड खाणीच्या किंवा डोंगर उताराच्या असल्याने अशा जमिनींना संभाव्य लाभक्षेत्रातील बागायती जमिन म्हणून संबोधणे शक्य नाही. त्यामुळे अशा जमिनींची कृषी तज्ञांमार्फत तपासणी करून पीक लागवडयोग्यता निश्चितीनंतरच जमिनींचे प्रकल्पबाधीत लाभार्थींना वाटप

करण्याची आवश्यकता अधोरेखित करणे आवश्यक वाटते. प्रस्तुत प्रकल्पग्रस्तांच्या खाजगी वनसंपदेची हानी अपरिमित स्वरूपाची आहे. अशा वनसंपदेच्या बुडितामुळे वातावरण व जैविक हानीची मोजदाद जवळजवळ अशक्य आहे. परंतु हा विषय प्रस्तुत अहवालाच्या अभ्यासकक्षेत येत नाही याची आम्हांस कल्पना आहे. प्रकल्पग्रस्तांच्या खाजगी वनसंपदेचे मूल्यांकन करताना गंभीर त्रुटी राहिल्या आहेत हे मात्र ठामपणे नोंदविता येवू शकते. अशा खाजगी वनसंपदेचे मूल्यांकन करताना वर्तमान बाजारमूल्य गृहित धरणे आवश्यक होते. परंतु तसे मात्र करण्यात आलेले नाही. तसेच प्रस्तुत वनसंपदा (उदा. बांबू, मेसकाठी व फळझाडे) या शेतकऱ्यांना दरवर्षी उत्पन्न प्राप्त होण्याचा एक मार्ग होता. तो मात्र कायमस्वरूपी नष्ट होणार आहे. म्हणून या वनसंपदेचे प्रत्येकी (प्रकारानुसार) वर्तमान किंमतीनुसार बाजार मूल्यांकन करून त्याच्या किमान चारपट रक्कम आदा करणे न्याय असेल.

२. जर प्रकल्पग्रस्तांकरीता लागवडीयोग्य लाभ क्षेत्रामध्ये संपादन करण्यास जमीन उपलब्ध नसेल तर भूसंपादन कायदा सन २०१३ च्या तरतुदीनुसार त्यांना मोबदला देण्यात यावा. परंतु सन १९९८ मधील प्रकल्प अधिसूचनेनंतर प्रकल्पबाधीत क्षेत्रातील जमिन खरेदी विक्रीचे व्यवहार ठप्प असल्यामुळे जमिनींचे सद्य बाजारमूल्य मिळणे शक्य नाही. याकरीता प्रकल्प लाभक्षेत्र प्रकल्पबाधीत क्षेत्राच्या पंचक्रोशीत असल्यामुळे प्रकल्प लाभक्षेत्रातील जमिनींचे खरेदी-विक्री व्यवहार दर तपासून त्याआधारे प्रकल्पबाधितांच्या जमिनींचे मूल्य बाजारमूल्याच्या चारपट निश्चित करून त्याप्रमाणे प्रकल्पबाधितांना रोख मोबदला आदा करता येवू शकतो. हेच सूत्र स्वेच्छा पुनर्वसन ास तयार असलेल्या प्रकल्पबाधितांचा जमिन मोबदला ठरविताना लागू करणे आवश्यक आहे.

३. प्रकल्पबाधीत कुटुंबांना सिंचन खात्यामार्फत १) देवर्डे व २) शेळपया ठिकाणी घरांकरिता भूखंड, रस्ते, सांडपाणी व्यवस्था, समाज मंदिर शाळा,स्मशानभूमी, पिण्याच्या पाण्याची टाकी, इत्यादी सुविधा समितीच्या क्षेत्रभेटीत निदर्शनास आल्या आहेत. परंतु गायरानाची तरतूद मात्र केलेली नसल्याने त्याकामी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे.

४. प्रकल्पग्रस्तांना धरणाची सुरुवात करताना जे जमिनीचे संपादन केले त्यासाठी जुन्या कायद्याप्रमाणे एकरी रूपये ३५००० इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून आदा

केली गेली. तथापि प्रकल्पग्रस्तांना देवू केलेली सदर नुकसान भरपाई निश्चितच अत्यल्प स्वरूपाची आहे. यासंदर्भात उपरोल्लेख केल्याप्रमाणे जमिन नुकसानभरपाईची रक्कम ठरविणे आवश्यक आहे.

५. जमिन खरेदी-विक्री दस्त संदर्भ अ ज र/दस्त क्रं. १३२१/२०१७/ २/८७ दि.१०/७/२०१७ अन्वये दृष्टिक्षेप टाकला तर प्रकल्पबाधीत क्षेत्राच्या पंचक्रोशीतच येणाऱ्या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील जमिन विक्रीचे मूल्य प्रती आर रूपये १३,५७०.०० इतके नोंदविले आहे. म्हणजेच जमिनीचे एकरी मूल्य रूपये ५,४२,८००.०० (१३,५७० ×४० = ५,४२,८००) इतके येते. म्हणून या मूल्याच्या चारपट रक्कम निश्चित करून प्रकल्पबाधीतांचे स्वेच्छा पुनर्वसनाच्या समस्या निकाली काढणे न्याय्य वाटते. त्यामुळे प्रकल्पलाभधारक क्षेत्रातील जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहार किंमतीच्या चारपट मोबदला देवून स्वेच्छा पुनर्वसनाची समस्या निकाली काढणे अधिक न्यायाचे असेल.

६. सन १९९८ मध्ये प्रकल्प अधिसूचना निर्गमित`यापासून प्रकल्पबाधीत क्षेत्रातील जमिनींचे खरेदी-विक्री व्यवहार बंद झाले. त्यामुळे प्रकल्पबाधीतांना स्वेच्छा पुनर्वसन देताना उपरोल्लेख केल्याप्रमाणे एकरी मात्र रूपये ३५,००० इतकीच रक्कम देवू केली गेली. याला जमिनीचे बाजारमूल्य संबोधणे चुकीचे आहे. बाजारमूल्याच्या चारपट तर ही रक्कम निश्चितच नाही. याकरिता प्रस्ताविक प्रकल्पाचे लाभक्षेत्र प्रकल्पबाधीत क्षोच्या पंचक्रोशीतच येत असल्याने व तेथील जमिनींची प्रतवारीही प्रकल्पबाधीत जमिनींशी साधर्म्य असल्याने प्रकल्पबाधीत जमिनींचे बाजारमूल्य निश्चित करण्यासाठी प्रकल्पलाभक्षेत्रातील जमिन खरेदी-विक्री व्यवहार किंमती गृहित धरणे न्याय्य होईल.

७. प्रकल्पग्रस्तांचे रोजगार व उत्पन्न याबाबत गेली २० वर्षे मोठे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई करण्यासाठी प्रत्येक कुटुंबास सानुग्रह अनुदान देण्यात यावे. कारण ऑक्टोबर १९९८ मध्ये सर्फनाला प्रकल्पाची अधिसूचना निघाल्यानंतर प्रकल्पग्रस्त जमिनींवरील सुधारणा व शेतकरी खाजगी कृषी गुंतवणूकीची प्रक्रिया कुंठीत झाली. पर्यायाने बिगर कृषी रोजगाराचे मार्ग उपलब्ध होवू शकले नाहीत किंवा प्रकल्पबाधीत क्षेत्रातील शेतीचा विकास मार्गी लागणे अशक्य झाले. पर्यायाने गेली वीस वर्षे या सर्व प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले व

बदलत्या आर्थिक स्थित्यंतरांद्वारे (१९९१ नंतर) निर्मित आर्थिक प्रगतीची संधी चुकली. त्यामुळे या सर्व शेतकऱ्यांचे गेली वीस वर्षे झालेले आर्थिक नुकसान लक्षात घेवून पुनर्वसन नियोजन करताना पर्यायी जमिनी व रहिवासी संकुल जागा देण्याबरोबरच त्यांना अतिरिक्त आर्थिक मोबदला देणे सरकारची जबाबदारी बनते.

८. प्रकल्पबाधीत कुटुंबातील सदस्यांना त्यांच्या शैक्षणिक कुवतीनुसार व्यवसाय प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य पुरवून स्वयंरोजगार निर्भर करणे अत्यावश्यक आहे.

९. पारंपारिक ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेचा विचार केला तर शेतकऱ्यांच्या कृषी संलग्न व बिगरकृषी व्यवसायांकरीता तसेच गोठा, साठवणगृह, चारा साठवण व्यवस्था, कंपोस्ट खताकरीताची जागा इत्यादीकरीता प्रत्येक गावाची स्वत:ची गायरान जमिन असणे आवश्यक मानले जाते. नव्हे तशी परंपरागत व्यवस्था अस्तित्वात असल्याचा प्रत्येक गावाचा इतिहास आहे सुद्धा. त्यामुळे प्रकल्पग्रस्त गावांची गायरान जमिन ही सरकारी मत्ता असल्याचे गृहित धरता कामा नये. तर गायरान जमिनीवरचा शेतकरी-गावकऱ्यांचा हक्क मान्य करणे आवश्यक आहे. त्यामुळे निवासी पुनर्वसनाच्या ठिकाणी (अनुक्रमे मौजे शेळप व देवर्डे) गायरान जमिनीची व्यवस्था करणे हे निवासी पुनर्वसनाचे आद्य उद्दिष्ट असावे.

१०. निवासी पुनर्वसन करताना महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारच्या सन १९१३ च्या भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्यातील तरतुदीप्रमाणे देवू केलेल्या २५ (पंचवीस) सुविधांऐवजी सन १९९८ च्या कायद्याप्रमाणे देय १८ (अठरा) सुविधा मान्य केल्या आहेत. प्रत्यक्ष निवासी पुनर्वसनाचा तपशील पाहता यापैकीही काही सुविधा देवू केलेल्या नाहीत. याचे कारण असे सांगितले गेले की तत्सम सुविधा जवळच्या गावात उपलब्ध आहेत. परंतु निश्चितच सुविधा न देण्याचे असे कारण संयुक्तिक नाही. तसेच धर्मनिरपेक्ष व्यवस्थेचे उदाहरण देवून पुनर्वसित गावात मंदीर किंवा तत्सम व्यवस्था देणे नाकारले जाते. तसा नकार प्रस्तुत प्रकल्पासंदर्भातही दिसून येतो. परंतु प्रकल्पबाधितांच्या जमिनी व घरांसहीत त्यांची धार्मिक स्थळेही प्रकल्पबाधीत झाल्याने प्रकल्पबाधितांना एक प्रकारे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समुळोच्चाटनाचा (Cultural Genoicide) सामना करावा लागतो. म्हणून त्यांच्या सांस्कृतिक व धार्मिक पुनर्वसनाचाही विचार होणे आवश्यक आहेच व यात शंका नसावी. याकरीता सरकारी अधिकाऱ्यांनी कर्नाटकातील

पुनर्वसित रामनगर येथे भेट देवून ''आदर्श पुनर्वसनाचे'' आकलन करून घेणे आवश्यक आहे.

सारांशत: प्रकल्प पूर्ती नंतर मिळणारा लाभ हा प्रकल्प खर्चापेक्षा अधिक असून तो या भागासाठी रोजगार उत्पन्न व राहणीमान वाढवणारा तसेच पीक प्रणालीत सकारात्मक बदल करणारा असेल. त्यामुळे याकरिता प्रकल्पग्रस्तांचे समाधानकारक पुनर्वसन होणे गरजेचे आहे.

# प्रकरण: ७

## ताजा कलम (Post Script)

नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर देशात अनेक खाजगी व सार्वजनिक प्रकल्प हाती घेवून विकास प्रक्रिया गतीशील करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्याचा एकंदरीत परिणाम देशाच्या विकास/वृद्धी दरावर दिसून आला. परिणामे खुल्या व्यापार धोरणाच्या अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात औद्योगिक व एकंदरीतच विकासदर झपाट्याने वाढला. या सर्व प्रक्रियांना गती देताना जे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले. (उदा. विशेष आर्थिक क्षेत्रे, औद्योगिक महामंडळांचा विस्तार, बहुउद्देशीय सिंचन/जलप्रकल्प, बहुपदरी महामार्ग, शहर व निवासी परिसर विस्तार.....इत्यादी) अशा सर्व प्रकल्पांकरीता विविध राज्यांत हजारो हेक्टर शेतजमीनींचे संपादन करण्यात आले. परंतु जमिन संपादन करताना संबंधित शेतकऱ्यांच्या रोजगार पुनर्वसनाकडे दुर्लक्ष झाल्याने देशात आर्थिक दरी निर्माण होवून ती सतत वाढत असल्याचे गेल्या अडीच दशकांच्या (२५ वर्षे) काळात निष्पन्न झाले. परिणामे शेतकरी वर्गाने कधी संघटित तर अनेकदा असंघटित स्वरूपाचे लढे उभारले. प्रामुख्याने हे लढे आर्थिक व निवासी पुनर्वसन आणि भूसंपादन मोबदला इत्यादीसंदर्भात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील तीन लक्ष कोटी रूपये गुंतवणुकीचा तेलशुद्धीकरण प्रकल्पाविरोधात तेथील शेतकऱ्यांनी उभारलेले लढे याची ज्वलंत उदाहरणे आहेत. प्रस्तुत प्रकल्पविरोधामुळे महाराष्ट्र शासनाने भूसंपादन मोबदल्याविषयीचे बाजारमूल्याच्या चारपट मूल्य धोरण बदलून समृद्धी महामार्ग विस्थापित जमिन मालक शेतकऱ्यांना प्रती एकर किमान एक कोटी रूपये (१ कोटी) मोबदला देण्याची तयारी दर्शविली. नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाबाबतही राज्य शासनाने असेच धोरण स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे दिसून आले. नाणार प्रकल्प मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाने सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार करण्याचे काम गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे यांचेकडे सोपविले आहे.

उपरोल्लेखित प्रकल्प अथवा प्रकल्पबाधीत शेतजमिन मूल्यांकनाविषयी राज्य सरकारने घेतलेल्या भूमिकेकडे अंगुलीनिर्देश करता असे निष्पन्न होते की ज्या ठिकाणी प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांचा विरोध तीव्र आहे अशा ठिकाणी राज्य सरकार जमिन मूल्याचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांचा विरोध होणार नाही अशा प्रकारचे मूल्य निर्धारण करते असे दिसून येते. या सर्व बाबींचा व प्रस्तुत अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीतून अवलोकन केलेल्या बाबींवरून प्रकल्पनिहाय मोबदला, जमिन मूल्यांकन, कमाल जमिन धोरण इत्यादी भिन्न असल्याचे स्पष्ट होते.

**परिणामे:**

महाराष्ट्रातील जलसिंचन प्रकल्प भूसंपादन व जमिन मूल्यांकनाविषयीही राज्य सरकारने मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाप्रमाणे धोरण अंगिकारण्यास हरकत नसावी. तसेच जमिन मूल्यांकन धोरण जलसिंचन खाते भूमिअधिग्रहणार्थ लागू करून प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यास (एकरी एक कोटी रूपये) हरकत नसावी. याच्या पुष्ट्यर्थ असा युक्तिवाद असू शकतो की स्वेच्छा पुनर्वसन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे उदरनिर्वाह व रोजगाराचे साधन कायमस्वरूपी संपुष्टात येते. तसेच ज्या प्रकल्पबाधीतांना प्रकल्पलाभक्षेत्रात पर्यायी जमिनी देवू केल्या जातात त्यांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते असे प्रस्तुत अभ्यासगटास कटाक्षाने केलेल्या क्षेत्रभेटींवरून निदर्शनास आले आहे.

**सारांशात:**

मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाकरिता राज्य शासनाने अवलंबिलेल्या अथवा प्रस्तावित नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता अवलंबू इच्छित असलेल्या प्रकल्पबाधीत जमिन मूल्यांकनाचे ''एक कोटी रूपये प्रती एकर'' मूल्याचे धोरण राज्यातील सिंचन प्रकल्पांकरिताव प्रकर्षाने प्रस्तुत सर्फनाला प्रकल्पाकरिता अवलंबिले तर ते राज्यातील विविध/सर्व प्रकारच्या प्रकल्पबाधीतांकरिता समान पुनर्वसन मूल्याचे व न्याय्य पुनर्वसनाचे धोरण असेल. अन्यथा विविध प्रकल्पबाधीत जमिनींकरिता विविध मूल्य धोरण प्रकल्पग्रस्तांच्या मनात भेदभावाची भावना निर्माण करणारे व पर्यायाने निम्न मूल्य प्रकल्पबाधीतांकरिता अन्यायकारक ठरेल.

## Study Team

| | |
|---|---|
| **Vijay Kakade** | **Project Administration** |
| **Dnyandev Talule** | **Report Writing and Editing** |
| **Mahadev Deshmukh** | **Data Management and Field Coordination** |
| **Pravin Babar** | **Field Survey and Data Tabulation** |
| **Vittal Thabbe** | **Project Correspondence** |
| **Data Nanaware** | **Field Survey** |
| **Ajay Kumbhar** | **Field Survey** |




Shivaji University
Department of Economics
Kolhapur - 416 004

Vidyanagar, Kolhapur,
Maharashtra 416004
www.unishivaji.ac.in

Contacts:
0231-2609178/79/80/81